# अनुक्रमणिका


**4**
अध्यक्षीय- जयंत पाटील
केंद्राच्या दहशतीला मलिक घाबरणार नाहीत!

**5**
प्रबंध संपादकीय- दिलीप वळसे पाटील
दिन साजरे करण्याचा बोध काय?

**6**
संपादकीय- डॉ. सुधीर भोंगळे
समर्थाघरचे श्वान...

**10**
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय उद्‌घाटन समारंभ,भाषणे
१) शरद पवार-१०
२) राजेश टोपे-१५
३) बाळासाहेब थोरात-२०
४) सुनील तटकरे- २२
५) आदिती तटकरे-२४

**26**
केंद्रसरकारच्या सर्व कारवाया राजकीय सूडभावनेतून-
- जयंत पाटील

**28**
निवडणूक प्रचार कसा नसावा!
- आकाश लाल

**36**
ओबीसी आरक्षण प्रश्न, दोन भाषणे
१) अजित पवार-३६
२) छगन भुजबळ-३७

**38**
म्हाडा घरांचे भूमीपूजन समारंभ,गोरेगाव,मुंबई,भाषणे-
१) शरद पवार-३८
२) अजित पवार-४२
३) जितेंद्र आव्हाड-४५

**47**
पंतप्रधान जी... आपसे नाराज नहीं... हैरान हूँ मैं...
- सुप्रिया सुळे

**48**
रशिया-युक्रेन संघर्षाचा अन्वयार्थ
- अनंत बागाईतकर

**58**
केंद्र-राज्य संबंधांची फेरव्याख्या करण्याची अनिवार्यता
- कबीर दास

**66**
आगळे-वेगळे संस्थानिक- सयाजीराव गायकवाड
- प्रा.डॉ. गणेश राऊत

**72**
संघराज्याची अवस्था-
-पलानिवेल त्यागराजन


**76**
डॉ. आंबेडकर : अहिंसक हिंदवी स्वराज्य संकल्पना
- डॉ. प्रा. प्रकाश पवार

**84**
मल्लविद्येचा आश्रयदाता- राजर्षी शाहू महाराज
- डॉ. जयसिंगराव पवार

**92**
घंटाकर्ण- कानोकानी (राजकीय किस्से)

**100**
महाराष्ट्राची महाधारा
-सचिन परब

**102**
शेवटचे पान- बळी तो कान पिळी
-हेमन्त टकले

राष्ट्रवादी


**संचालक**
हेमन्त टकले
**प्रबंध संपादक**
दिलीप वळसे पाटील
**संपादक**
डॉ. सुधीर भोंगळे
या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी प्रबंध संपादक, संपादक व संचालक सहमत असतीलच असे नाही.

**संपादकीय पत्रव्यवहार**
ठाकरसी हाऊस,
जे.एन.हेरेडिया मार्ग,
बॅलार्ड इस्टेट,
मुंबई-४०० ०३८
०२२-३५३४७४००/०१
**कला निर्देशन**
धनंजय सस्तकर
**मांडणी**
दिलीप रोडे

**वर्गणीचे दर-**
**वार्षिक रु. ५००/-**
**वर्गणीचा धनादेश**
**'हेमन्त मल्टिमीडिया ओपीसी प्रा.लि.'**
या नावाने काढावा.
**www.ncp.org.in**
यावर मासिक उपलब्ध
**फोटो**
प्रशांत चव्हाण

**मुद्रक, प्रकाशक**
हेमन्त प्रभाकर टकले यांनी
**'हेमन्त मल्टीमीडिया ओपीसी प्रा.लि.'**
च्या वतीने मीडिया आर अँण्ड डी.,
१३, अमृत मधुरा, प्लॉट नं. ३, सेक्टर-३,आरएससी-२८, चारकोप, कांदिवली (पश्चिम), मुंबई-४०००६७ येथे छापून ७८, रेशमभवन, ६ वा मजला, वीर नरिमन रोड, चर्चगेट, मुंबई-४०००२० येथून अंक प्रकाशित केले.



अग्रलेख

# केंद्राच्या दहशतीला मलिक घाबरणार नाहीत

महाविकास आघाडीचे सरकार अस्थिर करण्यासाठी केंद्र सरकार प्रचंड उतावीळ झालेले आहे. महाराष्ट्राची सत्ता हातातून गेल्यामुळे माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील व त्यांचे काही सहकारी मोठे अस्वस्थ झाले आहेत. पवार साहेबांनी मोठ्या हुशारीने निर्मिलेले उद्धवजींच्या नेतृत्वाखालील हे सरकार सत्तेवरून जावे म्हणून भाजपच्या या नतद्रष्ट नेत्यांनी देव पाण्यात घालून ठेवले आहेत. रोज सत्तेवर येण्याचा आणि सरकार पाडण्याचा वायदा करताहेत. दोन वर्ष झाली त्यांच्या वल्गनांना पण विठू काही बेमानांना पावत नाही. कारण त्यांची अथनी आणि करणी यात प्रचंड अंतर आहे. फडणवीस सरकारच्या काळात तर इतका भ्रष्टाचार आणि लुटालूट झालेली आहे ती कागदावर आणायची म्हटले तर अनेक ग्रंथ लिहावे लागतील पण खुनशीपणाने वागणे, वचपा घेणे हे आमच्या संस्कृतीत बसत नसल्यामुळे कायदेशीर व सनदशीर मार्गाने आम्ही सरकारचे कामकाज चालविले आहे. आमचा सगळा भर मुख्यत्वे विकासकामांवर आणि सर्वसामान्य गोरगरिबांना व अडचणीत सापडलेल्या माणसांना मदत करण्यावर आहे. मागील दोन-अडीच वर्षांपासून कोरोना महामारीच्या संकटाचा आपण सगळेजण सामना करीत आहोत. या काळात राज्य सरकारचे उत्पन्न किती तरी कमी झाले. केंद्र सरकारने दुजाभावाची वागणूक देऊन महाराष्ट्रावर सातत्याने अन्याय केला, जाणीवपूर्वक जीएसटीचा निधी व इतर मदती रोखून धरल्या. कमी निधी दिला पण तरीदेखील महाविकास आघाडी सरकारने जीवनावश्यक व मूलभूत आवश्यक कामांसाठी निधीची कमतरता भासू दिली नाही. महाराष्ट्र सरकार उत्तम पद्धतीने काम करून जनतेमध्ये लोकप्रिय होते आहे हे सहन होत नसल्यामुळे केंद्र सरकारकडे खोट्यानाट्या तक्रारी करून व असत्य माहिती पुरवून महाविकास आघाडीतील मंत्री, आमदार यांना वेगवेगळ्या यंत्रणांमार्फत जाणीवपूर्वक त्रास देणे सुरू झाले आहे. सीबीआय, ईडी व अन्य यंत्रणांना त्यासाठी राजरोस वापर करण्यात येऊन नियम व कायदे धाब्यावर बसविले जात आहेत. एक प्रकारची दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केंद्र सरकार व भाजपाकडून होतो आहे.

दरारा आणि दहशत यांत अंतर ते कितीसे असते? तसे पाहिले तर अगदी थोडेसे. नाही म्हणावयास दोहोत निश्चित फरक आहे, नाही असे नाही. दरारा हा वडीलधाऱ्यांचा, वरिष्ठांचा. कनिष्ठांना वाटणारा. दहशतीत तसला प्रकार नाही. दहशत ही शक्ती व अधिकाराच्या बळावर कोणीही गाजवू शकतो. दराऱ्यात बळजबरी नसते, आदरभाव असतो. दहशतीत आदर दाखविण्याचीसुद्धा बळजबरी असते. दराऱ्याचे बंधन वाटत नाही, तर एखाद्या व्यक्तिबद्दलचा दरारा स्वाभाविकपणे वाटत राहतो. दहशत निर्माण करणाऱ्यात मात्र यथावकाश अतिरेकाचा दोष निर्माण होतो आणि मग अशांना दहशतीचा सक्तीचा रामराम करावा लागतो. पण आमचे राष्ट्रवादीचे राष्ट्रीय प्रवक्ते व अल्पसंख्यांक मंत्री नवाब मलिक हे काही असल्या दहशतीला घाबरणारे आणि भीक घालणारे नाहीत. ते लढवय्ये नेते आहेत. ओढून ताणून त्यांचा दाऊदशी संबंध जोडला जात आहे.

मुख्यत्यारपत्र घेतलेले सलीम पटेल याच्याशी २००५ मध्ये जमिनीचा व्यवहार नवाब मलिक यांनी केला असताना त्यांचा दाऊदशी संबंध पोचवण्याचे प्रयत्न सुरू आहे यात तथ्य नाही ओढूनताणून नवाब मलिक यांच्यावर आरोप करण्यात येत आहे. ज्या जमिनीचा संबंध जोडला जात आहे त्या जमिनीचा व्यवहार करताना रितसर स्टॅम्पड्युटी भरली गेली. २००५ मध्ये व्यवहार झाला आणि २००७ मध्ये सलीम पटेल बॉम्बस्फोटात आरोपी होता. मग त्या व्यवहाराशी कसा संबंध जोडता? त्या जमिनीच्या हरकतीबाबत २०१८ मध्ये जाहिरात देण्यात आली होती. त्यावेळी मुनिरा प्लंबर यांनी कोणतीही हरकत घेतली नाही. मात्र २० वर्षानंतर जमीन खरेदीतील पैसे मिळाले नाही म्हणणे कितपत योग्य आहे? नवाब मलिक यांनी सलीम पटेल यांना मुखत्यारपत्रानुसार पैसे दिल्यावर सलीम पटेल याने मुनिरा प्लंबर यांना पैसे दिले नाही यामध्ये नवाब मलिक यांचा काय दोष? याला जबाबदार सलीम पटेल आहे. त्याच्यावर कारवाई करायला हवी. मुनिरा प्लंबर यांनी आरोप केल्यानंतर ओढून ताणून नवाब मलिक यांच्यावर आरोप करुन अडकवण्यात आले आहे. हा सगळा प्रकार ओढून ताणून केला आहे. हे धक्कादायक आहे. नवाब मलिक यांचा दाऊदशी संबंध नाही. नवाब मलिक हे अनेक वर्ष पक्षात काम करत आहेत. त्यांचा संबंध जोडणे ही निषेधार्ह बाब आहे. राज्यातील जनताही या घटनेचा निषेध करत आहे.

समन्स नसताना अटक करणे योग्य नाही. नवाब मलिक घाबरणारे नेते नाहीत. ईडीला जर माहिती हवी होती तर त्यांनी दिली असती परंतु तसे न करता एका मंत्र्यांला अशा पध्दतीने घरातून उचलून आणणे योग्य नाही. नवाब मलिक यांची बाजू देशासमोर, राज्यासमोर यावी म्हणून यासंदर्भातील माहिती मी येथे दिली आहे. अधिकची माहिती त्यांचे वकील न्यायमूर्तींपुढे ठेवतीलच.

प्रबंध संपादकीय



# दिन साजरे करण्याचा बोध काय?

पाणी आणि हवामान हे दोन विषय आपल्या सर्वांच्या जीवनाशी अत्यंत निगडीत आहेत. त्यांच्याकडे आपण कधी गांभीर्याने व काळजीपूर्वक पाहिले नाही. कारण या दोन्हीही गोष्टी निसर्गाकडून आपल्याला फुकट मिळतात असा आपला पक्का समज असल्यामुळे त्याच्या संरक्षणाची, संवर्धनाची, व्यवस्थितपणे वापरण्याची काळजी व दक्षता आपण कधी घेतलीच नाही. त्यामुळे आता आपल्यावरच काय पण संपूर्ण जगावर २२ मार्चला 'आंतरराष्ट्रीय जलदिन' आणि २३ मार्चला 'जागतिक हवामान दिन' साजरा करण्याची वेळ आलेली आहे. हवामानासाठी तर जगातील अनेक मोठमोठ्या देशांमध्ये आंतरराष्ट्रीय परिषदा भरताहेत आणि ठळकपणे निदर्शनास येत असलेली गोष्ट म्हणजे ज्या विकसित राष्ट्रांकडून मोठ्या प्रमाणावर हवामानाला त्रास दिला जात आहे (प्रदूषण वाढवून) तिच राष्ट्रे जगाला उपदेशाचे डोस पाजत आहेत. कार्बन उत्सर्जन कमी करण्याचा सल्ला देत आहेत. वास्तविक सर्वाधिक वाहने, पेट्रोल-डिझेल-ऑईल यांसारख्या इंधनाचा वापर, वृक्षतोड, वीजनिर्मिती व वीजेचा प्रचंड वापर कोण करतंय हे डोळे उघडून पाहिले तर आपल्या लक्षात येईल की हाताच्या बोटावर मोजण्याइतके हे विकसित देश आहेत ज्यांनी जागतिक हवामान धोक्यात आणले आहे आणि साळसूदपणाचा सल्ला मात्र गरीब, अविकसित व विकसनशील देशांना दिला जात आहे. भाताच्या शेतीत पाणी गच्च भरून ते साठवून ठेवल्यामुळे मिथेन वायूची निर्मिती होते, त्यामुळे भारतातील खाचरातील भातशेती आता बंद झाली पाहिजे असे म्हणण्यापर्यंत काही देशांची मजल गेली आहे. आता आपणही यापासून काही बोध घेतला पाहिजे. ठिबक सिंचनावर भाताचे पिक उत्तम पद्धतीने येऊ शकते किंबहुना कमी पाण्याचा वापर करून दुपटीने उत्पादन मिळविता येते हे जैन इरिगेशनने जळगावच्या जैनहिल्सवर मागील १५ वर्षांपासून चालविलेल्या प्रयोगातून सिद्ध करून दाखविले आहे. पण अजूनही शेतकऱ्यांची बदलण्याची फारशी मानसिकता दिसत नाही. सुदैवाने भात पिकविणारे जगात सुमारे ४४ देश आहेत आणि मुख्य म्हणजे ते सर्व अति पर्जन्यवृष्टी होणारे व पाण्याची मुबलकता असणारे पण त्यांची आर्थिक स्थिती कमालीची दयनीय आणि दरवर्षी मदतीसाठी आंतरराष्ट्रीय वित्तीय संस्थांपुढे भिकेचा कटोरा घेऊन उभे राहात असलेली अशा प्रकारची आहे.

खरे तर पाणी आणि उर्जा हे विकासाचे दोन प्रमुख घटक व महत्त्वाची संसाधने आहेत. मागणीच्या तुलनेत या संसाधनांचा पुरवठा कमी असल्यामुळे त्यांच्यासाठी जगभर मोठ्या प्रमाणावर ओढाताण होते आहे. त्यातून आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि अगदी गावागावात व कुटुंबातदेखील संघर्ष, भांडणे, तंटेबखेडे उभे राहताना दिसत आहेत. सध्या आपण रशिया आणि युक्रेन यांच्यात चाललेले घनघोर युद्ध पाहतो आहोत. त्याची झळ संपूर्ण जगाला आणि आपल्यालाही बसते आहे आणि आणखीन बसणारही आहे. कारण युक्रेनमधून मोठ्या प्रमाणावर इंधन, गहू, सूर्यफूल तेल यांसारख्या गोष्टी जगाला पुरविल्या जात होत्या. तिच अवस्था रशियाची देखील आहे. सर्व आयात-निर्यात थांबल्यामुळे त्याचा परिणाम अर्थव्यवस्थेवर होणारच आहे. शिवाय युद्धात जी मोठमोठी अण्वस्त्रे, दारूगोळा वापरला जात आहे ते पाहता किती भयानक व विनाशकारी प्रदूषण केवळ रशिया-युक्रेनच नव्हे तर शेजारच्या देशांमध्येही निर्माण होत असेल याचा नुसता विचार केला तरी थरकाप व्हायला होते. संपूर्ण जग आज संकटात सापडले आहे. प्रत्येक माणूस निराश आणि अस्वस्थ आहे. विकास सगळ्यांना हवा आहे. पण त्यासाठी स्वतः काही झळ सोसण्याची, आपल्या चालिरीती, परंपरा, सवयी यात बदल करण्याची कुणाचीच तयारी व मानसिकता नाही. मग ही संसाधने पुरी कशी पडणार?

आज आपण पाण्याचे चांगले साठे मोठ्या प्रमाणात प्रदूषित करून टाकले आहेत. प्रत्येक गावातल्या नदी, नाले, ओढे यांत सांडपाणी व ड्रेनेजचे पाणी सोडून त्यांना गटाराची अवकळा आणली आहे. नद्या-नाल्यांमधले हे घाण पाणीच धरणांमध्ये जात असल्यामुळे आपण मोठ्या प्रमाणावर खर्च करून बांधलेली धरणेही घाण पाणी साठविण्याच्या मोठ्या टाक्या असे विकृत स्वरूप त्यांना आले आहे. हे पाणी प्रदूषित होऊन आरोग्याला अपायकारक बनल्यामुळे ते सहजपणे पिण्यासाठी वापरता येत नाही आणि त्यात आंघोळ केली तर अंगाला खाज सुटते असा अनुभव अनेकांना येतो आहे. येथे जाणीवपूर्वक मी कोणत्याही प्रकल्पाचे नाव घेत नाही पण आपण सर्वांनी ही दोन्ही संसाधने शुद्ध कशी राहतील, ती आपल्याला निकोप पद्धतीने कशी उपलब्ध होतील याचा विचार करून त्याप्रमाणे रोजच्या जीवनात बदल करावा लागेल तरच **'जागतिक जलदिन व हवामान दिन'** साजरा करण्याला अर्थ आहे. अन्यथा दरवर्षी हा दिन येईल पण आम्ही बोध घेतला नाही तर हे दिन साजरे करण्याच्या कल्पना व प्रयत्न कुचकामी आणि वांझोटे ठरतील.

संपादकीय



# समर्थाघरचे श्वान

**‘‘गुरूमुळे शिष्य घडत असतो. शिवाजीचे समर्थ रामदास हे गुरू होते. समर्थ रामदास नसते तर शिवाजी महाराजांना कोणी विचारले असते?’’**

महाराष्ट्राचे महामहीम राज्यपाल श्री. भगतसिंह कोश्यारी यांनी केलेल्या वरील वादग्रस्त व आक्षेपार्ह विधानांमुळे महाराष्ट्रातील जनता संतप्त झाली. सर्व थरातून राज्यपालांचा निषेध झाला. लोकांनी मोर्चा काढला. आंदोलन केले. राज्यपाल कोश्यारी यांच्या प्रतिमेला चपलांनी बदडले. कापडी फलकावरील प्रतिमेला जाळले. ज्याला जे जे सुचले व योग्य वाटले ते ते त्याने केले. यात जनतेची काहीही चूक नाही.

राज्यपालांनी केलेली वादग्रस्त विधाने मागे घेऊन छत्रपती शिवरायांचा व महाराष्ट्राचा जो अपमान केला आहे त्याबद्दल माफी मागावी अशी मागणी महाराष्ट्रातल्या जनतेने व शिवप्रेमिंनी आणि महाराजांच्या वंशजांनीदेखील केली. विधाने मागे घेण्याचे व माफी मागण्याचे तर सोडाच निर्लज्जपणाचा कळस इतका की, ‘‘छत्रपती शिवाजी महाराज देशाचे प्रेरणास्त्रोत आहेत. माझ्या माहितीप्रमाणे संत रामदास स्वामी हे छत्रपती शिवाजी महाराज यांचे गुरू आहेत. मात्र, इतिहासातील काही नवीन तथ्ये मला तज्ज्ञांनी सांगितली आहेत. त्यानुसार तथ्य तपासणार आहे,’’ असे सारवासारव करणारे तथ्यहीन स्पष्टीकरण देऊन राज्यपालांनी पुन्हा आपलाच घोडा पुढे दामटला आहे.

राज्यपालांच्या या बेजबाबदार वा कळत-नकळत किंवा जाणीवपूर्वक केलेल्या विधानांची फळे त्यांनाच भोगावी लागणार आहेत. याचे प्रत्यंतर महाराष्ट्र विधानमंडळाचे सुरुवातीचे अभिभाषण अवघ्या दीड मिनिटात अर्धवट सोडून राज्यपालांना निघून जावे लागले यावरून आले आहे. राज्यपालपदाची ही पूर्ण नामुष्की आहे. श्री. कोश्यारी यांनी स्वतःहून स्वतःवर ही वेळ ओढवून घेतली आहे. राष्ट्रगीतासाठी न थांबता त्यांनी विधानमंडळातून जो काढता पाय घेतला त्याने राष्ट्राचा आणि महाराष्ट्राचाही जो अवमान झाला आहे तो भाग वेगळाच आहे. ‘बुडत्याचा पाय खोलात,’ या म्हणीचे प्रत्यंतर येथे येते. एवढ्यावरच प्रकरण थांबेल असे वाटत नाही. याचे पडसाद आणखीन बराच काळ वेगवेगळ्या रूपाने उमटत राहतील. थोर समाजसुधारक महात्मा फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्याबद्दलही राज्यपालांनी जे अनुद्‌गार काढले ते राज्यपालांना न शोभणारे आणि या पदाला काळिमा फासणारे आहेत.

राज्यपालांनी आपली विधाने मागे घेऊन महाराष्ट्रातील जनतेची जाहीर माफी मागितली असती तर कदाचित हा वाद तात्काळ क्षमलाही असता. पण तेवढे मनाचे औदार्य, उदारता आणि बुद्धी राज्यपालांपाशी आहे असे दिसत नाही. त्यामुळे चुकांची पुनरावृत्ती ते करीतच राहिले आहेत. गुन्हा आणि शिक्षा ही एकाच देठाची दोन फळे असतात हे कदाचित त्यांना माहित नसावे! आता तरी ते हा सिद्धांत समजून घेतील आणि उमजून वागतील अशी आशा करूया.

उमज हा शब्द आपल्या वापरात कमी आहे. राज्यपालांना तर तो कदाचित माहितच नसावा. कारण समज असेल तर उमज पडते. मुळातच त्यांना समज नाही. ‘समज’ यामध्ये सम आहे. हीच जगण्याची सम आहे. उमज ही जगण्याची नस आहे. समज यायला जन्मजात समज लागते. या समजेला खोली आली, की उमज येते. उमज म्हणजे समजेच्या खोलीचे अर्थगर्भ मौन. समज काहीशी प्रकट होते. उमज अप्रकटातून प्रकटते. वारा दिसत नाही; पण स्पर्शाने जाणवतो. तशी उमज दिसत नाही; पण व्यक्तित्वातून जाणवते. उमज आपसूकही येते आणि परिस्थितीनेही येते. आपणच आपला मूल्यात्मक विचार करण्यासाठी उमज उपयोगी पडते. समजण्यात समज कमी पडू शकते. उमजेत समज परिपक्व होते. त्यामुळे काहीही उणे पडत नाही. आयुष्याची वळणे आपल्याला स्वच्छ अनुभवता येतात. जगण्यात उमज आली, की प्रपंचात भाग्य येते आणि परमार्थात वैराग्य येते, हे दासबोधातून भावते. पण महामहीमांना ते कसे कळणार? ते धड प्रापंचिकही नाहीत आणि दासबोधाचे वाचकही नाहीत. सचिवांनी लिहून दिलेली भाषणे वाचण्यापलिकडे त्यांचा आवाका नाही. उमज येण्यासाठी आधी स्वतःला आरपार वाचीत राहावे लागते. वाचनातून आकलन वाढवायचे. आकलनातून मननात उतरायचे. अभ्यासाचा चौफेर

फुलोरा वाढवायचा. हळूहळू स्वतःशी बोलायला लागायचे नि सर्व प्रकारच्या अनुभवांना सामोरे जायचे. लीनपणे प्रत्येक अनुभवातून शिकायचे. यातून जी नवी जाणीव निर्माण होते, तिला उमज म्हणतात. ही उमज संस्कृतीशी सांगड घालते. पण मुळात आडातच नसेल तर पोहऱ्यात तरी कुठून येणार ?

सातत्य आणि बदल यांच्या द्वंद्वात्मक प्रक्रियेतून इतिहास आकाराला येत असतो. इतिहासाचा वास्तविक उपयोग शहाणपण शिकणे हा असतो व असावा. इतिहास हा जरी स्थल-कालाचा असला तरी या विशिष्टतेची मीमांसा वैश्विकतेच्या भव्य पटलावर करण्याकडे काही इतिहासकारांचा कल होता. किंबहुना कुपमंडूक इतिहासदृष्टीला छेद देण्याचे कार्य त्र्यंबक शंकर शेजवलकर व अन्य काही इतिहासकारांनी उर्वरीत आयुष्यात केले. त्याचे वाचन जरी राज्यपालांनी केले असते तर अशी बेताल विधाने व अनर्थ बडबड त्यांनी केली नसती.

छत्रपती शिवाजी महाराज म्हणजे पाचशे वर्षांच्या हिंदुमुसलमान लढ्याचा अन्वयार्थ समजलेला एकमेव कर्ता पुरूष, मुसलमानी संस्कृतीतील सर्व उत्तम अंगे आत्मसात केलेला एक पराक्रमी वीर, हिंदुत्वाचा एक नितांत अभिमान असलेला एक धर्मनिष्ठ माणूस; बापाच्या पंधरावीस वर्षांच्या धडपडी पाहून, चार राज्यांच्या बंदीत राहून व मातोश्री राजमाता जिजाऊ यांच्या बोधामृताचे बाळकडू प्याल्याने आलेल्या शहाणपणातून शिकलेला मुत्सद्दी होता. त्याला समर्थांच्या उपदेशाची गरज नव्हती. छत्रपती शिवाजी महाराज आणि स्वामी समर्थ रामदास यांचे संबंध या विषयावर अनेक वर्षांपासून खूप चर्चा झालेली आहे. दोन्ही बाजूने भूमिका मांडणारी माणसे मोठी आहेत. शिवाजीने रामदासांना गुरू केले आणि रामदास प्रतापगडावरील भवानीदेवीला भेटण्यास गेले तेव्हा माझ्या राजाला राख, अशी त्यांनी शिवाजीसंबंधाने देवीपाशी मागणी केल्याचा उल्लेख इतिहासाचार्य राजवाडे यांनी केला आहे. राजवाडे संशोधन मंडळाचे माजी चिटणीस कै. भास्कर वामन भट यांनी 'शिवाजीची राजनीती' या पुस्तकात 'शिवाजीने समर्थांची भेट घेऊन त्यांचा त्याने अनुग्रह घेतला,' असे विधान केले आहे.

त्र्यंबक शंकर शेजवलकर यांनी 'श्रीशिवछत्रपतींचे चरित्र : प्रस्तावनेतील दोन उतारे' या प्रकरणात जे लिहिले आहे ते आपण बारकाईने वाचले तर गुरू-शिष्याचे खोटे नातेसंबंध जोडण्यामागील राजकारण व कूटकारस्थान लक्षांत येऊ शकेल. शेजवलकर असे लिहितात, ''रानड्यांच्या अंगभूत भक्तिभावामुळे महाराष्ट्र संतांच्या कार्याला ऐतिहासिक अधिष्ठान लाभले. त्यातूनच संतांच्या कार्याची छाननी सुरू होऊन प्रार्थनासमाज प्रभूती सुधारक पंथीयांनी तुकारामाचा उदो उदो आरंभिला. यात ब्राह्मणांवर प्रच्छन्न टीका असल्यामुळे ब्राह्मणाभिमानी सनातन पक्षाने रामदासांना पुढे आणिले व त्यांच्याकडे शिवकालीन, नव्हे शिवाजीच्या उदयाची मुख्य कामगिरी सोपविली. नवे नवे कागद पुढे आणणारे व त्यांचा गूढार्थ बारकाईने सांगणारे इतिहास संशोधकच रामदासांची पाठ पुरविणारे झाल्यामुळे सामान्य वाचकाचा आणि हे वाचक ब्राह्मणादी पांढरपेशे होते सहजच समज होऊन बसला की शिवाजीच्या कार्याची आखणी मुख्यतः समर्थांनी केली. राजवाड्यांसारख्या प्रतिभावान तिखट लेखकाने या मताचा पुरस्कार व प्रचार हाती घेतल्याने त्यांच्या भोळ्याभाबड्या भक्तांनी तोच क्रम उगाळण्याचे काम सर्वत्र चालू ठेवले. त्यामुळे हा समज जनमनात दृढ होऊन बसला आहे. पण मुळातच त्याला अस्सल आधार अत्यल्प असल्याने त्या पायावर एवढा मोठा इमला उभा करणे शक्य नाही.....




ब्राह्मणांनी इतिहासाचा हा जो नवा डोलारा उभारला त्याला मुळातच बिलकूल आधार नव्हता. हे त्यांनी झाकून ठेविले आणि महाराष्ट्रातील सर्व वाङ्मयीन जगत त्यांच्याच सत्तेखाली असल्याने तसे करणे शक्य झाले. ब्राह्मण पंडितांच्या या अतिशय लाडक्या सिद्धांतास पहिला विरोध, ब्राह्मणेतरात अपवाद म्हणून उदयास आलेल्या कृष्णाजी अर्जुन केळूसकर यांनी आपल्या शिवचरित्रात केला आणि ब्राह्मणांचा हा स्वयंघोषित सिद्धांत 'किती खोटा आहे' हे दाखवून दिले! पण केळूसकरांच्या या शिवचरित्राचा प्रसार होऊ नये म्हणून ब्राह्मण पंडितांनी त्या शिवचरित्रास वाळीत टाकले! बरे, हे आम्ही म्हणत नाही. मराठा इतिहासाचे थोर भाष्यकार, खरे इतिहासपंडित, त्र्यंबक शंकर शेजवलकर यांचे हे उद्गार आहेत.

ते पुढे म्हणतात, ''कृष्णाजी अर्जुन केळूसकरांसारखे साक्षेपी मराठे स्वतः बखरी वाचून पाहू लागते. तेव्हा त्यास आढळले की, एकाही ऐतिहासिक बखरीत शिवाजीने रामदासांच्या झोळीत राज्य टाकल्याची कथा नाही!.... केळुसकरांचे पुस्तक ब्राह्मणात

जवळजवळ वाचले गेलेच नाही.... नको असलेल्या माणसाचे नको असलेले मत महाराष्ट्र जनतेसमोर येऊच नये अशी योजना करण्यात महाराष्ट्र ब्राह्मण आजतागायत यशस्वी झाले आहेत. पण हे असे किती दिवस चालवायचे?.... समकालीन काय, पण उत्तरकालीन बखरकारसुद्धा ज्या गोष्टीचा उल्लेख करीत नाहीत ती गोष्ट एका पंथाचे स्वतःचे महत्व सिद्ध करण्यासाठी लिहिलेल्या खोट्या बखरींवरून शिवाजीच्या चरित्रात घुसडणे याला काय म्हणावे?.... स्वतःची प्रत्येक गोष्ट समर्थांना सांगून मग शिवाजी आचरणात आणी असे म्हणण्यास काही आधार नाही. फार कशाला, परमार्थाबाबतही शिवाजी याकूतबाबा किंवा मौनीमहाराज यांना भेटला तो प्रथम रामदासांच्या कानावर ही गोष्ट घालून, असे कोणी मानील काय?''

थोडक्यात काय, खोटा इतिहास लिहून समर्थ रामदास हे शिवाजी महाराजांचे गुरू व मार्गदर्शक होते असे समाजाच्या मनावर बिंबबून ब्राह्मण ही जात सर्वश्रेष्ठ असल्याचा अहंकार काही लोकांना जपावयाचा आहे म्हणून हे नसते उद्योग करण्यात आले. सुदैवाने राजवाडे व इतर प्रभूतींचा डाव शेजवलकर व इतर ब्राह्मण इतिहासकारांनीच उघड करून सांगितल्यामुळे मी त्यावर जास्त भाष्य करण्याची आवश्यकता नाही. शिवाजी महाराजांच्या मनात हिंदू, हिंदुस्थान व हिंदू धर्म यांच्याबद्दल काय भावना होत्या ते १६६५ मध्ये जयसिंगाला लिहिलेल्या पत्रावरून लक्षात येऊ शकेल.

रामदास स्वामींना छत्रपती शिवाजी महाराजांच्या गुरूस्थानी बसविण्याचे काम मागील शतकाच्या सुरूवातीला इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी केले. त्यांनी विसाव्या शतकाच्या प्रारंभीच 'समर्थ रामदासां'वर लेख लिहून शिवछत्रपतींच्या स्वराज्य स्थापनेच्या प्रेरणास्थानी समर्थांना स्थानापन्न केले. (इतिहासाचार्यांनी आपला हा लेख त्यांचे स्नेही आणि ज्यांनी वेदोक्त प्रकरणात शाहू छत्रपतींच्या विरोधात भूमिका घेतली होती त्या विष्णू



गोविंद विजापुरे यांच्या मासिकात प्रसिद्ध केला होता.) आणि मग तेथून पुढे इतिहासाचार्य राजवाडे व त्यांच्या अनुयायांनी भाकड कथांनी भरलेल्या रामदासी बखरींवर आधारीत अनेक लेख व ग्रंथ यांची निर्मिती करून मराठ्यांच्या इतिहासाच्या क्षेत्रात शिवछत्रपतींचे स्वराज्य स्थापनेचे श्रेय समर्थ रामदासांच्या झोळीत टाकून दिले. हे सगळे कशाच्या जोरावर तर हनुमंतस्वामीच्या बखरीच्या आधारे. या बखरीत हनुमंत स्वामीने रामदासांचा उल्लेख छत्रपतींचे गुरू असा केला आहे. वास्तविक ही बखर छत्रपती शिवाजी महाराजांच्या निधनानंतर १२५ वर्षांनी लिहिली गेली आहे. त्यामुळे ती किती खरी व प्रमाण मानायची हा प्रश्नच आहे. हा जो गुरू-शिष्याचा संबंध आहे तो पुढे मग करंदीकर, भट या लोकांनी वाढविला.

या संदर्भात अधिक भाष्य करताना इतिहासाचे गाढे अभ्यासक व विद्वान संशोधक डॉ. जयसिंगराव पवार म्हणतात, ''छत्रपती शिवाजी आणि समर्थ रामदास यांच्या संदर्भात सांगावयाचे झाले तर फेब्रुवारी १६५८ पर्यंत शिवाजी महाराजांना समर्थ रामदास स्वामी कोण हे माहितच नव्हते. १० नोव्हेंबरला प्रतापगडी अफजलखान मारला गेला. त्याच्या काही दिवस अगोदरचे एक पत्र आहे. त्या पत्रात समर्थांचा दिवाकर गोसावी या नावाचा एक शिष्य दुसऱ्या भास्कर, गोसावी नावाच्या शिष्याला पत्र लिहितो. त्यात तो म्हणतो, 'शिवाजीराजे यांचेकडे आम्ही भिक्षेस गेलो. त्यांनी विचारीले, ''तुम्ही कोठीले? कोणा ठिकाणी असता?'' त्यावरून आम्ही बोललो की, आम्ही स्वामी समर्थ रामदासांचे शिष्य. चाफळास राहतो. मग ते बोलले की, ते कोठे राहतात? मूळ गाव कोण? त्यावरून आम्ही सांगितले की गंगातीर. जामचे राहणारे. प्रस्तुत चाफळास मठ करून श्री देवाची स्थापना करून राहतात. त्यावरून २०० होनाचे वर्षासन महाराजांनी दिले.''

जयसिंगराव पवार पुढे म्हणतात, ''शिवाजी महाराज आणि समर्थ रामदास यांची प्रत्यक्ष भेट कधीच झाली नाही असे म्हणणाराही एक वर्ग आहे आणि तो ही दुर्लक्ष करण्यासारखा नाही. कारण दोघांची प्रत्यक्ष भेट झाल्याचा उल्लेख कुठेही नाही. राज्याभिषेकापूर्वी दोन वर्षे अगोदर म्हणजे १६७२ ला दोघांची भेट झाली असे काहीजण सांगतात. पण याला काहीही पुरावा नाही. त्यानंतर केशव गोसावी हा दिवाकर गोसावी याला ४ एप्रिल, १६७२ ला जे पत्र लिहितो त्यात नमूद करतो की, महाराज स्वामींना भेटायला येणार आहेत. तेव्हा वाट चांगली करा. झाडी बहुत आहे अशा सूचना स्वामींनी दिल्या आहेत. पुढे १६७८ साली छत्रपती आपले राज्य स्वामींना दान करतात. तेव्हा स्वामी मला काही दान करू नका असे म्हणतात असा खोटा इतिहास बखरकारांनी लिहून गुरू-शिष्याचे खोटे नाते उभे केले आहे.''

आता काही इतिहासकार म्हणतात, ''स्वामी आणि छत्रपतींची भेट राज्य स्थापन झाल्यानंतर झाली. मग प्रश्न असा पडतो की राज्य स्थापन करण्याचा उपदेश समर्थांनी शिवरायांना केव्हा केला असेल?'' असे सांगून डॉ. जयसिंगराव पवार म्हणतात, की शिवाजी महाराजांच्या कार्याचे महत्व त्याकाळी समर्थांनी जाणले हेच त्यांचे मोठे योगदान आहे. शिवाजी महाराजांच्या कार्याचे मूल्यमापन त्यांनी चांगले केले आणि सगळ्या मराठ्यांना महाराजांच्या पाठिशी उभे राहण्यास सांगितले.

**शिवरायांचा आठवावा प्रताप किंवा**
**मराठा तितुका मेळवावा**

यांसारखी कवने लिहून समर्थांनी महाराजांच्या कार्याचे गोडवे गायिले. पण ते स्वतः असे कधी म्हणाले नाहीत मी छत्रपतींचा गुरू आहे. शिवाजी महाराजांची खरी महती समर्थांनी गायिली. याचा अर्थ असा नव्हे की ते गुरू-शिष्य झाले. स्वराज्याची स्थापना होणे आणि महती गाणे या दोन्ही गोष्टी वेगवेगळ्या आहेत. तान्हाजीने पराक्रम केल्यानंतरच त्याच्यावर पोवाडा झाला. तस छत्रपतींनी स्वराज्याची स्थापना केल्यानंतरच समर्थांनी त्यांच्यावर फार चांगले कवन केले. उत्तर हिंदुस्थानात पारंपारिक पद्धतीने इतिहास शिकविला जातो. असाच इतिहास कदाचित राज्यपाल महोदयांना शिकविला गेला असेल. त्यामुळे अज्ञानापोटी ते तसे बोलले असतील तर त्यांनी मोठ्या मनाने चूक कबूल करून ती दुरूस्त केली पाहिजे.''



वाणी व लेखणी परखड असलेले विचारवंत डॉ. श्रीपाल सबनीस यांनी जुलै २०२१ मध्ये 'छत्रपती शिवराय आणि ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद : विवेकवादी भूमिका' या शिर्षकाखाली ४३६ पानांचा ग्रंथ लिहिला आहे. या ग्रंथात त्यांनी अनेक अभ्यासकांच्या साहित्याच्या संदर्भ घेऊन शेवटी साररूपाने संत रामदास आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या संबंधाबाबत जे मत व्यक्त केले आहे तेही तुमच्यापुढे ठेवणे गरजेचे आहे. श्री. सबनीस म्हणतात,

''रामदास स्वामी यांना छत्रपती शिवरायांचे गुरूपद देऊन ब्राह्मण वर्चस्ववादाची मानसिकता कुरवळण्याचा प्रयत्न हे इतिहासाचे विकृतीकरण आहे. रामदास गुरू असते तर राज्याभिषेकाच्यावेळी हजर का नाहीत? छत्रपतींच्या निधनसमयी किंवा नंतरही का आले नाहीत? अर्थात शिवरायांनी रामदासांना गुरू म्हटले नाही व स्वामिंनीही शिवाजीमहाराजांना शिष्य म्हटलेले नाही, हे एक सत्य !

दुसरे सत्यही महत्वाचे आहे. रामदास स्वामी यांना ब्राह्मणी विद्वानांनी छत्रपतींचे गुरू केल्याच्या संतापाने बेमान झालेले काही ब्राह्मणेतर विद्वान स्वामींना औरंगजेबाचे हेर ठरवून त्यांच्यावर व्यभिचाराचा आरोप करतात. ही मांडणीसुद्धा इतिहासाला धरून नाही. कारण रामदासांनी शिवरायांच्या स्वराज्याचा कैवार घेऊन काव्यरचना केलीय. शिवाय रामदासाचे 'वाह्यात' वागणे छत्रपतींनी सहन का केले असते? शिवरायांनी रामदासांचा १६७८ ला सनद देऊन गावे इनाम दिलीत. अर्थात या दोघांची भेट झाली नसली तरी त्यांच्या भूमिका विरोधी नसून परस्परपुरक आहेत. काही ब्राह्मण्यग्रस्त ब्राह्मण व ब्राह्मणेतर विद्वान शिवरायांच्या इतिहासाचे विकृतीकरण करून विषाची पेरणी करतात. वर्तमान महाराष्ट्राला ही विकृती परवडणार नाही.''

राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या भाषणावर प्रतिक्रिया व्यक्त करताना डॉ. सबनीस म्हणाले, ''महाराष्ट्राच्या राज्यपाल पदावरील संविधानात्मक भूमिका बजाविणारे सन्माननीय श्री. कोश्यारी यांनी काहीही अभ्यास न करता शिवरायांच्या संदर्भात केलेले विधान महाराष्ट्राच्या भवितव्याला व शांतता-सुव्यवस्थेला आग लावणारे वाटते. इतिहास विवेकाने वाचावा, लिहावा व सांगावा. हे भान जबाबदार व्यक्तीने निष्ठेने जपलेच पाहिजे.''

राज्यपालांच्या वक्तव्यावर सर्व क्षेत्रातून आक्षेप घेतले गेल्यानंतरही त्यांनी दिलगिरी व्यक्त करण्याचे वा माफी मागण्याचे औदार्य दाखविले नाही. उलट सारवासारव करण्याचा प्रयत्न केला. सारवासारवीचा हा प्रकार हल्ली शिष्टसंमत होऊ लागला असला तरी तो स्पृहणीय नाही. आपल्या कार्यकाळात आपण आपला व्यक्तिगत स्वार्थ व पक्षाचा स्वार्थ साधला पाहिजे, पुढे काय होईल ते होवो हे समाजमंदीरातील मतलबी पुजाऱ्याचे वागणे राज्यपाल या पदाची प्रतिष्ठा, मानमरातब आणि आदर कमी करणारा आहे.' 'समर्थाघरचे श्वान' म्हणून जर राज्यपाल काम करणार असतील तर आयुष्यभर त्यांनी जी कामगिरी केली असेल ती पाहता 'उजेडी राहिले उजेड होऊन' असेच म्हणावे लागेल. आजच्या अस्वस्थ महाराष्ट्रामध्ये अंधारातली लवलवती पणती होण्याचेही कार्य राज्यपालांकडून होणार नसेल तर राज्यपाल हवेत तरी कशाला? असा प्रश्न उपस्थित झाला तर त्याबद्दल नवल वाटायला नको! छत्रपती शिवाजी महाराजांसंबंधी राज्यपालांनी जी मुक्ताफळे उधळी ती पाहता मोठी खुर्ची, छोटे मन याचेच दर्शन जनतेला झाले आहे.

डॉ. सुधीर भोंगळे

**रायगड जिल्ह्याच्या अलिबाग तालुक्यातील उसर येथे शासकीय वैद्यकीय २२ फेब्रुवारी २०२२ रोजी राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते आदरणीय खासदार शरद पवार साहेब यांच्या अध्यक्षतेखाली झाले. या**




# उसरमधील शासकीय महाविद्यालय

एका अत्यंत मोठ्या आणि महत्त्वाच्या प्रकल्पाची आज सुरुवात होतेय. महाविद्यालय काढणं ही तशी गोष्ट अवघड नसते. पण वैद्यकीय महाविद्यालय काढणं ही गोष्ट काही छोटी नाही. आणि त्याचं महत्त्वाचं कारण, त्याच्याबरोबर ५०० ते ७०० बेड्स असलेले हॉस्पिटल, एवढं मोठं हॉस्पिटल म्हटल्याच्यानंतर त्याच्यासाठी लागणारा सगळा वैद्यकीय कर्मचारी वर्ग, साधनसामुग्री या गोष्टी काही लहान नाहीत. कमीत कमी ५०० कोटी रूपये तरी सुरूवातीला त्याला लागत असतात. ही गुंतवणूक करावी लागते आणि ती गुंतवणूक हॉस्पिटलसाठी केल्याच्यानंतर महाविद्यालयासाठी ज्या वेगवेगळ्या शाखा आणि सुविधा या देण्याच्याबद्दलची जबाबदारी स्वीकारावी लागते. विद्यार्थी-विद्यार्थीनींच्यासाठी वसतिगृह, कर्मचाऱ्यांच्यासाठी निवासस्थानं, एका दृष्टिनं एक लहानसं शहर बनावं त्या प्रकारची स्थिती मेडिकल कॉलेज

## महाविद्यालय व सर्वोपचार रूग्णालय या प्रशासकीय इमारतीचे भूमीपूजन (दूरदृश्यप्रणालीद्वारे) आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष कार्यक्रमातील मान्यवरांची भाषणे....



# रूग्ण सेवेचं महत्त्वाचं केंद्र बनेल

**शरद पवार याचे विचार**

काढायचं म्हटल्याच्यानंतर आज खऱ्या अर्थानं तयार होत असते. आणि हे काम श्री. सुनील तटकरे, आदिती तटकरे, राज्य सरकार, राज्य सरकारमधले संबंधित मंत्री आणि सहकार्य करणारे आपण सगळेजण स्थानिक त्यामुळंच याठिकाणी हे घडतंय. आणि म्हणून या सगळ्या लोकांचं सुरूवातीला मी मनापासून त्यांचं अभिनंदन करतो. या जिल्ह्याचा चेहरा बदलण्याच्यासाठी लोकांच्यादृष्टीनं अत्यंत महत्त्वाचा असा प्रकल्प आज या ठिकाणी सुरू करण्याचा संकल्प तुम्ही याठिकाणी केलात. माझी खात्री आहे, की या जिल्ह्याच्या शेवटच्या माणसाला त्याची मदत झाल्याशिवाय राहणार नाही.

एक मोठं संकट आपण पाहिलं. कोविडचं संकट. पूर्ण दोन वर्षे हे संकट देशाला, जगाला अडचणीत आणणारं संकट पाहिलं. एक वर्ष तर कसं गेलं ते कळलंच नाही पहिलं. एके दिवशी देशाच्या प्रधानमंत्र्यांनी जाहीर केलं, की आता एक

महिना, पहिल्यांदा पंधरा दिवस, नंतर पंधरा दिवस कुणी काही करायचं नाही. घरामध्ये थांबायचं आणि हॉस्पिटलची गरज किती आहे, अशी रोगराई आल्याच्यानंतर काय स्थिती होते, याचं चित्र महाराष्ट्रसारख्या राज्यामध्ये प्रकर्षानं जाणवलं असेल, तर माझ्यादृष्टीनं मला रायगड जिल्ह्यात जाणवलं. आणि त्याचं कारण, की लोकांनी मुंबई सोडली. लोक गावाकडं यायला लागले. आणि गावाकडं यायला लागलेल्या लोकांची संख्या आकडेवारी बघितली तर ती काही लाखात होती. अनेक गावाचे अहवाल मिळायला लागले, की लोक गावाकडे आले, पण नेहमी प्रेमानं स्वागत करणारे गाववालेसुद्धा भाऊबंद आल्याच्यानंतर आता ही बला इथं कशाला आली अशा प्रकारची मन:स्थिती होती. अनेकांना त्या संकटाला तोंड द्यावं लागलं. तुम्ही बघितली असेल, मुंबईमधनं उत्तर प्रदेश, बिहार याठिकाणी लोक जायला निघाले, सुरूवातीला लोक पायी निघाले. आणि पायी निघाल्याच्यानंतर ती त्यांची अवस्था लक्षामध्ये घेऊन त्यातनं मार्ग काढण्याच्यासाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि अन्य सहकाऱ्यांनी केंद्र सरकारला विनंती करून अक्षरश: हजारो ट्रेन त्याठिकाणी आत्मसात केल्या. महाराष्ट्र सरकारने अक्षरश: हजारो बसच्या माध्यमातून लोकांना त्यांची ज्याठिकाणी जाण्याची इच्छा आहे, त्या

सगळ्याच्यासंबंधीची किती गरज आहे याची नोंद ही आपण सगळ्यांनी घेतली आणि हे सगळं चित्र बघितल्याच्यानंतर हॉस्पिटल आणि मेडिकल कॉलेज याची गरज किती आहे याचा अंदाज हा आपल्याला याठिकाणी सगळ्यांना आलेला आहे. या सगळ्या संकटाच्या काळात वैद्यकीय अधिकारी असतील, नर्सेस असतील, त्यांच्याबरोबर काम करणारा इतर कर्मचारी वर्ग असेल, स्वत:च्या प्राणाचाही विचार केला नाही अनेकांनी.






**वैद्यकीय शिक्षणमंत्री अमित देशमुख हे शाल घालून शरद पवार यांचा सत्कार करताना, शेजारी बाळासाहेब थोरात, आदिती तटकरे, राजेश टोपे व सुनील तटकरे**

त्याठिकाणी पोचवण्याचं काम केलं. हजारो लोक आपलं राज्यसुद्धा सोडून गेले. या सगळ्याच्या पाठीमागं एकच कारण होतं, एक महारोग. एक रोग, सगळ्या जगाला संकटात नेणारा रोग, हा एक रोग, सगळ्या घरातलं स्वास्थ्य बिघडवणारा रोग, आणि एक रोग, की ज्याच्यासाठी साधन सामुग्री, औषधं या

रात्रं-दिवस कष्ट केले आणि संकटग्रस्त माणसाला संकटातून बाहेर काढण्यासाठी जे काय करता येईल ते त्यांनी केलं. शासकीय यंत्रणेनं सुद्धा प्रयत्नांची पराकाष्ठा केली. अनेकांना प्राण द्यावे लागले. पण, महाराष्ट्राचं वैशिष्ट्य हे आहे, की संकट आल्याच्यानंतर आपसातले सगळे मतभेद सोडून लोक

एकसंघपणे उभे राहतात आणि संकटावर मात करतात, याचा अनुभव आपण सर्वांनी घेतला. आरोग्याच्या प्रश्नांची सोडवणूक करण्याच्यासाठी ज्या ज्या गोष्टींची आवश्यकता आहे, त्या सगळ्या गोष्टींची पूर्तता ही तातडीनं करण्याच्याबद्दलची आवश्यकता आहे. आणि तेच काम आज याठिकाणी होतंय.

हॉस्पिटल वाढतायंत, कॉलेज वाढतायंत. कॉलेज बांधायला सुरूवात करण्याच्यापूर्वी कॉलेज सुरूही केलं. माझ्या माहितीप्रमाणे ६० का ७० विद्यार्थ्यांना इथं प्रवेशही दिला आणि पुढच्या वर्षी ती संख्यादेखील वाढेल. आणि या सगळ्या शिक्षित लोकांच्या, ज्ञानी लोकांच्या मदतीनं आजूबाजूच्या परिसरातील लोकांच्या आरोग्याचा प्रश्न सुटायला फार मोठी मदत होणार आहे. आणि म्हणून ज्यांनी ज्यांनी याच्यात पुढाकार घेतला, कष्ट घेतले, जागा दिली, सहकार्य केलं त्या सगळ्यांना याठिकाणी मी अंत:करणापासून धन्यवाद देतो.

हा जिल्हा एक जागृत अशा प्रकारचा जिल्हा आहे. वेळप्रसंगी लोकांचं दुखणं दूर करण्याच्यासाठी कष्ट करणाऱ्यांचा हा जिल्हा आहे. उत्तम शेती करणाऱ्यांचा हा जिल्हा आहे. मत्स्य व्यवसायामध्ये लक्ष देणारा हा जिल्हा आहे. आणि अलिकडच्या काळामध्ये शिक्षणाचा विस्तार करून शिक्षणाची केंद्रं ठिकठिकाणी उभी करण्याच्यासाठी आणि बाहेर जाण्याची स्थिती न यावी यासाठी कष्ट करणाऱ्या अशा लोकांची संस्था उभा करणाऱ्यांचा हा जिल्हा आहे. या जिल्ह्याला इतिहास होता. श्री शिवछत्रपतींचा इतिहास आहे. कधी कधी आमच्यामध्ये चर्चा होते, रायगड ही शिवछत्रपतींची राजधानी. हिंदवी स्वराज्य स्थापन करण्याच्यासंबंधीचं मोठं काम याचठिकाणी झालं आणि त्यामुळं रायगडकर हे शिवछत्रतींच्या कर्तृत्वाचा आदर नेहमी अंत:करणात ठेवतात त्यात काही चुकीचं नाही. पण, कधी कधी काही लोक म्हणतात, रायगडने एक कर्तृत्वान राज्य प्रस्थापित करण्याच्यासंबंधीचा इतिहास केला. त्यामुळं रायगडचं नाव कायम राहील. पण, शिवनेरीचं नाव लक्षात ठेवायचं की नाही. शिवनेरी ही जन्मभूमी आहे. माणूस कर्तृत्ववान नंतर होतो, पण जन्म झाला तरच तो होतो. आणि म्हणून तो जन्म कुठं झाला, त्याच्याकडंसुद्धा दुर्लक्ष करून चालणार नाही, एवढंच मी तटकरे साहेबांना सांगू इच्छितो. आज या संबंध इतिहासाबद्दलचं माझं मत घेतलं, तर हिंदवी स्वराज्याची उभारणी करण्याच्यासाठी या जिल्ह्यात व्यवस्थित कामगिरी झाली आणि तितकंच महत्त्वाचं काम सागरी रक्षण हा विषय या देशामध्ये पहिल्यांदा





अमित देशमुख व आदिती तटकरे हे सन्मानचिन्ह देऊन शरद पवार यांचा सत्कार करताना, शेजारी बाळासाहेब थोरात, राजेश टोपे व सुनील तटकरे

रायगड जिल्ह्यातून देशाच्यासमोर आला. त्यामुळं सागरी रक्षण करण्याच्यासाठी जी यंत्रणा उभी केली पाहिजे, याबद्दलचं सूत्र याच रायगड जिल्ह्यामधून, याच अलिबाग तालुक्यामधून केलं गेलं आणि त्यामुळं साहजिकच या सगळ्या जिल्ह्याच्याबद्दलचा अभिमान हा तुम्हाला आणि मला सगळ्यांना आहे.

हा जिल्हा येईल त्या संकटावर मात करून लोकांच्या प्रश्नांची सोडवणूक करणारा कष्टकरी आणि दृष्ट्या नेतृत्वाची खाण असलेला हा जिल्हा आहे. संबंध देशाचा अर्थव्यवहार, देशाचं अर्थशास्त्र हे अत्यंत बारकाईनं समजून घेऊन त्या अर्थशास्त्राला एक प्रकारचा आधार देण्याचं काम या देशामध्ये करणारे या देशाचे जेवढे अर्थमंत्री होऊन गेले, त्यातला पहिला अर्थमंत्री सी. डी. देशमुख हे या रायगड जिल्ह्यामधले झाले आहेत. हे कधी आपण विसरून जाऊ शकत नाही. आम्ही दिल्लीमध्ये बघतो, अनेक वेळेला पार्लमेंटमधल्या काही जुन्या गोष्टींचा संदर्भ काढावा लागतो आणि तो संदर्भ काढायला लागल्याच्यानंतर अर्थकारणाच्यासंबंधीचा प्रश्न असेल तर आम्ही फार इतर काळ बघत नाही. आम्ही फक्त सीडींच्या काळात जी काही चर्चा झाली, त्यांनी काय मतं मांडली हे जाणून घेण्यासंबंधीचा प्रयत्न करतो आणि संसदेमध्ये काय सांगायचंय याच्याबद्दलचा विचार मांडतो. सीडींच्यासारखी अनेक मोठी माणसं या जिल्ह्यात होऊन गेली. नारायण राघो पाटील, की ज्यांनी सामान्य माणूस संघटित करण्याच्याबद्दलचा प्रयत्न केला. भाऊसाहेब राऊत, की ज्यांनी एक सामूहिक शक्ती उभी करण्याच्याबद्दलची कामगिरी त्यांच्या कालखंडामध्ये केली आणि अनेक संकटं असतानासुद्धा या अशा दृष्ट्या नेतृत्वानी या जिल्ह्याच्या माध्यमातून महाराष्ट्राला दृष्टी दिली. अनेकांची नावं घेता येतील. काही लोकांच्याबरोबर काम करण्याची संधी मला मिळाली. बी. व्ही. पाटील असतील, दत्ता पाटील असतील, प्रभाकर पाटील असतील, आणखी अनेकांची नावं मला त्याठिकाणी घेता येतील. त्या सगळ्यांनी अगदी मीनाक्षीपर्यंत या जिल्ह्यातल्या सामान्य माणसाच्या प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी आपल्या आयुष्यातला फार मोठा कालखंड या कामाच्यासाठी दिला होता. आणि म्हणून एक जागृत नेतृत्व असलेला हा जिल्हा, प्रश्नांची सोडवणूक होत नसेल तर वेळप्रसंगी संघर्ष करण्याची भूमिका घेणारा असा एक नेतृत्वाचा वर्ग हा याठिकाणी करून, आम्ही लहान असू, आम्ही गरीब असू, आम्हाला मर्यादा असतील, पण कर्तृत्व, शौर्य याची मर्यादा आम्हाला नाही हा इतिहास अशा प्रकारच्या नेतृत्वानी हा उभा केलेला आहे. आणि म्हणून अशा सगळ्यांच्या जिल्ह्यामध्ये आज आदिती, बाकीचे त्यांचे सगळे सहकारी, राज्य सरकारमधले सर्व आमचे नव्या पिढीचे नेते, त्यांनी सगळ्यांनी या जिल्ह्याच्या विकासाची गरज लक्षात घेऊन एक चांगल्या प्रकारचं काम करायला हातभार लावला. त्याबद्दल या सगळ्यांचं मी मन:पूर्वक अभिनंदन करतो. माझी खात्री आहे, की ठरलेल्या कालावधीमध्ये हा प्रकल्प पूर्ण होईल आणि आपल्या सगळ्यांना हा प्रकल्प सुरू झालेला बघता येईल आणि त्या माध्यमातून रूग्णांची सेवा करण्याबद्दलचं हे महत्त्वाचं केंद्र होईल. लोक असं म्हणतात, की रूग्णाची सेवा ही ईश्वराची सेवा आहे. ही ईश्वराची सेवा करण्याचं केंद्र या वास्तूच्या परिसरामध्ये होईल. एवढंच याठिकाणी सांगतो आणि माझे दोन शब्द संपवतो.

■■■





# आरोग्य विभाग कात टाकून सेवा पुरविण्याचे काम करत आहे

## आरोग्यमंत्री राजेश टोपे यांचे विचार

छत्रपतींच्या पदस्पर्शाने पुनीत झालेल्या रायगड जिल्ह्यातील या अलिबागच्या भागातील या भूमीमध्ये ज्याठिकाणी महाडचे चवदार तळेसुद्धा आहे, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पदस्पर्शाने पुनीत झालेल्या या भूमीमध्ये आज एक अतिशय महत्त्वाचं खऱ्या अर्थानी महाविद्यालय जे वैद्यकीय शिक्षणाचं आहे, त्याची मुहुर्तमेढ याठिकाणी होते आहे, त्याचा मला मनापासून अत्यानंद आहे आणि त्यामुळे या कामासाठी खऱ्या अर्थानी आदरणीय पवार साहेबांपासून, मुख्यमंत्र्यांपासून, उपमुख्यमंत्र्यांपासून आणि मी या खात्याचा मंत्री झाल्याच्यानंतर आदरणीय खासदार तटकरे साहेबांनी सातत्यानी बैठका घेतल्या. सातत्यानी पाठपुरावा केला. त्याचं स्वप्न जुनं होतंच, पण, मधल्या काळात मागच्या पाच-सहा वर्षात जे काही स्थिरावलं होतं. ते मात्र या दोन-अडीच वर्षामध्ये त्यांनी सातत्यानी पाठपुरावा पुरवला.

आपलं जे ५०० खाटांचं रूग्णालय, ज्याच्याशिवाय महाविद्यालयाला मंजुरी मिळतच नसते, जो महत्त्वाचा नॉर्म



आदिती तटकरे या शाल व सन्मानचिन्ह देऊन राजेश टोपे यांचा सत्कार करताना, शेजारी आमदार अनिकेत तटकरे

आहे, ते त्याठिकाणी मान्य करून, आज एमसीआयकडून मान्य करून त्याची शंभर विद्यार्थ्यांची फर्स्ट बॅच आज सुरू झालेली आहे. हा रायगडकरांसाठी अतिशय महत्त्वाचा क्षण आहे. मला असं वाटतं, की याठिकाणी आपल्याला काय काय महत्त्वाची उपलब्धी आहे, तर रायगडकरांना टर्सरी केअरची सेवा याठिकाणी मिळणार आहे. म्हणजे जे काही तुमचे दुर्धर आजार आहेत, मोठी ऑपरेशन्स आहेत, क्रिटिकल ऑपरेशन्स आहेत, तुम्हाला आता मुंबईला रेफर करण्याची गरज पडू नये, अशी परिस्थिती वर्षभरात येईल, हा विश्वास मला याठिकाणी व्यक्त करायचांय आणि ते खरं वैद्यकीय महाविद्यालयचं महत्त्व असेल.

कारण, त्याला अॅटॅच्ड् जे हॉस्पिटल्स असतात, त्यामध्ये संपूर्ण टर्सरी केअरची व्यवस्था हे एक महत्त्वाचं काम. उपचाराची व्यवस्था आणि दुसरं महत्त्वाचं काम, की आपल्या कोकणातली, आपल्या रायगड जिल्ह्यातले विद्यार्थी जे शिक्षणासाठी मुंबईला जातात आणि मुंबईला गेल्यानंतर तिथे शिक्षण घेतात आणि मग परत येत नाहीत. मुंबईतच थांबतात. आता मला असं वाटतं, की रायगडचा विद्यार्थी जो खऱ्या अर्थानी वैद्यकीय शिक्षण घेईल, जो पोस्ट ग्रॅज्युएट इथे होईल, तो इथेच सेवा देईल. त्याच्या कोकणात सेवा देईल, ही सुद्धा एक महत्त्वाची उपलब्ध याठिकाणी साध्य होणार आहे. आणि त्यामुळं अशी ही दोन महत्त्वाची कामं या हॉस्पिटलच्या माध्यमातून पूर्ण केली जातायंत. मायग्रेशन थांबणार आहे, जे मुंबईला जाऊन स्थिरावण्याचं काम असतं, ते थांबणार आहे.

खऱ्या अर्थानी मला याठिकाणी सांगितलं पाहिजे, की आज आरोग्य सेवा देण्यासाठी महत्त्वाची जर काय अडचण असेल तर ते तज्ज्ञ डॉक्टर्स किंवा एमबीबीएस डॉक्टर्स मिळणं. कारण दुर्गम भागात, अतिदुर्गम भागात, ग्रामीण भागात डॉक्टर्स जात नाहीत. एमबीबीएस डॉक्टर्स मिळत नाहीत. ही त्यातली महत्त्वाची अडचण असते. आपण पैशाच्या माध्यमातून इन्फ्रास्ट्रक्चर जरूर निर्माण करू. ज्या पद्धतीनं आदरणीय मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री महोदयांनी चार हजार कोटी रूपये हुडकोच्या माध्यमातून राज्याच्या सगळ्या बांधकामाच्या इन्फ्रास्ट्रक्चरसाठी निधी मंजूर केला सहा टक्के व्याज दराने, आणि त्यातून आपल्याला इन्फ्रास्ट्रक्चर जरूर तयार करता येईल, पण, डॉक्टर्स कुठून तयार होणार. आणि त्यामुळं डॉक्टर्स तयार होण्याची व्यवस्था ही महाविद्यालयातूनच होऊ शकते. आणि त्यासाठी केंद्र शासनाचा जो एक विचार आहे, की प्रत्येक जिल्ह्यात त्याठिकाणी महाविद्यालय व्हावं, त्याला महाविकास आघाडीने खऱ्या अर्थानं विचारानी पाठिंबा देत आज मला सांगायला आनंद वाटतो, की कोकणात बोलतोय म्हणून, सिंधुदुर्गलाही हॉस्पिटल दिलंय. तिथंही हॉस्पिटलच्या माध्यमातून आता महाविद्यालय सुरू होतंय. रायगडला दिलं. शेजारी साताऱ्याला दिलं. अमरावती असेल, परभणी असेल, उस्मानाबाद असेल, हे या दोन वर्षांच्या कालखंडामध्ये अनेक हॉस्पिटल्स देऊन आपण महाविद्यालय सुरू करण्याचं काम

करतो आहोत.

आजही महाराष्ट्रामध्ये जे प्रमाण आहे, की हजार लोकसंख्येच्या मागे एक एमबीबीएस डॉक्टर पाहिजे. तर ते प्रमाण आज पॉईंट ६ आहे. म्हणजे सिक्स्टी पर्सेंट आपण आहोत. अजून ४० पर्सेंट कव्हर करायचंय. आणि त्यामुळं दीडपटीनं आपल्याला डॉक्टर्सची संख्या पाहिजे. त्यावेळी आपण डब्ल्यूएचओचं जे प्रमाण आहे, की हजाराला एक डॉक्टर. ते प्रमाण पूर्ण होणार आहे. आणि त्या दृष्टीकोनातून हे हॉस्पिटल्स नवीन होणं ही अत्यंत महत्त्वाची गरज आहे. तसंच स्पेशलाईज डॉक्टरचं आहे. म्हणजे तुम्ही एमबीबीएस होऊन चालणार नाही. त्याच्यामध्ये पीजी करणं, त्याच्यामध्ये आणखी सुपर स्पेशालिटी करणं, तर तुम्ही दुर्धर आजारावर, प्रत्येक वेगळं सेक्शन आहे, त्याचं स्पेशलायजेशन आवश्यक आहे. त्याचं प्रमाणसुद्धा काय पाहिजे. तर एक एमबीबीएसला खऱ्या अर्थानं चार स्पेशलिस्ट पाहिजेत. पण, आपलं उलटं प्रमाण आहे. तीन एमबीबीएस आणि एक स्पेशालिस्ट. त्यामुळं त्याच्याही जागा वाढवण्याची आवश्यकता आहे.

या सगळ्या परिस्थितीत एकंदर मनुष्यबळ, वैद्यकीय शिक्षणाचं मनुष्यबळ वाढवणं हा आजच्या या महत्त्वाच्या कार्यक्रमाच्या दृष्टीकोनातून आमचा उद्देश आहे. याठिकाणी काय फक्त एमबीबीएसच होईल असं नाही. वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी सांगितलं, की याला काहीच कमी पडणार नाही. वर्ल्ड स्टँडर्डचं हॉस्पिटल आपल्याला करायचंय. याचा अर्थ याठिकाणी पीजी होईल, याठिकाणी सुपर स्पेशालिटी होईल. सगळ्या गोष्टी आणि त्यामुळं या सगळ्या दृष्टीकोनातून अमित भैय्या किंवा राजेश भैय्या असेल, दोन्ही भैय्या आपल्या सेवेत आहेत तटकरे साहेब, एवढंच मी यानिमित्तानं सांगू इच्छितो.

आजच्या या निमित्तानं फार अधिक बोलावं असा हा विषय नाहीये. पण, एक नक्कीच आहे, की डॉक्टर्सच्याबद्दल बोलत असताना आता तुमची ट्रॅडिशन ग्रोथ आहे, त्याच्यावर आता महर्षी, चरका ही जी काही ग्रोथ असते, ती नवीन पद्धतीनी होतीय. त्याला महर्षी चरक शपथ म्हणतो आपण. शपथ कुठलीही घ्या. आता केंद्र सरकारनी शपथची पद्धत बदललीय. पण, डॉक्टर्समध्ये मागच्या दोन वर्षात काम करत असताना एवढीच विनंती डॉक्टर्सच्याप्रति असते, की आपण इथिकल प्रॅक्टिस करावी. नैतिकतेची प्रॅक्टिस असावी आणि रूग्ण आणि डॉक्टरचा सुसंवाद अधिक वाढावा अशा पद्धतीची अपेक्षासुद्धा आजच्या या निमित्तानं मी निश्चितपणानं व्यक्त करेन.

या संपूर्ण कार्यक्रमाच्या माध्यमातून मला सांगायला आनंद आहे, की रायगड जिल्ह्यामध्ये सार्वजनिक आरोग्य विभागाच्यावतीनं सांगितलं, की इथं सगळ्याच गोष्टी विशेष बाब आहेत. म्हणजे आत्ता आम्ही जे आदितीच्या सातत्याच्या पाठपुराव्यानी माननीय मुख्यमंत्र्यांकडे आम्ही विशेष फाईल पाठवली आणि जी कदाचित कुठल्याही जिल्ह्यात नाही. परंतु, तालुकास्तरावर महिलांचं शंभर खाटांचं हॉस्पिटल जर



होत असेल तर ते रायगड जिल्ह्यामध्ये भुवनेश्वर, ता. रोहामध्ये होत आहे हे मला याठिकाणी सांगितलं पाहिजे. आता माननीय मुख्यमंत्र्यांनी त्याला मान्यता दिलेली आहे. आज आम्ही इथं आहोत. उद्या गेल्यानंतर जीआरवर सही करू आणि निश्चितप्रकारे उद्या ही गोड बातमी आम्ही पालकमंत्र्यांपर्यंत पोहोचवू एवढं मी याठिकाणी तुम्हाला सांगू इच्छितो.

पण, ही विशेष बाब यासाठी, की तुमचा भौगोलिक दृष्टीकोन लक्षामध्ये घेऊन वगैरे या सगळ्या गोष्टी केल्या. पण, झाला तरी तिथं उपचार करता येऊ शकतो, ही क्षमता त्या ट्रॉमा केअरमध्ये असते. ती ट्रॉमा केअरची सुविधा आपण त्याठिकाणी माणगावला देतो आहोत. आणि त्यामुळं या सगळ्या गोष्टी मला वाटतं, महत्त्वाच्या बाबी आहेत. आणि त्या सगळ्या निश्चितपणानं येणाऱ्या काळात लवकरात लवकर पूर्ण होतील.

या व्यतिरिक्त जिल्ह्यामध्ये ग्रामीण रूग्णालय, खालापूर, ग्रामीण रूग्णालय, पाली, उपजिल्हा रूग्णालय, उरण,



मला सांगायचंय एवढंच की शक्यतो महिला रूग्णालय आपण जिल्ह्याच्या ठिकाणी करतो. ट्रॉमा केअर सुद्धा आज उपजिल्हा माणगाव याठिकाणी आपण त्याला मंजुरी देण्यात आलेली आहे. आणि म्हणून माणगावचं ट्रॉमा केअर, शंभर खाटांचं वूमन हॉस्पिटल ही एक मोठी रायगड जिल्ह्याच्या दृष्टीकोनातून उपलब्धी आहे आणि त्याने एक चांगली आरोग्यसेवा त्याठिकाणी होऊ शकणार आहे. कारण, ट्रॉमा केअरचा अर्थ आपल्याला माहिती आहे, की ॲक्सिडेंटची कुठलीही केस त्याठिकाणी ऑर्थोपेडिक सर्जन असतो, त्याठिकाणी सगळ्या प्रकारचे इक्विपमेंट्स असतात, आणि कुठलाही मोठा ॲक्सिडेंट

उपजिल्हा रूग्णालय, मसा या सगळ्या ठिकाणी आपण निधीची तरतूद केलेली आहे या बजेटमध्ये आणि या सगळ्या ठिकाणी आपण मोठ्या पद्धतीनं दोन कोटी, तीन कोटीचा जो लागणारा निधी आहे, तो आपण त्याठिकाणी देतो आहोत. ग्रामीण रूग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र याठिकाणी पदनिर्मितीचीही कामे झालेली आहेत. प्राथमिक रूग्णालयांना लागणाऱ्या सर्व सुविधा, ३८ ॲम्ब्युलन्ससुद्धा आपण त्याठिकाणी उपलब्ध करून दिल्या. मला सांगायला आनंद आहे, की ईसीआरपी टूमध्ये, जिथं केंद्र-राज्य शासनाच्या एकत्रित निधीतून जवळजवळ इथल्या सगळ्या उपजिल्हा रूग्णालयांना आयसीयू

आणि पिडियाट्रिक वॉर्डस्‌साठी लागणारे जे बेड्स आहेत, ते सगळे बेड्स प्रत्येकी, म्हणजे मी खासदार साहेबांना, पालकमंत्र्यांना, आपल्या सर्वांना, प्रेसला सांगेन, की जिल्हा रूग्णालय अलिबाग असेल, माणगाव असेल, पनवेल असेल या सगळ्या ठिकाणी आपण आयसीयू बेड आणि पिडियाट्रिक बेड अशी साधारण प्रत्येक रूग्णालयाला ५०-५० त्याठिकाणी दिली आहेत. आणि विशेष तत्त्वानी फिल्ड हॉस्पिटल शंभर बेडचं पनवेलला त्याठिकाणी निर्माण करून देण्याच्यासाठीचा पूर्ण निधी आपण त्याठिकाणी दिलेला आहे.

आणि म्हणून मला हे सांगणं याठिकाणी गरजेचं वाटतं, की हे सगळं सार्वजनिक आरोग्य विभागाच्या माध्यमातून आरोग्यसेवा देण्याच्या दृष्टीकोनातून केलेलं काम आहे. त्याला निधी पूर्ण उपलब्ध करून दिलेला आहे. आणि त्या अनुषंगानी येणाऱ्या काही महिन्यांमध्ये हे काम निश्चितपणानं पूर्णत्वाला येणार आहे. या सगळ्या गोष्टींचा पाठपुरावा सातत्यानी पालकमंत्री करतायंत, पण, मला असं म्हणावं वाटतं, आम्ही आणि तटकरे साहेबांनी ९९ पासून एकत्रपणे काम केलंय, आदरणीय पवार साहेबांनी आम्हाला राज्याच्या मंत्रिमंडळामध्ये घेतल्यापासून आम्ही काम करतो आहोत. तटकरे साहेबांचं काम मंत्री म्हणून आम्ही जवळून पाहतो आहोत. त्यांच्यापासून अनेक गोष्टी शिकलो पण आहोत. पण, आदिती काय कुठल्या गोष्टीत कमी आहे असं नाही. मी आत्ता म्हणत होतो, की बाप से बेटी सवाई है. अशा पद्धतीचं काम आदितीचं त्याठिकाणी निश्चितपणानं सुरू आहे. काम कसं करून घ्यायचं, कुणाकडून करून घ्यायचं, आता हे अवघड काम मुख्यमंत्र्यांकडं सातत्यानं बसून तिनं कितीदा मुख्यमंत्र्यांचं कार्यालय झिजवलं असेल हे मला माहित नाही. पण, सातत्यानी पाठपुरावा करून मी जो शेरा दिला होता, की अतिविशेष बाब म्हणून त्याठिकाणी करावं, त्याला मान्यता घेण्याचं काम तिच्या पाठपुराव्यातून झालेलं आहे.

मला सांगायला आनंद आहे, की आदरणीय अजितदादांना आता आमच्या विभागाच्या ज्या अनेक योजना आहेत, महात्मा जोतिबा फुले जनआरोग्य योजना, बारा कोटी लोकांना आपण सगळ्यांना इन्श्यूरन्स आहे, त्यातून काही बचतीचे भाग झालेत. आता आम्ही कॅथलॅब देतोय, कॅन्सर सेंटर्स देतो आहोत. त्यामुळे या सगळ्या सुविधा आरोग्य विभागाच्यावतीनं आता आपल्या जिल्ह्याजिल्ह्याच्या ठिकाणी मिळणार आहेत. तालुक्याच्या ठिकाणी कधीही एमआरआय आणि कधीही सिटी स्कॅन नसायचेच, परंतु ती सुद्धा देण्याची व्यवस्था सार्वजनिक आरोग्य विभागाच्या माध्यमातून शंभर टक्के येणाऱ्या दोन महिन्याच्या आत केलीच जाईल, हा विश्वास मला आपल्याला सगळ्यांना याठिकाणी व्यक्त करायचांय. त्याशिवाय प्रत्येक तालुक्याच्या ठिकाणी डायलेसिसची सुविधा देण्याचं काम, सोनोग्राफीची सुविधा देण्याचं काम त्याठिकाणी केलं जाणार आहे. त्यामुळं सामान्य माणूस हा आपला केंद्रबिंदू आहे आणि त्याच्या हिताची जपणूक करणं, त्याच्या आरोग्याची खऱ्या अर्थानं काळजी घेणं या दृष्टीकोनातून या सगळ्या उपाययोजना आपण याठिकाणी करतो आहोत आणि आदरणीय पवार साहेबांचंच सगळ्या दृष्टीकोनातून मार्गदर्शन लाभत आहे. पवार साहेब असोत, आदरणीय मुख्यमंत्री महोदय असोत, आरोग्य विषय हा नेहमी बॅकसीटवर असायचा. पण कोरोनानं मला वाटतं त्याला फ्रंटसीटवर आणण्याचं काम निश्चितप्रकारे केलंय. सगळ्यांचेच डोळे उघडलेत. त्या दृष्टीकोनातून आता निधीचा पुरवठा असेल, मनुष्यबळ भरतीचा विषय असेल, मला सांगायला आनंद आहे, १८०० ते २००० डॉक्टर आम्ही ताबडतोबीनं भरण्याचं काम आम्ही केलं. आणि त्यामुळं सगळ्या दृष्टीकोनातून, जसं आपण म्हणतो, कात टाकली, त्या पद्धतीनं आरोग्य विभागानी कात टाकून आपल्या सगळ्यांच्या सेवेत राहण्याचं काम त्याठिकाणी आम्ही करतो आहोत. शासकीय महाविद्यालय आणि रूग्णालयाच्या महत्त्वाच्या कामाला मनापासून शुभेच्छा देतो. जे जे शक्य आहे, ती मदत करण्यासाठी अमित भैय्या आणि आम्ही पुढाकार घेऊ आणि रायगडकरांना प्रॉपर आरोग्य सुविधा पुरवली जाईल, एवढंच सांगतो आणि थांबतो. जय हिंद! जय महाराष्ट्र!!



■■■



# रूग्णसेवेसारखी जगात दुसरी परमेश्वर सेवा नाही : बाळासाहेब थोरात

आज एक ऐतिहासिक प्रकारचा कार्यक्रम आपण इथं संपन्न करतो आहोत. कदाचित असं वाटून जातं, की छोटा कार्यक्रम आहे त्यामानानं, आता कोविडमुळं कार्यक्रम छोटे झालेत. नाहीतर सुनील तटकरेंनी पाच-दहा हजाराचा मेळावा केला असता. परंतु, कोणत्याही नदीचा उगम हा छोटा असतो, पण ती नंतर विस्तीर्ण होत जाते आणि दोन्ही बाजूच्या कडा जनमाणसांना फुलवते. त्यांच्या जीवनामध्ये आनंद निर्माण करते. संपन्नता निर्माण करते. जसा नदीचा उगम, तसा आजचा कार्यक्रम म्हटलं तर वावगं ठरणार नाही.

पुढच्या कालखंडामध्ये अनेक वर्षाकरता जी सेवा इथं होणार आहे, ती अत्यंत महत्त्वाची आहे. खरं तर यानिमित्तानं मी आपल्याला एक सांगेन, की पंडित जवाहरलालजी नेहरूजींचं पहिलं जे पहाटेचं भाषण आहे, त्यामध्ये खूप चांगला उल्लेख केलेला आहे. त्यांनी म्हटलं होतं, की भारताची सेवा म्हणजे भारतीय कोट्यवधी पीडितांची सेवा. म्हणजे दारिद्र्य, अज्ञान, रोगराई हे दूर करणारी सेवा. संधीच्या असमानतेचं उच्चाटन, प्रत्येकाचा अश्रू पुसला जावा याकरता काम करणं म्हणजे भारतमातेची सेवा करणं आहे. संत गाडगे महाराज असं म्हणायचे, अरे, तु देव कुठं पाहतो? दगडात देव पाहतो तु. त्यांच्या शेवटच्या भाषणात ते म्हणतात, की अरे तु देव कुठे शोधतो. कुठं दगडात देव शोधतो. गरीब माणसाच्या डोळ्यात पाहा, त्याचं दु:ख पाहा, त्याचे अश्रू पाहा, ते दूर कर. तुला देव भेटल्याशिवाय राहणार नाही. माझ्या मते आदितीताई असतील, सुनीलजी तटकरे असतील, तुम्ही आणि तुमचे असंख्य सहकारी, जो तुम्ही हा प्रयत्न केला, एक स्वप्न पाहिलं, पाठपुरावा केला. आज साकार होत असताना आभार मानले पाहिजेत, आदरणीय सोनियाजींचे आभार मानले पाहिजेत, आदरणीय पवार साहेबांचे आशीर्वाद महत्त्वाचे, उद्धवजींचे प्रयत्न आणि पुढाकार महत्त्वाचा आहे. म्हणून महाविकास आघाडी आणि म्हणून आजचं भूमिपूजन.

हे सगळं घडलं आणि खरोखर आदितीताई, एखादी चांगली गोष्ट घडत असताना इतिहास घडत असतो हे सांगण्याची गरज नाही. एवढं सगळं घडलं म्हणून आज आपण चांगलं काम करू शकलो. आणि म्हणून हा अत्यंत ऐतिहासिक क्षण आहे. यानिमित्तानं मी आपल्याला सांगेन, की खरं म्हणजे दोन वर्षे आमच्या सरकारचे खूप कठीण काळात गेले. कोविडचं संकट खूप मोठं होतं. पण, या कोविडच्या संकटामध्येसुद्धा आपल्या खूप काही शिकायला मिळालं. विशेषत: वैद्यकीय क्षेत्रातलं खूप शिकवलं. प्रत्येकाला त्रास दिला. यामध्ये उल्लेख मला केलाच पाहिजे, माननीय उद्धवजी ठाकरे, मुख्यमंत्री महोदयांनी पुढाकार

घेऊन व्यक्तिश: लक्ष त्यांचं दोन वर्षे आणि आजही त्यावरच असल्याचं आत्ताच आपण पाहिले. राजेश भैय्यांचं कौतुक तर सगळेच आपण करतो आहोत. ज्या पद्धतीनं मेहनत त्यांनी घेतली आणि त्याचबरोबर वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित देशमुखजी यांनी सगळे महाविद्यालय जे होते आणि त्यांचे जे हॉस्पिटल्स होते, त्यांना ॲक्टिव्ह ठेवण्यासाठी सगळ्या गोष्टी केल्या आणि त्यामुळं महाविकास आघाडी सरकारचं कौतुक कोविडचं संकट ज्या पद्धतीनं हाताळलं गेलं म्हणून देशामध्ये कौतुक झालं ही वस्तुस्थिती आहे. एक नंबरचं काम केलं. आकडे लपवले नाहीत अजिबात. पारदर्शकता ठेवली. जे आकडे लपवत होते, ते शेवटी उघडे पडले. जनतेची खऱ्या अर्थानं सेवा करण्याचा प्रयत्न आम्ही केला, हे नाकारता येणार नाही.

एक उदाहरण तुम्हाला सांगतो. खासगी हॉस्पिटल्सनीही खूप काम केलं. खऱ्या अर्थानं परमेश्वराची सेवा करणाऱ्या आपल्या काही संस्था आहेत. त्यांचा उल्लेख मी मुद्दाम इथे करीन. मुंबईमध्ये ज्यावेळेस आपण जातो, आणि तिथे जी हॉस्पिटल्स आपण पाहतो, म्हणजे सेंट जॉर्ज असेल, जे. जे. हॉस्पिटल असेल, कामा असेल, बीटी हॉस्पिटल असेल, काही महानगरपालिकेची असतील, डीएम असेल, नायर असेल, सायन असेल, कूपर असेल, बाळासाहेब ठाकरे वैद्यकीय महाविद्यालय आहे तिथे. तुम्ही पुण्याला जा, तिथे ससून हॉस्पिटल आहे, औरंगाबादला घाटी हॉस्पिटल आहे, किती सेवा करतात हो ते लोक. हजारो गरीब पेशंट रोज येत असतात आणि तेथील सगळे डॉक्टर्स त्या गर्दीत बुडालेले असतात आणि त्यांची सेवा करत असतात. खरं सांगतो, याच्यापेक्षा दुसरी परमेश्वराची आणि देशाची सेवा नाही.



तशाच प्रकारचं काम आज इथे हजारो गरीब माणसं येतील. त्यांची सेवा घडणार आहे. त्यांच्यावर उपचार केले जाणार आहेत. त्यांना चांगला आनंद देण्याचं काम इथं होणार आहे. म्हणून ही भूमी आता इथून पुढे पवित्र भूमी झाली असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही. हेच खरं देवस्थान असतं. इतकी ताकद या भूमीची पुढच्या कालखंडामध्ये आहे. म्हणून आजच्या या कार्यक्रमाचं महत्त्व अनन्यसाधारण आहे. या मताचा मी आहे. मी आणखी एक-दोन गोष्टींचा उल्लेख करीन, की पुढच्या काळामध्ये आणखी एक महत्त्वाची गोष्ट, जी अमित भैय्यांच्या हातात असेल, मी सांगेन की नर्सिंग कॉलेज लगेच देऊन टाक. कोणत्याही कॉलेजला नर्सिंग कॉलेजशिवाय पर्याय नाही. खरं म्हणजे आणखी आपण पाहतो, आपल्या महाविकास आघाडी सरकारच्या सुरूवातीच्या काळातच आपण राजीव गांधी जीवनदायी योजना सुरू केली होती. ती आता महात्मा फुले योजना म्हणून चालविली जातेय. ही योजना आज खूप माणसांना मदत करतेय ही वस्तुस्थिती मान्य करावी लागणार आहे. मी राजेश भैय्यांना म्हणेन, की याची व्याप्ती कशी वाढवता येईल आणि आणखीन चांगल्या रितीनं कशी चालवता येईल याकडे लक्ष दिले पाहिजे. कारण सर्वसामान्य माणसांना स्वस्तात उपचार देण्याची ताकद या योजनेमध्ये आहे. तिला आणखी ताकदवान बनवण्याचं काम आपण करावं ही अपेक्षा आज मी यानिमित्तानं करतो.

आरोग्याच्या क्षेत्रामध्ये खूप काम आपल्याला करावं लागणार आहे, ही वस्तुस्थिती आहे आणि त्याकरता प्रत्येक नागरिकाचं जर इलेक्ट्रॉनिक कार्ड आरोग्याचं करता आलं तर खूप चांगली गोष्ट होऊ शकते. मला वाटतं या पद्धतीनं शेवटच्या माणसापर्यंत आरोग्याची सुविधा आणि त्याला चांगलं आरोग्य आश्वासित करण्याची जबाबदारी ही शासन म्हणून आपली आहे आणि त्यादृष्टीनं काम आपल्याकडून व्हावं, ही अपेक्षा आहे. याच्याबरोबरीनं हेल्थ किंवा मेडिकल टुरिझम करता आलं तर चांगली गोष्ट आहे. कारण, याच्यामध्ये आपल्या भूमीपुत्राला कामाची संधी मिळणार आहे. रोजगार मिळणार आहे. मला खात्री आहे, की यामध्येही आपण यशस्वी व्हाल. आदिती आणि सुनीलजी यांचे ४८ तास आहेतच. आमचीही फौज आहे जोडीला. त्यांचीही वेळेला काळजी घ्या. आणि एवढे तुम्ही महाविकास आघाडीचे सर्वजण एकत्र कामाला लागलेत, तर अमित भैय्या म्हटले तसे अवघड असं काहीच नाही. तुमचे प्रयत्न, धडपड आहे. त्याला शासनाची साथ आहे आणि त्यामुळंच महाविकास आघाडीनं आणखी पुढं जावं, २०२४च्या अगोदरच, आदरणीय सुनीलजी, आदरणीय पवार साहेबांचे आशीर्वाद, उद्धवजींचं नेतृत्व आहे. आपण पुढं जाऊया. परंतु, २४च्या अगोदर उद्घाटनाला आम्हाला बोलवा. एवढंच यानिमित्तानं आवाहन करतो, तुम्हाला शुभेच्छा देतो आणि माझे दोन शब्द संपवतो.

■■■



# एक तपानंतर रायगडकरांचं स्वप्न पूर्ण होण्याच्या मार्गावर : सुनील तटकरे

एक तपाच्या परिश्रमानंतर आज उसरच्या परिसरामध्ये भव्यदिव्य पद्धतीचं वैद्यकीय महाविद्यालय आणि रूग्णालय याठिकाणी सुरू होतंय. साहेब, या गोष्टीचा आम्हाला मनापासूनचा आनंद आणि अभिमान आहे, की गेल्या चाळीस वर्षांच्या रायगडच्या प्रगतीमध्ये आपला सिंहाचा वाटा राहिला. ज्या आरसीएफला आपण याठिकाणी सन्मानित केलं, तो आरसीएफचा प्रकल्प राज्याचे मुख्यमंत्री असताना ७८ साली आणण्यासाठी आपण त्यावेळचे पंतप्रधान मोरारजीभाई देसाई यांना भेटलात. जेएनपीटीच्या अत्याधुनिक बंदरामुळं देशातील एक पहिल्या नंबरचं बंदर जे पोर्ट आहे जेएनपीटीचं, तेसुद्धा आपण राज्याचे मुख्यमंत्री असताना राजीवजींच्या नेतृत्वाखालील सरकारच्या काळात त्यावेळी रायगडसाठी मिळवलं होतं. माझ्या महाड तालुक्यामध्ये रिलायन्सचा जो प्रकल्प आज आहे, तो त्या कालावधीमध्ये आयपीसीएल नावानं ओळखला जात होता, त्या प्रकल्पाचीही पायाभरणी आपण राज्याचे मुख्यमंत्री असताना झाली. उसरचाही हा गेलचा प्रकल्प आहे, आपण मुख्यमंत्री होता, विलासराव त्यावेळी महसूल खात्याचे मंत्री होते आणि सर्वाधिक जी किंमत इथल्या भूमीपुत्रांना दिली गेली, ती आपल्या नेतृत्वाखालच्या सरकारमध्ये विलासराव महसूलमंत्री असताना दिली गेली.

त्या कालावधीमध्ये मी जिल्हा परिषदेचा अध्यक्ष होतो. गेली ३०-३५ वर्षांचा हा कालखंड नजरेसमोर येतो, अशावेळेला वाढलेलं नागरीकरण, सिडकोच्या भूमीपुत्रांना आपण दिलेला न्याय, कोकण रेल्वेसाठी असलेलं योगदान, कोकणच्या फळबागांसाठी, रोजगारासाठी घातलेली आपण सांगड याच्यामुळं गेले काही वर्ष कोकण नेत्रदीपक पद्धतीची प्रगती त्याठिकाणी करतोय. अशावेळेला उद्धवजींच्या नेतृत्वाखालील सरकारने, अजितदादांच्या नेतृत्वाखालच्या सरकारने, बाळसाहेब आपल्या नेतृत्वाखालच्या सरकारने विशेष करून कोरोनाच्या कालावधीमध्ये आरोग्यविषयक साऱ्या सुविधेची खूप मोठ्या प्रमाणावरती निर्मिती करण्यामध्ये त्यामध्ये लक्ष घातलं. राजेशजी तुमचे आभार मानले पाहिजेत, की आपले हे सबंध जे रूग्णालय आहे, हे वैद्यकीय शिक्षण विभागाला हस्तांतरित करण्यासाठी आपण अनुमती दिलीत.

पण, एवढ्यापुरता सीमित आपण राहिला नाहीत, तर मला आज याठिकाणी सांगायचंय, की त्याचवेळेला आपण शंभर खाटांचं महिलांचं हॉस्पिटल बघितलं होतं.

तीसुद्धा मी अर्थमंत्री असताना भूमिका घेतली होती आणि आज मला उद्धवजींचे, अजितदादांचे, राजेश भैय्या तुमचे आभार मानायचे आहेत, की महाड तालुक्यातले भुवनेश्वर गावी शंभर खाटांचं महिलांच्यासाठी विशेष रूग्णालय रायगड जिल्ह्यातलं आज मंजूर झालेलं आरोग्यमंत्री याठिकाणी सांगतील. मुख्यमंत्री महोदय याठिकाणी बोलले, की रायगड जिल्ह्यातनं राष्ट्रीय महामार्ग जातो. त्यामुळं अपघाताचं प्रमाण वाढतं. अशावेळेला माणगावच्या ठिकाणीसुद्धा एक सेंटर त्याठिकाणी उभं करण्यात आलेलं आहे. नागरीकरण वाढतंय, औद्योगिकीकरण वाढतंय, वेगवेगळे उद्योग त्याठिकाणी येतात. अशावेळेला सगळ्या सुविधा निर्माण करण्याचं काम अतिशय उत्तम पद्धतीनं त्याठिकाणी केलं जातंय आणि मला मनस्वीपणाचं समाधान आहे, की आदिती पालकमंत्री या नात्याने या सर्वच गोष्टींचा तु पाठपुरावा केलास. अजितदादांचं पाठबळ मिळालं. अजितदादांकडे दर पंधरा दिवसांनी राज्यातील महत्त्वाच्या प्रकल्पांचा आढावा घेतला जातो. त्यामध्ये या वैद्यकीय महाविद्यालयाचा समावेश करून घेण्यामध्ये तुला त्याठिकाणी यश मिळालं. आणि आज अनेक वर्षांचं रायगडकरांची प्रतिक्षा यानिमित्ताने सुरू होतेय.

मला आनंद वाटतोय साहेब, की आपण या कार्यक्रमाच्या निमित्तानं याठिकाणी आलात. आमचा केवळ आनंद द्विगुणित केला असं नव्हे, तर नवी पिढी ज्या पद्धतीने आरोग्य, शिक्षण या सर्वच क्षेत्रामध्ये काम करण्याचा प्रयत्न करतीय, या सर्वच कामाला आपले आशीर्वाद यानिमित्तानं मिळाले. याबद्दल खासदार या नात्याने मी मनस्वी शब्दामध्ये याठिकाणी आपले आभार मानतो. राजेशजी आपल्याकडे, मुख्यमंत्र्यांच्याकडे, दादांकडे आपल्या जिल्ह्यातल्या शंभर खाटांचं आयुर्वेदिक कॉलेज आणि डेंटल कॉलेज याचीसुद्धा मागणी आदरणीय साहेबांच्या उपस्थितीमध्ये याठिकाणी करतो. पुन्हा एकदा आपण सर्व मान्यवर या कार्यक्रमाच्या निमित्तानं याठिकाणी आलात. आपल्या सर्वांचेच मनापासून आभार मानून माझे दोन शब्द थांबवतो. जय हिंद! जय महाराष्ट्र!!



समारंभस्थळी शरद पवार, सुनील तटकरे व अनिकेत तटकरे अनौपचारिक गप्पात रमलेले.



■■■

खऱ्या अर्थानं आज रायगड जिल्ह्याचं स्वप्न पूर्ण होत असताना ते सन्माननीय उद्धवसाहेब ठाकरे यांच्या शुभहस्ते आणि आदरणीय पवार साहेब यांच्या अध्यक्षतेखाली होत असतानाच आम्हाला सर्वांनाच मनापासूनचा अभिमान आणि आनंद होत आहे. रायगडकरांची ही स्वप्नपूर्ती होत असताना साहेब, आज आपल्या प्रमुख उपस्थितीमध्ये होत असताना आम्ही सर्वचजण स्वत:ला भाग्यशाली समजतो. राज्याचे सन्माननीय उपमुख्यमंत्री, अर्थ व नियोजन मंत्री यांनी मार्च २०२०मध्ये त्यांच्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये रायगडच्या या शासकीय महाविद्यालयाची आणि रूग्णालयाची घोषणा केली आणि खऱ्या अर्थानं वेगानं सर्व प्रक्रियेला सुरूवात झाली. पण, हे रायगडकरांचे स्वप्न हे आजचं नाहीये, एक-दोन वर्षांचं नाही, तर २०१० साली ज्यावेळेला तत्कालिन अर्थ व नियोजन मंत्री म्हणून खासदार तटकरे साहेब त्याठिकाणी विराजमान होते, त्यावेळेला त्यांच्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये त्यांनी रायगडचं हे वैद्यकीय महाविद्यालयाची घोषणा केली होती. २०१२ साली याला मान्यताही प्राप्त झाली.




# वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय कोकण विभागासाठी देणगी ठरेल

## राज्यमंत्री आदिती तटकरे यांचे विचार

पण, काही तांत्रिक बाबींमुळं त्यावेळेला हे स्वप्न अपूर्ण राहिलं. आणि मग जवळपास दहा वर्षांच्या कालावधीनंतर ज्यावेळेला आदरणीय अजितदादांनी याची घोषणा त्यांच्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये केली, तद्नंतर या वैद्यकीय महाविद्यालयासाठी आणि रूग्णालयासाठी जागेचा विषय आला. त्यावेळेला साहेब आपल्या आशिर्वादाने या महाविकास आघाडी सरकारमध्ये आदरणीय उद्धवजी ठाकरे साहेबांच्या, आदरणीय अजितदादांच्या, आदरणीय थोरात साहेबांच्या मार्गदर्शनाखाली काम करत असताना उद्योग राज्यमंत्री म्हणून उद्योग विभागाच्या माध्यमातून या महाविद्यालयासाठी आम्हाला जागा हस्तांतरित करता आली. त्याचबरोबर महसूल विभागाचीही जागा याठिकाणी जोडून जवळपास ५२ एकर जागा ही आपण या महाविद्यालय आणि रूग्णालयासाठी देत असताना मला मनापासूनचा आनंद आणि समाधान वाटत आहे, की ज्यावेळेला हे मेडिकल कॉलेजची इमारत तयार होईल आणि सलग असं रूग्णालय तयार होईल त्यावेळेला ५०० खाटांचं रूग्णालय यानिमित्तानी या रायगड जिल्ह्यासाठी उपलब्ध होणार आहे.

आज कार्यक्रमाच्या निमित्तानं आवर्जुन

आरोग्य मंत्री राजेश भैय्या आपले आणि आपल्या विभागाचे सुद्धा आभार मानते. कारण, जिल्ह्याचं रूग्णालय आपण वैद्यकीय शिक्षण विभागाला हस्तांतरित केलं. त्यामुळं आज रूग्णालयासाठी असणाऱ्या अडीचशे ते तीनशे खाटांचा उपयोग सुद्धा पहिली बॅच आम्ही सुरू करत असताना याठिकाणी होत आहे. त्याचबरोबर आरसीएफचा आवर्जुन उल्लेख करीन. आज पहिल्या बॅचचा प्रवेश सुद्धा होत असताना जवळपास ७६ विद्यार्थ्यांच्या ॲडमिशनची प्रक्रिया ही पहिल्या राऊंडची पूर्ण झालेली आहे आणि दुसरा राऊंड आणि तिसरा राऊंड हा लवकरच सुरू होणार आहे. अशा वेळेला आरसीएफच्या माध्यमातून आपल्याला त्याठिकाणी त्यांची इमारत आणि त्यांचं इन्फ्रास्ट्रक्चर आणि होस्टेलची व्यवस्था ही त्याठिकाणी होत झाली. जिल्हा नियोजन असेल, त्याचबरोबर वैद्यकीय शिक्षण विभाग असेल, या माध्यमातून जवळपास १७ ते १८ कोटीचा खर्च आपण लेक्चर हॉल्स असेल, ग्रंथालय असेल आणि त्याचबरोबर ज्या इतर सुविधा आपल्या इक्विपमेंटसाठी ज्या सर्व लागतात, या आम्ही प्राप्त करून दिलेल्या आहेत. त्यामुळे यंदाची पहिली बॅच ही आपल्याला काही महिन्यांमध्ये सुरू झालेली पाहायला मिळेल.

आज या आनंदाच्या क्षणामध्ये मी स्वत:ला एक लोकप्रतिनिधी म्हणून भाग्यशाली समजते, की रायगड जिल्ह्याचा खऱ्या अर्थानं उज्ज्वल भवितव्य ठरवण्यामध्ये या वैद्यकीय मेडिकल कॉलेजचा एक मोलाचा वाटा असणार आहे. तुमच्या सर्वांच्याच हस्ते, सन्माननीय मुख्यमंत्री




अमित देशमुख यांचे आदिती तटकरे शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करताना.

असताना या इमारतीसाठी जवळपास ४०६ कोटींची प्रशासकीय मान्यताही शासनाच्यावतीनं प्राप्त झालेली आहे. त्यामुळं खऱ्या अर्थानं भव्यदिव्य अशी ही आरोग्य व्यवस्था आणि त्याचबरोबर आमच्या रायगडवासियांसाठी किंवा सबंध कोकण विभागासाठी ही खऱ्या अर्थानं एक देणगी आहे.

आणि म्हणूनच साहेब, आज या इमारतीचं भूमीपूजन होत असताना मनापासूनचा अभिमान वाटतो, की आज यासाठी लागणाऱ्या ज्या सर्व पूर्तता आहेत या पूर्ण झालेल्या आहेत. केंद्र शासनाची जी एनएफसीची टीम आहे, ही मधल्या काळामध्ये याठिकाणी येऊन गेली. त्यांनी सर्व्हे केला. त्यांचं सर्व इन्स्पेक्शन झालेलं असून, आपल्याला जी केंद्र शासनाकडून एनएफसीकडून मान्यता लागते ही सुद्धा आम्हाला नोव्हेंबर महिन्यामध्ये प्राप्त महोदयांच्या हस्ते, उपमुख्यमंत्री महोदयांच्या उपस्थितीमध्ये, साहेब आपल्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम होत असताना आणि व्यासपीठावर उपस्थित असणारे सर्व मान्यवर मंडळी यांचे शुभाशिर्वाद या उपक्रमाला लाभत असताना मी पुन्हा एकदा आपले ऋण याठिकाणी व्यक्त करते आणि या पुढच्या कालावधीमध्ये ज्यावेळेला ही इमारत तयार होईल, त्यावेळेला खऱ्या अर्थानं आमचं स्वप्न पूर्ण झालं असं आम्ही याठिकाणी समजू. मी आपल्या सर्वांचेच आभार मानून ज्यांनी ज्यांनी या आपल्या सबंध मेडिकल कॉलेज उभारत असताना सहकार्य केलं, वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित भैय्या आपणही याठिकाणी आहात. आपलेही ऋण याठिकाणी व्यक्त करून थांबते. धन्यवाद. जय हिंद! जय महाराष्ट्र!!

# केंद्रसरकारच्या सर्व कारवाया राजकीय सूडभावनेतून–जयंत पाटील




सर्व कारवाया सुडाच्या भावनेतूनच होत आहेत तर काही लोक षडयंत्र रचून राज्यातील प्रमुख नेत्यांना नामोहरम करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्याचा निषेध करण्यासाठी राज्यभरात महाविकास आघाडीतील तीनही घटक पक्षांच्यावतीने आंदोलने करण्यात येतील अशी घोषणा राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी माध्यमांशी बोलताना केली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्यावतीने केंद्रीय सत्ताधाऱ्यांच्या सुडाच्या राजकारणाविरोधात मुंबईच्या चेंबुर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले. यावेळी जयंत पाटील यांनी माध्यमांशी संवाद साधला.

महाराष्ट्रात ज्या सूडबुद्धीने केंद्रीय यंत्रणांचा वापर केला जातोय त्याविरोधात राज्यात आणि देशात जनभावना तीव्र आहे. जनता याबाबत नाराजी व्यक्त करत असून राजकीय सूडभावनेची कारवाई भाजपालाही न परवडण्यासारखी आहे असा टोला जयंत पाटील यांनी भाजपाला लगावला.

नवाब मलिक यांनी सार्वजनिक जीवनात तीस वर्षे घालवली आहेत. त्यांच्यावर झालेली कारवाई केवळ ते केंद्र सरकारविरोधात बोलत असल्यामुळे होत आहे. यासाठी नवाब मलिक यांचा आतंकवादाशी संबंध लावून त्यांच्यावर कारवाई करण्यात आली आहे असा आरोपही जयंत पाटील यांनी यावेळी केला.

ईडी, आयकर विभाग या केंद्रीय यंत्रणा ज्याप्रकारे काम करत आहेत, या सर्व कारवाया सुडाच्या भावनेतूनच होत असल्याचे महाराष्ट्राच्या जनतेला कळून चुकलं आहे. महाविकास आघाडी सरकारने या भूमिकेचा निषेध व्यक्त केला आहे असेही जयंत पाटील यांनी स्पष्ट केले. यावेळी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या नेतृत्वाखाली युवक प्रदेशाध्यक्ष मेहबूब शेख, मुंबई युवक अध्यक्ष निलेश भोसले, मनपाच्या गटनेत्या राखी जाधव, युवती प्रदेश उपाध्यक्षा सना मलिक आदींसह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने या आंदोलनात उपस्थित होते.

## भाजप आमदारांच्या बेशिस्तपणामुळे महामहिम राज्यपालांना सभागृह सोडावे लागले

भाजप आमदारांच्या बेशिस्तपणामुळे महामहिम राज्यपाल यांना सभागृह सोडावे लागले. महाराष्ट्राच्या इतिहासात कधीही न घडलेली दुर्दैवी घटना आज घडलेली आहे अशा शब्दात राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. आम्हीही विरोधी पक्षात होतो पण आम्ही कधीच सभागृहाचा अपमान केला नाही असेही जयंत पाटील म्हणाले. राज्यपाल सभागृहात आले तेव्हा महाविकास आघाडीच्या आमदारांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचा जयघोष करत त्यांचे स्वागत केले. मात्र भाजपच्या लोकांनी गोंधळ घातला. फलकं झळकवली त्यामुळे राज्यपाल महोदय राष्ट्रगीत पूर्ण होण्याआधीच निघून गेले. हा राष्ट्रगीताचाही अपमान आहे असेही जयंत पाटील यांनी सांगितले.

## युक्रेनमधील विद्यार्थ्यांपेक्षा पंतप्रधानांना या देशातील निवडणूका महत्त्वाच्या

शिक्षणासाठी भारतातून युक्रेनमध्ये गेलेल्या विद्यार्थ्यांना भारतात सुखरुप परत आणा असे पंतप्रधानांना ट्वीट करुन सांगितले होते परंतु त्यांना उत्तरप्रदेश आणि इतर निवडणूकांपेक्षा या देशात काहीच महत्वाचे वाटत नाही असा टोला राष्ट्रवादी



काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आणि जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी लगावला आहे. माध्यमांनी युक्रेनमध्ये युध्द सुरू झाले असून भारतातील विद्यार्थी अडकले असल्याचे विचारले असता जयंत पाटील यांनी केलेल्या ट्वीटची आठवण करून दिली. ज्यावेळी निवडणूका देशात सुरू होतात त्यावेळी केंद्रसरकारमध्ये काम करणाऱ्या लोकांना कशातच रस नसतो असा अनुभव आहे असा आरोपही जयंत पाटील यांनी केला. युक्रेन मध्ये आपले विद्यार्थी अडकले आहेत. या विद्यार्थ्यांना लवकरात लवकर परत आणा असे आठ दिवसापूर्वी केंद्रसरकारच्या प्रमुखांचे लक्ष ट्वीटच्या माध्यमातून वेधले होते परंतु कोणतीच कार्यवाही झाली नाही असेही जयंत पाटील म्हणाले.

युक्रेन मध्ये कालपासून युध्द सुरू झाले आहे. या संकटात विद्यार्थी सापडले आहेत. मी ट्वीट करुन मागणी केली त्याचवेळी प्रयत्न केला असता तर आज विद्यार्थी सुरक्षित राहिले असते. आज ते असुरक्षित आहेत. याची नोंद अगोदरच घ्यायला हवी होती परंतु केंद्रसरकारने घेतली नाही आतातरी नोंद घेतील असा विश्वास जयंत पाटील यांनी व्यक्त केला आहे.

## दमणगंगा, एकदरे–गोदावरी राज्यस्तरीय नदीजोड योजनेची कामे त्वरीत सुरु करावीत

दमणगंगा, एकदरे–गोदावरी राज्यस्तरीय नदीजोड योजनेची कामे त्वरीत सुरु करावीत असे निर्देश आज जलसंपदामंत्री जयंत पाटील यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले. विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत या योजनेचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ यांनी योजनेसंदर्भात क्षेत्रिय स्तरावरील तांत्रिक बाबीबद्दल काही महत्वाच्या उपाययोजना सुचविल्या. ज्यामुळे या प्रकल्पाची किंमत कमी होऊ शकेल असे सांगितले.त्यासंदर्भात विभागाने प्रशासकीय मान्यता व इतर बाबींकरीता प्रस्ताव त्वरीत सादर करावे, असे निर्देश मंत्री जयंत पाटील यांनी यावेळी दिले. या प्रकल्पामुळे दुष्काळी भागातील पाणीप्रश्न काही प्रमाणात सुटू शकेल. तसेच सिंचनात वाढ होईल असेही जलसंपदामंत्री जयंत पाटील




यांनी सांगितले. बैठकीच्या सुरुवातीला विभागाच्यावतीने सादरीकरण करण्यात आले. याचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) हा राष्ट्रीय जलविकास अभिकरण (एनडब्ल्युडीए) नवी दिल्ली यांच्यामार्फत तयार करण्यात येत असून हे काम प्रगतीपथावर आहे. लवकरच हा अहवाल जलसंपदा विभागास सादर होऊ शकेल अशी माहिती अधीक्षक अभियंता अ.रा.नाईक यांनी दिली. यावेळी जलसंपदा विभागाचे सचिव (प्रकल्प समन्वय) ए.एन.मुंडे, मुख्य अभियंता नाशिक प्रादेशिक विभाग, डॉ.संजय बेलसरे, कार्यकारी अभियंता सचिन पाटील व इतर अधिकारी उपस्थित होते.

■■■

निवडणूक आयोगाचे रुपांतर 'सरकारी दास'मध्ये करण्याचे महत्कार्य वर्तमान राज्यकर्त्यांनी करुन या आयोगाला पूर्णपणे निष्प्रभ करुन टाकण्यात यश प्राप्त केले. आता तर कशाचा कशाला घरबंध नसल्याप्रमाणे राज्यकर्ते मोकाट वागू लागले आहेत व त्याचे दर्शन या पाच राज्यातील निवडणूक प्रचारातून घडले आहे. यातही कुणी तक्रार केली किंवा कुणी कोर्टातही गेले तरी कोर्ट देखील निवडणुकीबाबतचे सर्वाधिकार निवडणूक आयोगाचे आहेत व त्यात कोर्टाने ढवळाढवळ करणे उचित ठरणार नाही असे सांगून मोकाट राज्यकर्त्यांच्या पथ्यावर पडणारी भूमिका घेत असतात. सर्वंकष व एकाधिकारवादी राज्यकर्ते लोकशाही संस्थांची बाहेरची चौकट कायम ठेवून आतून ती पोकळ व खिळखिळी कशी करतात याची ही ठळक उदाहरणे आहेत आणि त्याचा अनुभव येत आहे.








# निवडणूक प्रचार कसा नसावा!


आकाश लाल

सुमारबुध्दी नेतृत्व असले की एकाधिकारशाहीचा धोका अधिक संभवतो. कारण हे सुमारबुध्दी त्यांची सुमारबुध्दी उघडकीस येऊ नये यासाठी ज्या संस्था–संघटना स्वायत्त असतात त्यांच्यावर सर्वप्रथम आघात करुन त्या नेस्तनाबूत करतात किंवा पंगु करुन टाकतात. एकदा या संस्था–संघटनांनी त्यांचे दास्यत्व पत्करले की सुमारबुध्दी व उथळ व्यक्ती या सुखनैव राज्य करु लागतात. भारतीय परिस्थिती लक्षात घेता आपण निवडणूक आयोगाचे उदाहरण घेऊ. ही एक घटनात्मक आणि स्वायत्त संस्था आहे. लोकशाही पध्दती मधील ती एक अतिशय महत्वपूर्ण अशी संस्था मानली जाते. निःपक्ष, खुल्या आणि भेदभावविरहित तसेच निवडणूक रिंगणातील सर्व राजकीय पक्षांना समान संधी देऊन निवडणुका घेण्याची जबाबदारी या संस्थेकडे असते. त्यासाठी या संस्थेला राज्यघटनेने काही विशिष्ट असे अधिकारही बहाल केले आहेत. निवडणूक आचारसंहिता आणि तिचे काटेकोर पालन ही त्या अधिकारातीलच एक बाब आहे. नुकत्याच पाच राज्यातील विधानसभा निवडणुका पार पडल्या. या निवडणुकांमधील प्रचाराची पातळी पाहता निवडणूक आयोग अस्तित्वात आहे की नाही असा प्रश्न पडावा. बेभान व बेलगाम पध्दतीने मोकाट अशा सांप्रदायिक प्रतीकांचा खुल्लमखुल्ला प्रचारासाठी वापर केला जात होता. हा वापर करणारे सत्तापक्षाचे अत्युच्चपदःस्थ होते. त्यांनी विधिनिषेधशून्यपणा आणि अविवेकीपणा केला आणि निवडणूक आयोगाने हुं की चूं केले नाही. ही एक अत्यंत



लाजिरवाणी अशी बाब ठरली. आयोगाने असा शेळपटपणा करण्याचा जणू विडा उचलला आहे असे वाटू लागले आहे. गेल्या सत्तर वर्षात अशा पक्षपाती, भेदभावयुक्त आणि अत्यंत पुचाट असा निवडणूक आयोग पाहण्यात नाही. दुर्दैवाने गेल्या सात वर्षात निवडणूक आयोगाने पक्षपाती कारभाराची परिसीमा गाठलेली आढळते. त्यामुळेच देशातील लोकशाहीचे भवितव्य धोक्यात आल्याची भावना दृढ होऊ लागली आहे. निवडणूक आचारसंहितेची अशी सरसकट धूळधाण साक्षात राज्यकर्त्यांकडूनच होताना दिसू लागल्याने भविष्यातील निवडणुकांबाबत शंका निर्माण होतेच परंतु या पाच राज्यातील निवडणुकांच्या निकालांबाबतही मनात शंका व प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याखेरीज रहात नाही.

अयोध्येतील बाबरी मशीद उद्ध्वस्त केल्यानंतर १९९६ मध्ये झालेल्या लोकसभा



निवडणुकीत काँग्रेसच्या विरोधात मतदारांनी कौल दिला. कोणत्याच पक्षाला बहुमत न मिळाल्याने त्रिशंकू लोकसभा अस्तित्वात आली होती. यावेळी प्रथमच भाजपला १८२ जागा मिळून तो सर्वाधिक संख्याबळ प्राप्त राजकीय पक्ष झाला होता. साहजिकच त्यांनी सरकारस्थापनेवर दावा सांगितला. सरकार स्थापन केले आणि तेरा दिवसात गडगडले कारण अपेक्षित बहुमत ते प्राप्त करणे त्यांना शक्य झाले नाही. यानंतर प्रादेशिक पक्षांनी एकत्र येऊन संयुक्त आघाडी स्थापन केली. त्यास काँग्रेसने बाहेरुन पाठिंबा दिला आणि एच.डी. देवेगौडा यांच्या नेतृत्वाखाली आघाडी सरकार स्थापन झाले. यावेळी विश्वासदर्शक ठरावावर माजी पंतप्रधान व त्यावेळी काँग्रेसचे संसदेतील नेते पी.व्ही. नरसिंह राव यांचे देवेगौडा यांच्या समर्थनासाठी भाषण झाले. अत्यंत विद्वत्तापूर्ण असे ते भाषण होते. त्यामध्ये त्यांनी काँग्रेसच्या पराभवाची मीमांसा केली होती. राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेचा (प्रिअँबल) संदर्भ देऊन त्यांनी सांगितले की या उद्देशपत्रिकेत समानता, धर्मनिरपेक्षता यासारख्या तत्वांचा उल्लेख आहे. याचा अर्थ असा की सर्व क्षेत्रात समानता या तत्वाचे पालन करणे असा आहे.

निवडणुकीसारख्या लोकशाहीतील अतिशय महत्वाच्या अशा कार्यक्रमात देखील समानतेचे हे तत्व लागू होते. त्यानुसार निवडणुकीत सर्व राजकीय पक्षांना समान संधी मिळणे असा होतो. सर्व राजकीय पक्षांनी एकमेकांबरोबर निवडणूक लढविताना देखील या तत्वाचे पालन करणे अपेक्षित असते. परंतु निवडणुकीत विजय मिळविण्यासाठी काही राजकीय पक्ष हे तत्व विसरुन वाटेल त्या गोष्टींचा अवलंब करतात. काही राजकीय पक्ष त्यांच्याकडे असलेल्या वारेमाप साधनसंपत्तीचा वापर करतात तर काही राजकीय पक्ष अशा काही सांप्रदायिक प्रतीकांचा वापर करतात की ज्यामुळे निवडणुकीत आचारसंहितेनुसार काम करणाऱ्या इतर राजकीय पक्षांची अडचण होते. काँग्रेसने घटनेनुसार समानता आणि धर्मनिरपेक्षतेचे तत्व पाळून प्रचार करण्याचे काम केले. परंतु लोकांच्या धार्मिक भावना चेतविणाऱ्या प्रभु रामचंद्रांसारख्या प्रतीकाचा वापर जर एखाद्या राजकीय पक्षाने केला तर त्यातून मतदारांच्या धार्मिक भावनांना प्रोत्साहन मिळते. अशा परिस्थितीत आचारसंहितेनुसार प्रचार करणाऱ्या काँग्रेससारख्या पक्षाची अडचण होणे अटळ होते. प्रभु रामचंद्रांचे प्रतीक निवडणुकीत प्रचारासाठी वापरणे हा आचारसंहिता आणि राज्यघटनेतील मूल्य व तत्वांचा सरळसरळ भंग आहे. परंतु त्याचा विधिनिषेध न पाळता प्रभु रामचंद्रांच्या नावाने मते मागितली गेली. ही सर्व तात्विक मांडणी करुन नरसिंह राव म्हणाले, ‘अशा परिस्थितीत प्रभु रामचंद्रांसमोर कोण टिकाव धरु शकेल ? कुणीच नाही. त्यामुळेच काँग्रेसला पराभव स्वीकारावा लागला!’ नरसिंह राव यांनी अतिशय विद्वत्तापूर्ण विवेचन केले. ते अनेकांच्या



डोक्यावरुनही गेले. परंतु सर्वसामान्य भाषेत त्याचा अर्थ हाच होता की धार्मिक प्रतीके वापरुन आणि मतदारांच्या धार्मिक भावना गोंजारुन मते मागणे हे घटनाबाह्य आहे परंतु विशिष्ट राजकीय पक्ष त्या मार्गाचा अवलंब करुन मते मिळवितात. हा मार्ग अनुचित आहे परंतु काही राजकीय पक्ष तो अनुसरत असतात. राज्यघटनेने राजकारणासाठी धर्माचा वापर करण्यास मनाई केलेली असताना जर एखादा राजकीय पक्ष धार्मिक प्रतीकांच्या आधारे मते मागू लागला तर ती निवडणूक विषम होते आणि जे राजकीय पक्ष घटनेचे काटेकोरपणे पालन करतात त्यांच्यासाठी ती निवडणूक जिंकणे अशक्यच होऊन बसते कारण धर्माचा पगडा असलेल्या समाजात धार्मिक प्रतीके प्रभावी ठरणे अपरिहार्य असते. त्या परिस्थितीत एखाद्या राजकीय पक्षाने कितीही घटना-सुसंगत प्रचार केला तरी तो परिणामकारक होत नाही. सर्वसामान्य लोकांचा कल धार्मिक प्रचाराने प्रभावित होण्याकडेच अधिक राहतो, म्हणूनच नरसिंह राव यांची ही मीमांसा किंवा विश्लेषण हे उचित पध्दतीने समजावून घेण्याची वेळ आलेली आहे.

नरसिंह राव यांच्या या मीमांसेच्या आधारे या पाच राज्यांमध्ये झालेल्या प्रचाराचे विश्लेषण करायचे झाल्यास कोणते निष्कर्ष निघतील ? प्रचार आठवून पहा. अगदी निवडणूक जाहीर होण्यापूर्वीपासून ते निवडणूक जाहीर झाल्यानंतर देखील धार्मिक ध्रुवीकरण करुन आपल्या पदरात बहुसंख्यक मते कशी पडतील यासाठी आटापिटा करण्यात आला होता. यामध्ये देशाचे पंतप्रधान आघाडीवर होते. त्यांनी वेचून अशा काही धार्मिक स्थळांना भेटी देणे, तेथे जाऊन पूजा-अर्चना करणे, एखाद्या प्रचारसभेत भगवी टोपी घालणे, उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांनी तर बिनधास्तपणे हिंदू विरुध्द मुस्लिम अशा टिप्पण्या करण्याचा सपाटा लावणे या सर्व गोष्टी निवडणूक आचारसंहितेचा उघडउघड भंग होता. परंतु शेळपट निवडणूक आयोगाने यासंदर्भात कोणतेही पाऊल उचलले नाही की संबंधितांना साधी समज देखील दिली नाही. विशेष म्हणजे जे पंतप्रधान विकास व प्रगतीच्या नको इतक्या बढाया मारत असतात, जे मुख्यमंत्री उत्तर प्रदेशाच्या तथाकथित आणि प्रत्यक्षात न झालेल्या विकास व प्रगतीच्या भल्यामोठ्या जाहिराती देत होते त्यांना लोकांच्या धार्मिक भावनांना गोंजारण्याचे कारण काय होते ? विकास व प्रगतीच्या नावाने मते मागण्यात त्यांना कोणती अडचण आली होती ? परंतु प्रत्येक राजकीय पक्षाला विजयासाठी 'शॉर्टकट' हवा असतो. हा शॉर्टकट अशा प्रकारे लोकांच्या मनात एखाद्या भावनिक व भावनाप्रधान मुद्याच्या आधारे उन्माद निर्माण करण्याचा असतो. त्यामुळेच नरसिंह राव यांनी त्यांच्या भाषणात जो एक प्रश्न सखेद उपरोधाने विचारला होता, ' प्रभु रामचंद्रांच्या समोर आम्ही(काँग्रेस) कोण ? या विषम लढाईत श्रीरामच जिंकणे क्रमप्राप्त होते!' यात श्रीरामाचा दोष नाही. त्यांच्या नावाचा दुरुपयोग करणारे रामभक्त त्यास जबाबदार असतात.



असोक लवासा





असोक लवासा यांची प्रशासकीय अधिकारी असलेली मुलगी

परंतु प्रश्न येथेच संपत नाहीत. राजकीय पक्ष अटीतटीच्या लढाईत विजयासाठी आणि प्रतिस्पर्ध्यांना पराभूत करण्यासाठी वाटेल त्या मार्गांचा अवलंब करीत असतील तर त्यांना लगाम घालण्याचे अधिकार राज्यघटनेने निवडणूक आयोगाला दिलेले आहेत. तेच जर त्या अधिकारांचा उपयोग न करता एखाद्या विशिष्ट पक्षाला मोकळे मोकाट रान देत असतील तर इतर पक्षांनी करायचे काय ? म्हणूनच अशा परिस्थितीत निवडणूक आयोगाची भूमिका महत्वाची असते आणि ती त्यांनी ईमानइतबारे पार न पाडणे याचाच अर्थ व्यवस्थेमध्ये

पक्षपाताचा शिरकाव झाला आहे असा निष्कर्ष त्यातून निघतो. यापूर्वी अशोक लव्हासा नावाचे एक निवडणूक आयुक्त होते. त्यांनी पंतप्रधानांच्या या आचारसंहितेचा भंग करणाऱ्या विविध प्रकारांना जेव्हा तीव्र हरकत घेतली होती तेव्हा त्यांना पध्दतशीरपणे निवडणूक आयोगातून बाहेरचा रस्ता दाखविण्यात आला होता. एवढेच नव्हे तर सूडबुध्दी व खुनशीपणा ही व्यवच्छेदक लक्षणे असलेल्या या राज्यकर्त्यांनी त्यांच्या विरोधात एन्फोर्समेंट डायरेक्टोरेट(ईडी)चा ससेमिरा लावला. त्यांची मुलगी जम्मू-काश्मीरमध्ये वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी होती तिचा छळ करण्यात आला. निवडणूक आयुक्तांना काढण्याचा सरकारला अधिकार नसतो कारण या संरक्षक कवचामुळेच ते निःपक्षपातीपणे काम करु शकतात. त्यामुळे लव्हासा यांना काढणे शक्य नसल्याने त्यांचा छळ मांडण्यात आला आणि अखेर त्यांना परदेशी बँकेवर(एशियन डेव्हलपमेंट बँक) भारताचे प्रतिनिधी नेमण्याचा बहाणा करुन आयोगातून हद्दपार करण्यात आले. म्हणजेच निवडणूक आयोगाचे रुपांतर 'सरकारी दास'मध्ये करण्याचे महत्कार्य वर्तमान राज्यकर्त्यांनी करुन या आयोगाला पूर्णपणे निष्प्रभ करुन टाकण्यात यश प्राप्त केले. आता तर कशाचा कशाला घरबंध नसल्याप्रमाणे राज्यकर्ते मोकाट वागू लागले आहेत व त्याचे दर्शन या पाच राज्यातील निवडणूक प्रचारातून घडले आहे. यातही कुणी तक्रार केली किंवा कुणी कोर्टातही गेले तरी कोर्ट देखील निवडणुकीबाबतचे सर्वाधिकार निवडणूक आयोगाचे आहेत व त्यात कोर्टाने ढवळाढवळ करणे उचित ठरणार नाही असे सांगून मोकाट राज्यकर्त्यांच्या पथ्यावर पडणारी भूमिका घेत असतात. सर्वंकष व एकाधिकारवादी राज्यकर्ते लोकशाही संस्थांची बाहेरची चौकट कायम ठेवून आतून ती पोकळ व खिळखिळी कशी करतात याची ही ठळक उदाहरणे आहेत आणि त्याचा अनुभव येत आहे.

निवडणूक आयोग ही घटनात्मक संरक्षण असलेली लोकशाही संस्था आहे. तिची भूमिका अशा रीतीने प्रश्नचिन्हांकित होणे हे प्रामाणिक लोकशाही व्यवस्थेशी विसंगत आहे. तसेच निवडणूक व्यवस्थापनात अपेक्षित असलेले निःपक्षतेचे तत्व आणि निवडणुकीचे पावित्र्य नष्ट करणारे ठरते. परंतु लोकशाही व्यवस्थेतील ही एक यंत्रणा आहे. परंतु लोकशाही व्यवस्था ज्या तीन प्रमुख आधारस्तंभांवर उभी असते त्यापैकी न्यायव्यवस्था किंवा न्यायसंस्थेच्या भूमिकेबाबत देखील अशीच प्रश्नचिन्हे जेव्हा उपस्थित होऊ लागतात तेव्हा लोकशाही व्यवस्थाच कमकुवत होऊ लागते. असाच एक निर्णय नुकताच मुंबई उच्च न्यायालयातर्फे समोर आला आहे. त्याबाबत अनेक कायदेपंडित तसेच घटनातज्ञांनी चिंताही व्यक्त केली आहे. गोव्यातील आमदारांच्या पक्षांतराबाबतच्या




सुशील चंद्रा   अनुप चंद्रा पांडे   राजीव कुमार



निवडणूक आयोग इमारत,नवी दिल्ली

प्रकरणातील हा निकाल आहे. विधानसभेच्या गेल्या निवडणुकीनंतरच्या काँग्रेस आमदारांच्या पक्षांतराची ही प्रकरणे आहेत. त्यावर निर्णय केव्हा होतो तर पाच वर्षांनंतर पुढची निवडणूक होते त्यावेळी! यावरुनच न्यायसंस्थेच्या कार्यक्षमतेबाबतही प्रश्नचिन्ह उपस्थित झाल्याखेरीज रहात नाही. परंतु न्यायालयाने जो निर्णय दिला आहे तो पक्षांतरबंदी कायद्याशी पूर्णपणे विसंगत असल्याचे मत कायदेतज्ञ व लोकसभेचे माजी महासचिव पीडीटी आचारी यांनी व्यक्त केले आहे. किंबहुना या कायद्याचा चुकीचा अर्थ कोर्टातर्फे लावण्यात आल्याचे मत त्यांनी व्यक्त केले आहे. ही बाब गंभीर आहेच परंतु कायद्याचे आपल्या सोयीनुसार आणि चुकीचे अर्थ न्यायालयांनी लावणे हे लोकशाहीच्या अस्तित्वाप्रमाणेच भवितव्यालाही धोकादायक ठरणारे आहे. अशी परिस्थिती निर्माण झाल्यास उचित न्याय कोण देणार आणि कायद्याशी सुसंगत न्याय नागरिकांना कसा मिळणार हे प्रश्न निर्माण झाल्याखेरीज राहणार नाहीत. न्यायच मिळणार नसेल तर लोकांनी कुणाकडे जायचे हा प्रश्न नुसता मनात आणून पहा म्हणजे त्याचे परिणाम किती भयंकर आहेत हे लक्षात आल्याखेरीज राहणार नाही. त्यामुळेच गोव्याच्या फुटीर व फितूर आमदारांच्या या प्रकरणात कोर्टाने पक्षांतरबंदी कायद्याच्या लावलेल्या चुकीच्या अर्थामुळे पक्षांतरासाठी मोकाट रानच निर्माण होणार आहे हे आचारी यांनी स्पष्टपणे व साधार दाखवून दिले आहे. गोव्यात विधानसभा निवडणूक झाली आहे आणि बरोबर नेमक्या निवडणूक निकालाच्या वेळीच असा निर्णय समोर येणे (पाच वर्षांनंतर) याला योगायोग म्हणावे की आणखी काही ? यामुळे पक्षांतराला रान मोकळे होणार असल्याने गोव्यात या वेळी देखील कुणाचे सरकार स्थापन होऊ शकते याचा अंदाज यामुळे बांधणे अवघड नाही. विद्वान कोर्टाने पक्षांतरबंदी कायद्याच्या लावलेल्या अर्थानुसार मूळ काँग्रेस पक्षात दोन-तृतीयांश फूट पडल्याचे निरीक्षण मांडून त्याचे प्रतिबिंब गोव्यातील काँग्रेस विधिमंडळ पक्षात पडले (काँग्रेसच्या पंधरापैकी दहा आमदारांनी फितुरी केली) आणि त्यामुळे या आमदारांनी केलेले पक्षांतर हे वैध आहे व त्यांचे सदस्यत्व रद्द करण्याची आवश्यकता नसल्याचा अजब न्याय विद्वान न्यायालयाने केला. मूळ पक्षांतरबंदी कायद्यात केवळ विधिमंडळ पक्षातील फूट ग्राह्य मानली जात नाही. तर जो पक्ष मूळ आहे त्यामध्येही दोन-तृतीयांश फूट झाली तरच फूट ग्राह्य मानण्याची तरतूद आहे. परंतु बहुसंख्य पक्षांतराच्या प्रकरणात विधिमंडळ पक्ष आणि विधिमंडळाबाहेरचा मुख्य किंवा मूळ पक्ष यांचे स्वतंत्र अस्तित्व मानण्याचे प्रकार केलेले आढळतात. म्हणजेच या कायद्याचा सोयीनुसार अर्थ लावला गेला. गोव्याच्या प्रकरणात न्यायालयाने विधिमंडळ पक्षापुरती आपली निरीक्षणे व मते मर्यादित ठेवली असती तर कदाचित तेवढा वाद निर्माण झाला नसता. परंतु जी गोष्ट अस्तित्वात नाही ती गृहीत धरुन न्याय करण्याचा प्रकार अजब आणि काहीसा शंकास्पद वाटतो. मुख्य किंवा मूळ काँग्रेस पक्षात दोन-तृतीयांश फूट झाल्याचे न्यायालयाने परस्पर (आणि बहुधा त्याबाबतची वस्तुस्थिती नीट पडताळून न पाहता किंवा त्याची योग्य छाननी न करताच) जाहीर करुन टाकले हे अक्षरशः विचित्र आहे. त्यामुळेच अशा चुकीच्या माहितीवर आधारित केलेला न्याय किंवा निर्णय याची विश्वासार्हता, त्याची वैधता किती आणि कशी मान्य करायची ? वर उल्लेख केल्याप्रमाणे वरील निर्णयाचे 'टायमिंग' हे देखील सूचक आहे.



**लोकसभेचे माजी महासचिव, पीडीटी आचारी**

वर उल्लेख केलेली ठोस उदाहरणे पाहता परिस्थिती किती गंभीर आहे याची जाणीव व्हावी. राज्यकर्त्यांची पावले कशी पडत आहेत याची सुयोग्य आणि उचित दखल सुजाण नागरिकांनी घेण्याची गरज आहे. या प्रकारांची दखल घेऊन त्याचा प्रतिकार न केल्यास देशात एकाधिकारशाही येण्यापासून कुणी रोखू शकणार नाही. त्यानंतर जागे होण्याने काहीही उपयोग होणार नाही कारण तोपर्यंत सर्वंकष आणि एकाधिकारवाद्यांनी आपली पकड पूर्णपणे प्रस्थापित केलेली असेल. सजग राजकीय नेते, लोकशाही व राज्यघटनेशी प्रामाणिक बांधिलकी मानणारे राजकीय पक्ष आणि देशहितासाठी स्पष्ट भूमिका घेणाऱ्या मंडळींनी सावध होण्याची ही वेळ आहे. त्यांच्या एकत्रित प्रयत्नातून कदाचित या देशाची लोकशाही वाचू शकेल अशी आशा करण्यापासून तूर्तास तरी अन्य कोणता मार्ग दिसत नाही!

■■■

# ओबीसींचा लोकप्रतिनिधीत्त्वाचा अधिकार हिरावून घेता कामा नये म्हणून राज्यसरकार आग्रही

## अजित पवार यांचे उद्‌गार



राज्यात आता ७५ टक्के निवडणूका होत आहेत. किमान त्यात तरी ओबीसींचा लोकप्रतिनिधीत्व करण्याचा अधिकार हिरावून घेता कामा नये म्हणून राज्यसरकार आग्रही असल्याची भूमिका विधानपरिषदेत स्पष्ट केली अशी माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी माध्यमांशी बोलताना दिली. एवढा मोठा वर्ग असणारा ओबीसी समाज हा निवडणुकीपासून वंचित रहावा असे कुठल्याही राज्यसरकारला वाटणार नाही असेही अजित पवार म्हणाले.

कुठल्याही प्रभाग रचना पूर्ण झाल्या तरीदेखील बाकीची मतदारयादी आणि प्रक्रिया करायला काही महिन्यांचा काळ जातो असेही अजित पवार यांनी स्पष्ट केले.


ओबीसी आरक्षणाचा मुद्दा क्लीअर होत नाही तोपर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होऊ नयेत याबद्दल राज्यातील तमाम लोकप्रतिनिधींचे एकमत आहे त्यामुळे निवडणुकीचा मुद्दा पुढे येत नाही पण तो अधिकार शेवटी राज्यातील निवडणूक आयोगाचा आहे असेही अजित पवार म्हणाले.

राज्यातील १०५ नगरपंचायतींच्या निवडणूका ओबीसी आरक्षणाशिवाय घेऊ नये असा ठराव मागील अधिवेशन व कॅबिनेटमध्ये घेण्यात आला होता. परंतु निवडणूक आयोगाला स्वायत्तता दिलेली आहे. त्या स्वायत्ततेच्या आधारे निवडणूका घ्यायच्या ठरवल्या आणि १०५ नगरपंचायतींच्या निवडणूका झाल्या असेही अजित पवार यांनी सांगितले.

आजूबाजूच्या राज्यातील एसटीचा विचार करता जेवढं देणं शक्य होतं तेवढं देण्याचा प्रयत्न परिवहन मंत्री अनिल परब यांनी मुख्यमंत्र्यांशी चर्चा करुन घेतलेला आहे अशी माहितीही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी यावेळी दिली.

एसटी कर्मचारी एसटीचे विलिनीकरणच पाहिजे अशी मागणी करत होते. त्यांना प्रत्येकाने अशी भूमिका घेतली तर कुणीही राज्यकर्ते असले तरी त्यांना ती न परवडणारी आहे. त्यामुळे टोकाची भूमिका घेऊ नका. संप मागे घ्या व कामावर रुजू व्हा. परंतु त्यांच्या मोठ्याप्रमाणावर अपेक्षा होत्या असेही अजित पवार म्हणाले. आम्हालाही माहित नव्हते अहवाल काय येणार. शेवटी अहवाल पाहिल्यानंतर बाकीच्या गोष्टीमध्ये मिळणारा पगार हा कमी होऊ नये म्हणून खबरदारी घेतलेली दिसते. तीन वर्षात बारा हजार कोटीचा भार व जबाबदारी राज्यसरकारवर आली असल्याचेही अजित पवार यांनी सांगितले. राज्यपाल हे एक मोठं पद आहे. महत्त्वाच्या पदावर बसलेल्या व्यक्तीने बोलत असताना आपल्यावर सगळ्यांचे लक्ष असते हे लक्षात ठेवावे आणि विचार करून शब्द बोलायचा असतो अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राज्यपालांच्या वक्तव्याचा समाचार घेतला. राज्यातील मनपा, जिल्हा परिषद व पंचायत समितींच्या मुदती संपल्यावर त्यावर प्रशासक नेमण्यासाठी राज्यसरकारने त्याठिकाणी असणारे आयुक्त, मुख्य कार्यकारी अधिकारी, गटविकास अधिकारी हेच प्रशासक राहतील असे सूत्र ठेवले असल्याचेही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले.

■■■



# ओबीसी आरक्षणावरुन चिखलफेक करण्याऐवजी एकत्र या; मात्र भाजपला राजकारण करायचं आहे- छगन भुजबळ

ओबीसी समाजाचे राजकीय आरक्षण वाचविण्यासाठी एकमेकांवर चिखलफेक करण्याऐवजी सभागृहातील सर्व सदस्यांनी एकत्र येऊन यावर मार्ग काढला पाहिजे मात्र विरोधकांना राजकारणच करायचे आहे असे मत अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी विधानसभेत व्यक्त केले. विधानसभेचे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी सुप्रीम कोर्टाच्या निकालावर सभागृहात विरोधकांची भूमिका मांडली. त्याला उत्तर देत असताना छगन भुजबळ यांनी राज्यसरकारची भूमिका सविस्तर विषद केली.

ओबीसी आरक्षणाचा अधिकार कोर्टाने नाकारला नाही. राज्यसरकारने जो डाटा दिलाय त्याची छाननी करु शकत नाही, असे कोर्टाने म्हटले आहे. राज्यसरकारने १५ दिवसात कोर्टाने सांगितल्याप्रमाणे सर्व बाबींची पूर्तता केली. मात्र तरीही काही बाबींवर कोर्टाने त्रुटी दाखवल्या आहेत. १५ दिवसात काही गोष्टी राहिल्या असतील तर आपण त्याची पूर्तता करून घेऊ, असे छगन भुजबळ यांनी सभागृहाला सांगितले.

ओबीसींना आरक्षण मिळावे यासाठी सर्वांचे एकमत झाले आहे. त्यामुळे सर्वजण एकत्र येऊन सन्मानाने मार्ग काढू. सर्व पक्ष एकत्र येऊन ओबीसी आरक्षणावर आम्ही एकसंघ आहोत असे देशाला व जगाला दाखवून देऊ असे आवाहनदेखील छगन भुजबळ यांनी केले.

२०१० साली सुप्रीम कोर्टाचा निकाल आल्यानंतर तत्कालीन राज्यसरकारने इम्पिरिकल डाटा गोळा केला. २०१६ साली हा डाटा केंद्रसरकारकडे सुपुर्द करण्यात आला होता. त्यावेळी राज्यात भाजपचे सरकार होते. मात्र तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काहीही हालचाल केली नाही. त्यामुळेच ओबीसींचे राजकीय आरक्षण रद्द झाले असा आरोपही छगन भुजबळ यांनी यावेळी केला. मध्यप्रदेश आणि छत्तीसगड या राज्यांनी कायद्यात जशी दुरुस्ती करून ओबीसींचे आरक्षण टिकविले त्याच धर्तीवर महाराष्ट्र सरकारही अधिवेशनात नोटीफिकेशन काढून ओबीसींचे आरक्षण टिकविण्याचा प्रयत्न करेल अशी ग्वाही छगन भुजबळ यांनी सभागृहात बोलताना दिली.

■■■

गोरेगावला आल्याच्यानंतर दोन गोष्टींची मला प्रामुख्यानं आठवण होते. एक तर हा घरबांधणीचा कार्यक्रम आहे आणि लहान उत्पन्नाच्या आणि मध्यम वर्गाच्या घरांच्या प्रश्नाची सोडवणूक करण्याच्यासाठी मुंबई शहरामध्ये ज्यांनी अनेकांनी संघर्ष केलेला आहे, अशा संघर्ष करणाऱ्या व्यक्तींच्या नाममालिकेमध्ये मला प्रथम मृणालताई गोरे यांची आठवण होते. मृणालताई, मला आठवतंय, मी राज्यामध्ये मंत्री होतो, गृहखात्याचा मंत्री होतो, आणि त्या उपोषणाला बसल्या होत्या. घर बांधणीच्यासाठी आम्हाला जागा पाहिजे म्हणून. वसंतदादा मुख्यमंत्री होते. हा प्रश्न कसा सोडवायचा, मार्ग काय काढायचा याची चर्चा होत होती. मला आठवतंय, की मला वसंतदादांनी बोलवून घेतलं आणि हा कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न होऊ द्यायचा नाही, हा प्रश्न सोडवायचा, काही करुन आपण यांना जमीन द्यायची आणि यातनं काहीतरी मार्ग काढायचा आणि त्यासाठी तू लक्ष घाल म्हणून मला सांगितलं. इथं एक उद्योजक श्रीयुत



**मुंबईतल्या सिद्धार्थनगर, गोरेगाव पश्चिममध्ये पत्रा चाळीच्या ६७२ कुटुंबांच्या घराचे कामाचा भूमीपूजन सोहळा २२ फेब्रुवारी रोजी झाला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी केलेले भाषण...**

वाडिया, त्यांची एक मोठी जमीन होती. त्या वाडियांच्याकडून आम्ही ती जमीन राज्य सरकारला घेतली नामधारी किमतीनं आणि मृणालताईनं तिथं मला आठवतंय नाव बरोबर असेल तर अपना घर सोसायटी नावाचा एक कार्यक्रम त्यांनी हातामध्ये घेतला आणि तो राबवला. नागरी निवारा परिषद. तो संबंध मुंबई शहरातल्या मध्यमवर्गियांना आणि कष्टकऱ्यांना स्वत:च्या मालकीची एवढी चांगली घरं होऊ शकतात याचा एक आदर्श मृणालताईंनी करून दाखवलेला होता.

# टीका-टिप्पणीची फिकीर न करता विकासकामे करा

**शरद पवार**





आज ज्या मैदानात आपण आहोत. इथेही एकदा त्यांच्या जाहीर सभेसाठी मी आलो होतो आणि एक काळ असा होता, की गोरेगाव म्हणल्याच्यानंतर मृणालताई ही बाब नागरिकांच्या अंत:करणामध्ये जाऊन बसलेली होती. आज त्या नाहीयेत. पण त्यांना ज्या प्रश्नाच्यासंबंधीची आस्था होती. त्या प्रश्नामध्ये राज्याचे मुख्यमंत्री, राज्याचे गृहनिर्माण मंत्री, राज्याचे उद्योगमंत्री आणि त्यांच्या सगळ्या सहकाऱ्यांनी मनापासून लक्ष घातलं आणि आज याठिकाणी एका ठराविक कालावधीमध्ये हे स्वप्न पूर्ण होईल या प्रकारच्या विश्वासाचं चित्र याठिकाणी निर्माण होतंय. घर, निवारा या काही लहान सहान गोष्टी नाहीत. पण, हे जे आघाडीचे सरकार आहे, त्या आघाडीच्या सरकारने काही गोष्टी हातामध्ये घेतल्यात आणि त्या गतीनंच पूर्ण करायचा निर्धार केलेला आहे. त्याच्यामध्ये निवास हा एक महत्त्वाचा प्रश्न हातामध्ये घेतलांय.



मुंबई शहरामध्ये वरळीला बीडीडी चाळीचा प्रश्न अनेक वर्षांपासून पेंडिंग होता. त्याचं भूमीपूजनही एक-दोनदा झालं होतं. पण, त्या कामाला गती नव्हती. जितेंद्र आव्हाडांनी जबाबदारी घेतल्याच्यानंतर, मुख्यमंत्र्यांचं मार्गदर्शन घेतल्याच्यानंतर त्या कामाला सुरूवात केली आणि आज आपण त्याठिकाणी गेल्याच्यानंतर प्रत्यक्ष घरं त्याठिकाणी बांधण्याचं काम गतीनं सुरू आहे हे चित्र बघायला मिळतंय. आणि म्हणून निर्धार हा आहे, की हे काम कुठल्याही परिस्थितीमध्ये आज आम्ही करून टाकणार. माझी त्यांना एक सूचना आहे, या सगळ्या वर्गाच्यासाठी जो कार्यक्रम तुम्ही हातामध्ये घेतलांय तो राबवा. आणखीन एक वर्ग असा आहे, की ज्याच्या निवासासाठी थोडं अधिक लक्ष द्यायला पाहिजे आणि तो वर्ग म्हणजे पोलिस कॉन्स्टेबल. आज महाराष्ट्रातल्या अनेक ठिकाणी पोलिस स्टेशन आहेत, पोलिसांच्या जुन्या निवासी जागा आहेत. ती जी घरं आहेत ती अतिशय वाईट स्थितीमध्ये आहेत, जागा मोठी आहे,

घरं चांगल्या स्थितीमध्ये नाहीत, दिवसातले सोळा सोळा तास काम करणारा हा जो आपला रक्षक आहे, कमीत कमी त्याच्या कुटुंबातल्या लोकांना चांगला निवारा हा देण्याच्यासाठी आपण लक्ष घालूया म्हणून महाराष्ट्रातलं गृह खातं आणि महाराष्ट्रातलं गृहनिर्माण खातं यांनी दोघांनी एकत्र बसावं, प्रस्ताव तयार करावा, त्याला काही प्रमाणामध्ये कमर्शियल अँगल आणून त्यातनं उत्पन्न तयार करून त्या उत्पन्नातून पोलिसांच्या क्वार्टर्स बांधून घेता येतील अशा प्रकारचा कार्यक्रम तयार करून मंत्रिमंडळाची मान्यता घेऊन या कामाला गती द्यायची भूमिका घेतली, तर माझी खात्री आहे, की महाराष्ट्रातला ठिकठिकाणचा आपला रक्षक आणि त्याचे कुटुंबीय हेसुद्धा समाधानानं या कामात लक्ष घातल्याशिवाय राहणार नाही.

आज मुंबईसारख्या शहरामध्ये झोपडपट्टी हा फार महत्त्वाचा प्रश्न आहे आणि त्या प्रश्नाची सोडवणूक करण्याच्यासाठी धाडसानं प्रकल्प हातामध्ये घेतले पाहिजेत. टीका-टिप्पणी होईल, त्याबद्दलचे आरोप केले जातील. पण, स्वच्छ कारभार करण्याबद्दलचा निर्धार आपला असल्यामुळं आणि त्या रस्त्यानीच आम्ही जाणार ही भूमिका आमची स्पष्ट असल्यामुळं त्याची कधी चिंता करू नका. अनेकवेळेला आरोप केले जातात. त्याच्यात तथ्य नसतं आणि आरोप केले म्हणून काम करायचं थांबलो तर त्याचे दुष्परिणाम हे शेवटी सामान्य माणसाच्या विकासाच्या बाबतीत होतात.

मी अनेक वर्षे सार्वजनिक जीवनात काम करतोय. अनेक प्रकारचे उपक्रम महाराष्ट्रात आणि देशात आम्ही राबवले. कधी काही टीका-टिप्पणी झाली. आरोप झाले. त्याची कधी फिकीर बाळगली नाही. अनेकांनी आरोप केलेले होते. पण, ते आरोप केलेले नंतर खरे नाहीत हे सिद्ध झालं. आणि हे सिद्ध झाल्याच्याबरोबर आरोप करणाऱ्यांना पुढं बोलता आलं नाही. आणि म्हणून तुम्ही जो आत्ता याठिकाणी कार्यक्रम घेतलांय, हा कार्यक्रम गतीनं पूर्ण करायचा असेल, अनेक ठिकाणी असे उपक्रम राबवायचे असतील, तर त्याच्याबद्दल लोकांच्या मनामध्ये समाधान तर नक्की येईल. पण काही घटक हे नाराज होतील. आरोप करीत बसतील. त्याची फिकीर बाळगत बसू नका. घरांच्या कामाला जास्तीत जास्त गती द्या. महाराष्ट्रातल्या ज्या ज्याठिकाणी असे उपक्रम घेण्याची शक्यता आहे, त्याठिकाणी धाडसानं निकाल घ्या आणि कामाला सुरूवात करा. माझी खात्री आहे, की राज्याचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, त्यांचे मंत्रिमंडळातले सगळे सहकारी आणि महाराष्ट्राची जनता ही तुमच्या पाठीशी राहिल्याशिवाय राहणार नाही. तेच काम तुम्ही करा. एवढंच याठिकाणी सांगतो आणि या प्रकल्पाची सुरूवात होतेय याचा आनंद व्यक्त करून मी माझे दोन शब्द संपवतो.




■■■

दोन वर्षांपूर्वी महाराष्ट्रामध्ये महाविकास आघाडीचं सरकार ज्यावेळेस आलं, त्यावेळेस महाराष्ट्राचा सर्वांगिण विकास करायचा, अशा प्रकारची भूमिका उद्धव ठाकरे साहेबांच्या नेतृत्वाखाली आम्ही सगळ्यांनी मिळून घेतली. आणि हे काम करत असताना नागरिकरण मोठ्या प्रमाणावर झालेलं आहे, ग्रामीण भागदेखील आहे. परंतु, नागरिकरणाचे प्रश्न आ वासून आपल्या सर्वांच्या पुढे आहेत आणि ते सोडवायचे असेल तर घरांचा प्रश्न खऱ्या अर्थानं सुटला पाहिजे अशा प्रकारची भूमिका आम्ही सगळ्यांनी स्वीकारली.

आत्ता माझ्या आधीच्या वक्त्यांनी इथं आपली आपली भूमिका विषद करत असताना सांगितलं. एक झालं, आम्ही भूमिका आम्ही महाविकास आघाडीतल्या सरकारमधील सर्व सहकाऱ्यांनी स्वीकारली.

अडचणी तर येतच असतात. कमी अधिक प्रमाणामध्ये प्रत्येकाला त्याची किंमत मोजावी लागते. पण, आरोग्याच्या बाबतीमध्ये नागरिकांना आधार देण्याचं काम करायचं, मोठ्या प्रमाणावर व्हॅक्सिनेशन करायचं, आणि त्याचबरोबर वेगवेगळे प्रकल्प मार्गी लागण्याच्याकरता देखील मनापासूनचा प्रयत्न करायचा. याचा उल्लेख माझ्या आधीच्या वक्त्यांनी केला. जितेंद्र आव्हाडांवर गृहनिर्माण खात्याची जबाबदारी आदरणीय पवार साहेबांनी टाकली. जितेंद्रचा तसा संबंध ठाण्याशी होता, आहे, आणि त्याच्यामुळं शहरातल्या समस्या काय आहेत, शहरातले प्रश्न काय आहेत, आपल्याला जर त्याच्यामध्ये




सरकारमध्ये आलो आणि दोन ते तीन महिन्यांनी कोरोनासारखा एक संपूर्ण जगाला आचंबित करणारा अशा प्रकारचा आजार हा जगाच्या समोर आला. आता ह्यांचं कसं होणार, काय होणार, सगळेजण त्याच्यामध्ये विचारात होते. पण, गेल्या दोन वर्षांमध्ये जरी कमी अधिक प्रमाणामध्ये पहिली, दुसरी, तिसरी लाट आली, तरी कुठल्याही परिस्थितीत महाराष्ट्रातल्या विकासाला खीळ बसून द्यायची नाही, अशा प्रकारची पुनर्वसन करायचं असेल, एखाद्या चाळीचं किंवा एखाद्या परिसराचं तर काय काय त्याठिकाणी करावं लागतं त्याबद्धलची बारकाईनं जाण असल्यामुळं त्यांना या विभागाची जबाबदारी दिल्यानंतर त्या सोडवण्याचा त्यांनी मनापासून प्रयत्न केला.

शिवसेनेचं तर बरेच वर्षे मुंबईमध्ये महानगरपालिकेमध्ये काम आहे. उद्धव ठाकरे साहेबांचा पण जन्म आणि संपूर्ण एकंदर वाटचालच मुंबईसारख्या शहरामध्ये झालेली आहे. पण,

# हजारो कुटुंबांच्या घराचं स्वप्न म्हाडामुळे प्रत्यक्षात

**अजित पवार**



बाकीचे सगळेजण आम्ही जरी ग्रामीण भागातनं येत असलो, तरी गेले अनेक वर्षे, ३० वर्षे या मुंबई शहराशी कमी अधिक प्रमाणात आमचा सगळ्यांचा संबंध असल्यामुळं अधिकाऱ्यांना पण सूचना देण्यात आल्या, की याच्यामध्ये कुठल्याही प्रकारच्या अडचणी न येऊ देता आपल्याला त्याच्यातनं मार्ग काढायचा आहे, आणि त्याच्यातनंच आजचा हा दिवस, केवळ सिद्धार्थनगरच्या ६७२ रहिवाशांसाठीच महत्त्वाचा नाही, तर मुंबईतल्या समस्त झोपडपट्टीवासियांसाठी, ज्यांचे रखडलेले प्रश्न आहेत, ज्याचा बीडीडी चाळीचा मघाशी उल्लेख करण्यात आला, धारावीचाही प्रकल्प लवकरात लवकर मार्गी लागावा अशा प्रकारचा प्रयत्न आमच्या महाविकास आघाडी सरकारचा चाललेला आहे, आणि खूप दिवस तुमच्या सगळ्यांचं स्वप्न होतं. बारा वर्षे तुम्ही त्याठिकाणी झगडता आहात, वनवास बारा वर्षांचा असतो, तशा पद्धतीनं वनवास झाला, असं म्हटलं तरी चुकीचं ठरणार नाही.

परंतु, आता कुठंतरी आपलं घराचं स्वप्न पूर्णत्वाला जाईल. हे जात असताना जितेंद्रने मघाशी सांगितलं त्याप्रमाणं फार गतीनं काम त्याठिकाणी करावं लागणार आहे. मंत्रिमंडळामध्ये ज्या ज्या गोष्टीची तुम्हाला मान्यता लागेल. ती ती मान्यता देण्याच्याकरता उद्धव ठाकरे साहेबांच्या नेतृत्वाखाली सगळेजण तयार आहेत. त्याबद्दल आपण काही काळजी करू नका. परंतु, काळ फार वेळ कुणाकरता थांबता नसतो. काम झटपट झाली पाहिजेत. मघाशी जसं सुभाष देसाई साहेबांनी सांगितलं, की इकडचे जे काही बाधित लोकं आहेत, त्यांच्या भाड्याच्या प्रश्नाकरता मिटिंग लावा. माझाही स्वभाव तसाच आहे. मिटिंगला वेळ घालवण्यापेक्षा झटक्यात

निर्णय घ्यायचा, रिझल्ट द्यायचा आणि पुढं जायचं. त्याच्यामुळं चांगला निर्णय तुम्ही इथल्या इथं जाहीर केलेला आहे. माझ्या सगळ्या अधिकारी वर्गाला सूचना आहेत, की त्याची ताबडतोब अंमलबजावणी झाली पाहिजे आणि आम्हालादेखील कळालं पाहिजे. उद्या सगळ्यांनी सांगितलं पाहिजे, की जितेंद्र आव्हाडांनी एक तारखेपासून दिलेला निर्णय, त्याची अंमलबजावणी झाली. एप्रिल फूल होऊ देऊ नका एवढीच माझी विनंती आहे. कारण, ही लोकं इतकी पोळलेली आहेत, इतकी ती भाजलेली आहेत, इतक्या वेगवेगळ्या लोकांनी त्याच्यामध्ये क्वचित राजकारण पण केलं असेल, प्रत्येकजण बाबा तुम्ही मला निवडून द्या आम्ही पत्रा चाळीचा प्रश्न सोडवू.



आणि आता हे पत्रा चाळ म्हणायचं बंद करा. एकवेळ बोली भाषेत पत्रा चाळ म्हणत असतील, पण शासकीय औपचारिक व्यवहारात पत्रा चाळसारखी नावं गाळली पाहिजेत. सिद्धार्थनगर, इतकं उत्तम नाव आहे. त्या पद्धतीनं सिद्धार्थनगर हे नाव देऊन इथून पुढच्या काळामध्ये एक नवी ओळख या परिसराची निर्माण करण्याचा प्रयत्न आपण सगळेजण मिळून करूया. गेल्या दोन वर्षामध्ये आमच्या म्हाडानी, जितेंद्र आव्हाड, सतेज पाटील, त्यांच्या सगळ्या टीमनी मुंबईमध्ये, ठाण्यामध्ये, वसईमध्ये, पुणे, पिंपरी-चिंचवड, कोल्हापूर, सोलापूर या सगळ्या परिसरामध्ये हजारो घरांसाठी आपण लॉटरी काढली आणि अल्प, अत्यल्प, मध्यम उत्पन्न गटातल्या हजारो कुटुंबांचं घराचं स्वप्न पूर्ण करण्याचं काम आपण म्हाडाच्या माध्यमातनं त्याठिकाणी केलेलं आहे. परंतु, मागणी एवढी प्रचंड आहे, त्याच्याएवढं मोठं काम आपल्याला सगळ्यांना करावं लागणार आहे. त्याकरता जितेंद्र, तुम्ही आणि तुमची सगळी टीम यांनी अधिक जोमानं पुढं जावं. तुम्हाला येणाऱ्या अडीअडचणी दूर करण्याच्याकरता राज्याचे प्रमुख या नात्यानी उद्धव ठाकरे साहेब असतील, राज्याचा अर्थमंत्री या नात्यानं मी असेन किंवा बाळासाहेब थोरात असतील, आम्ही सगळेजणं तुम्हा लोकांच्या पाठीमागं आहोत असा शब्द तुम्हाला देतो आणि सगळ्यांची रजा घेतो. जय हिंद! जय महाराष्ट्र!!


■■■



अजित पवार नारळ फोडून प्रकल्पाचे भूमीपूजन करताना शेजारी जितेंद्र आव्हाड, सतेज पाटील, बाळासाहेब थोरात, अस्लम शेख व इतर मान्यवर.

# पत्रा चाळीतल्या लोकांना तीन वर्षांत घराच्या चाव्या देणार

जितेंद्र आव्हाड



साहेब, आपण मंत्रिमंडळाची स्थापना केली आणि मला गृहनिर्माण खात्याची जबाबदारी दिली. ही जबाबदारी घेतल्यानंतर तिसऱ्या दिवशी मी पत्रा चाळीला भेट दिली होती. तिथं साधारण लोकांना भेटलो. येथील रहिवासी बांधवांच्या समस्या आणि प्रश्न समजावून घेतले होते. दुसऱ्यांदा मी परत आलो आणि तिसऱ्यांदा म्हैसकर साहेबांना घेऊन आलो. आणि त्याच्यानंतर सातत्यानं सातत्यानं बैठका घेत गेलो, जॉनी जोसेफ साहेबांची एक कमिटी नेमली. कदाचित कोरोना नसता तर हा जो प्रसंग आहे तो खूप आधी आला असता. पण, कोरोनामुळं संपर्क कमी झाला. जॉनी जोसेफ साहेबांनी मनापासून हा अहवाल तयार केला. तो अहवाल आम्ही म्हाडापुढं ठेवला. त्याला मान्यता घेतली. आणि त्यानंतर पूर्ण प्रकल्पाला कॅबिनेटसमोर नेऊन मान्यता घेऊन आता हे पूर्णत्वाला नेत आहोत. या चाळीतल्या विविध समित्या, संघटना सातत्याने मला भेटायला येत राहिल्या. मी देखील त्यांना वेळोवेळी भेटत राहिलो. येथील लोकांचा प्रश्न लवकरात लवकर सुटावा, यासाठी माझ्या खात्याने देखील ताकदीने प्रयत्न सुरू केले.

माननीय मुख्यमंत्री साहेबांनी मला एका बैठकीत सांगितलं, की जितेंद्र पहिल्यांदा आपल्याला ६७२ लोकं आणि लॉटरीमध्ये ३०६ घरं मिळालेली लोकं, हे जे अस्वस्थ आहेत, त्यांच्या मनात कुठंतरी दु:ख आहे, खंत आहे. त्यांच्या चेहऱ्यावरती आनंद आणला पाहिजे. माझे अत्यंत कार्यक्षम सचिव म्हैसकर, म्हाडाचे उपाध्यक्ष डिग्गीकर, म्हसे आणि बाकीचे सगळेच आम्ही विचार केला, की हा प्रोजेक्ट जेव्हा पूर्ण डेव्हलप होईल, त्यावेळी म्हाडाला अंदाजे साडेतीन हजार कोटी मिळतील. म्हणजे एकही टक्का लॉस आम्हाला इथे कुठेही दिसणार नाही. मला आनंद या गोष्टीचा आहे, की साहेबांची जी शिकवण आहे, की शेवटच्या माणसाला आनंद मिळाला पाहिजे. आपण जे काय करतो, ते गरीबासाठी केलं पाहिजे. मला वाटतं, पत्रा चाळ ही ऐतिहासिक आहे. म्हणजे यांचं अस्तित्व सत्तर ते ऐंशी वर्षे जुनं आहे.

अर्थात या मागे मंत्री महोदय श्री. सुभाष देसाई यांनी केलेला सातत्याचा पाठपुरावा होता, हे वेगळं सांगायला नको. आज मुख्यमंत्री साहेबांनी केलेली ती सूचना प्रत्यक्षात साकारते आहे, हे सांगताना माझी छाती अभिमानाने फुलून येते आहे. या चाळीचा विषय समजावून घेताना काही गोष्टी लक्षात आल्या. अडथळे समजून आले. यानंतर हा विषय

संपूर्ण गांभीर्याने सोडविण्यासाठी म्हाडाने दाखवलेली तत्परता तुम्हाला थोडक्यात सांगतो. सदर प्रश्न सुटावा यासाठी एक नव्हे, दोन नव्हे, तब्बल ४६ बैठका आमच्या खात्याने घेतल्या आहेत. प्रत्येक कॅबिनेट मीटिंगमध्ये हा विषय ताकदीने आम्ही वेळोवेळी मांडत राहिलो, आणि संपूर्ण महाविकास आघाडीचे सरकार यासाठी सातत्याने अनुकूल राहिले, हे विशेष. या कामात जबाबदारीने काम करणाऱ्या माझ्या शासकीय सहकाऱ्यांनी जी मेहनत घेतली, त्याचं मी इथ खुल्या मनाने कौतुक करतो.

थोडक्यात सांगतो, हा प्रश्न सुटावा यासाठी म्हाडाने जी कार्यतत्परता दाखवली, ते पाहता, जर कोरोना नसता तर हा प्रश्न मागेच सुटला असता, हे मी जाणीवपूर्वक सांगतो. आज मी पूर्ण जबाबदारीने सांगतोय, आजवर जसा विश्वास तुम्ही म्हाडावर ठेवला आहे, तसाच विश्वास पुढेही ठेवा. पुढील ३ वर्षात तुमच्या घराच्या चाव्या तर तुमच्या हातात असतीलच. शिवाय आपले थकीत असणारे भाडे देखील आपल्याला लवकरात लवकर मिळेल. शिवाय येणाऱ्या १ तारखेपासून आपले नियमित भाडे देखील वेळेवर मिळेल, असा मी शब्द या ठिकाणी देतो.

आज मुंबईमध्ये सर्वात जास्त जागा या म्हाडाकडे आहेत. गृहनिर्माण मंत्री या नात्याने तुम्हाला एक महत्वाची गोष्ट सांगू इच्छितो, की येणाऱ्या काही वर्षात किमान लाखभर मराठी लोकांना त्यांच्या हक्काची घरे, ही मुंबईत मिळतील, यासाठी मी प्रयत्नशील असेन. म्हाडा म्हणजे फक्त घर बांधणारी एक शासकीय संस्था नव्हे. माझा प्रयत्न असेल की म्हाडा ही एक माणुसकी जपणारी संस्था देखील असावी. कारण माणुसकीची ही भावनाच आपल्याला एकमेकांच्या अजून जवळ आणि शकते, असा माझा विश्वास आहे.

साहेब, म्हाडाचं काम हातात घेतल्यानंतर, गृहनिर्माणचं काम हातात घेतल्यानंतर मला सांगायला आनंद वाटतो, की आऊट ऑफ स्कोप जाऊन म्हणजे म्हाडा म्हणजे बिल्डिंग असं नाही, तर म्हाडा म्हणजे माणुसकी. टाटाच्या रूग्णालयाच्या बाहेर झोपलेले रूग्णांचे नातेवाईक बघून कधी कधी मनाला वाईट वाटायचं, की आपण काहीच करू शकत नाही. बॉम्बे डाईंगच्या जवळ म्हणजे टाटाच्या जवळ आपण शंभर मोठी घरं कॅन्सर हॉस्पिटलच्या नावानं केली आणि आज तिथल्या रूग्णांच्या नातेवाईकांना राहण्याची सोय करून दिली. कोकणात पाऊस आला आणि तळये गाव वाहून गेलं. या तळये गावाचे संपूर्ण पुनर्वसन करण्याचा देखील निर्णय म्हाडाने घेतला आहे. यासोबतच मध्य मुंबईमध्ये विद्यार्थ्यांची सोय व्हावी, या उदात्त हेतूने म्हाडा तब्बल ५०० खोल्यांचे वसतिगृह देखील बांधत आहे. आणि त्याचवेळी 'वर्किंग वूमन'साठी देखील आपल्या चाकोरी बाहेर जात ताडदेव येथे ५०० खोल्यांचे प्रशस्त हॉस्टेल म्हाडा अंतर्गत बांधण्याचा निर्णय गृहनिर्माण खात्याने घेतला आहे. म्हाडा हॉस्पिटल देखील बांधत आहे. गोरेगाव येथे अडीच एकर परिसरात हा प्रकल्प लवकरच सुरू होईल. मुंबईतलं सर्वात मोठं हॉस्पिटल असेल.

म्हाडा आणि गृहनिर्माण खात्याने आपली कात टाकली आहे. येणाऱ्या काळात म्हाडा संपूर्ण महाराष्ट्रात पसरेल, याचा मला विश्वास आहे. पत्रा चाळवासियांच्या चेहऱ्यावर फुललेले हास्य पाहून समाधान वाटले. येथील रहिवासी बांधवांची अनेक वर्षांची इच्छा पूर्ण होतेय. आज हा प्रकल्प पूर्णत्वास जातोय. एक मोठं काम माझ्या कार्यकाळात यानिमित्ताने होत आहे, याचं मला मोठ समाधान आहे. साहेबांच्या हस्ते इथं पुनर्वसनाचा नारळ फुटला, याचा मला अतिशय आनंद होतोय, मला तुमचे अश्रू बघवत नव्हते. तीन वर्षांनी जेव्हा तुमच्या डोळ्यात आनंदाश्रू असतील, तेव्हा नक्की तुमची परत भेट घ्यायला येईन. एवढंच बोलतो. रजा घेतो. जय हिंद! जय महाराष्ट्र!! जय भीम!!!

■■■



# 'पंतप्रधान जी...आपसे नाराज नहीं... हैरान हूँ मैं...' -सुप्रिया सुळे यांची खंत

दिल्ली : पंतप्रधानजी आपसे नाराज नही... हैरान हूँ मैं... माझ्या महाराष्ट्राबद्दल तुम्ही असं कसं बोललात... आमच्यावर का टिका केली... का विरोधात बोललात... का राज्याराज्यात द्वेष पसरवत आहात असा थेट सवाल राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या खासदार सुप्रियाताई सुळे यांनी पंतप्रधानांना आज केला. आज दिल्ली येथे माध्यमांशी बोलताना खासदार सुप्रियाताई सुळे यांनी पंतप्रधानांच्या वक्तव्याने मनस्वी दु:ख झाल्याचे सांगितले.



महाराष्ट्र दिल्लीच्या तख्तासमोर कधी झुकला नाही आणि कधी झुकणार नाही. हा कुठल्या पक्षाचा प्रश्न नाही तर हा राज्याच्या अस्मितेचा प्रश्न आहे. राज्यातील भाजप आमदार खासदारांनी याविरोधात उभं राहिले पाहिजे असेही खासदार सुप्रियाताई सुळे यांनी ठणकावून सांगितले.

लोकशाहीत टिका करण्याचा सर्वांना अधिकार आहे तो लोकशाहीने आपल्याला दिला आहे परंतु पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून अपेक्षा होती की राष्ट्रपतींच्या अभिभाषणावर बोलताना देशाला दिशा देणारे विचार मांडतील परंतु त्यांनी जे वक्तव्य केले त्याने राज्याचा अपमान झाला आहे. पंतप्रधान म्हणून निवडून आल्यावर ते देशाचे पंतप्रधान असतात ते कुठल्या पक्षाचे नसतात याचा विसर त्यांना पडलेला दिसतो असेही खासदार सुप्रियाताई सुळे म्हणाल्या.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वक्तव्याने आम्हा सर्वांना वेदना झाल्या आहेत. आम्ही मराठी आहोत आणि मला मराठी असण्याचा सार्थ अभिमान आहे. का एखाद्या राज्याबद्दल बोलावे. 'सारे जहाँसे अच्छा हिंदोस्ता हमारा' असे आपण म्हणतो तेव्हा या सगळ्या राज्यांमधूनच किती सुंदर भाषा, संस्कार, इतिहास व कल्चरल हेरीटेज देशात आहे हे विसरून कसे चालेल ... इतकी विविधता देशात आहे याची आठवणही खासदार सुप्रियाताई सुळे यांनी करुन दिली आहे.

यावेळी खासदार सुप्रियाताई सुळे यांनी रेल्वेमंत्री पियुष गोयल आणि देवेंद्र फडणवीस यांच्यातील ट्वीटर संवाद व रेल्वे सोडण्याबाबत मानलेले आभार याची कागदोपत्री माहिती पत्रकारांसमोर मांडली. अनेक खासदारांनी महाराष्ट्राने केलेल्या मदतीबद्दल जाहीर व संसदेत आभारही मानले आहेत हेही यावेळी सांगितले.

रेल्वे सोडण्याचा निर्णय हा केंद्रसरकारचा होता तो महाराष्ट्राचा नव्हता. महाराष्ट्राने बस, खाजगी गाड्या दिल्या. रेल्वे महाराष्ट्र सरकार नाही तर केंद्रसरकार चालवते तरी पंतप्रधान असं वक्तव्य करतात हे दुर्दैवी आहे असेही खासदार सुप्रियाताई सुळे म्हणाल्या.

पंतप्रधानांनी राज्यांना दिशा द्यावी. राज्ये अडचणीत आहेत. कोरोनाची तिसरी लाट ओसरत आहे. चीनने नवा प्रश्न निर्माण केला आहे. 'नोकऱ्यांचा प्रश्न यावर काही बोलतील' या अपेक्षेने देश बघत होता. दुर्दैव की आपल्या महाराष्ट्राबद्दल बोलले हे वैयक्तिक मला दु:ख देणारी गोष्ट आहे. असं का महाराष्ट्राबद्दल बोलता आपण... ज्या राज्यांनी फुल ना फुलाची पाकळी १८ खासदार निवडून दिले. तुम्ही पंतप्रधान आहात त्यात सिंहाचा वाटा महाराष्ट्रातील मतदारांचा आहे. त्या महाराष्ट्राच्या मतदारांचा व महाराष्ट्राचा अपमान 'कोरोना पसरवणारा महाराष्ट्र' म्हणून केला हे धक्कादायक व दुर्दैवी असल्याचेही खासदार सुप्रियाताई सुळे यांनी सांगितले.

भाजपचे पंतप्रधान नाही तर तुमचे माझे व देशाचे पंतप्रधान आहेत. पंतप्रधान हे पद पक्षाचे नाही ते संविधानाने दिलेले पद आहे, याची आठवणही खासदार सुप्रियाताई सुळे यांनी करुन दिली. राजकारणाची पातळी इतकी घसरलीय की आपण माणुसकीही विसरणार आहोत. कोण कुणामुळे कोरोना स्प्रेडर होते हे आत्मपरीक्षण करावे हे नवाब मलिक बोलले ते बरोबर होते असेही खासदार सुप्रियाताई सुळे म्हणाल्या.

■■■






# रशिया-युक्रेन संघर्षाचा अन्वयार्थ

अनंत बागाईतकर

रशिया व युक्रेन दरम्यानचा संघर्ष अधिक चिघळावा व तो अधिक व्यापक होत जावा हे कोणत्याच शांतताप्रिय देशाला मान्य होणारे नाही. उलट लवकरात लवकर दोन्ही देशात समेट घडवून आणण्यासाठी आणि त्यांना वाटाघाटीच्या टेबलावर आणण्यासाठी प्रयत्न करण्यास सर्वोच्च प्राधान्याची गरज आहे. भारताने तीच भूमिका घेतलेली आहे. या शांतताप्रिय राष्ट्रसमूहाचा दबाव अमेरिका आणि त्यांच्या युध्दखोर मित्रदेशांवर वाढविण्याची वेळ आलेली आहे. त्या दबावातूनच अमेरिकेला युध्दखोर भूमिकेचा त्याग करावा लागेल.



रशिया व युक्रेनमधील ताज्या संघर्षाला अनेक पैलू व पदर आहेत. त्यामुळे अमेरिका व युरोप पुरस्कृत प्रचारकी बातम्या व माहितीच्या आधारे या संघर्षाचे आकलन करण्याचे ठरविल्यास त्याचे निष्कर्ष तर्कविसंगत निघू शकतात. जागतिकीकरणाच्या वाढत्या विस्तार व व्याप्तीमुळे विविध देशांचे हितसंबंध हे परस्पर निगडित झाले आहेत. ते परस्परावलंबी देखील झाले आहेत. त्यामुळेच ते विचारात घेऊनच या ताज्या घडामोडींचे आकलन करावे लागेल. युक्रेन हा रशियाचा शेजारी देश आहे. युरोप आणि युरोपीय देश आणि रशिया यांच्यामधील 'बफर' म्हणूनही युक्रेनकडे पाहिले जाते. एकप्रकारे या देशाचे स्थान हे मोक्याचे आहे. स्वाभाविकपणेच महत्वाकांक्षा जेव्हा सत्ताधाऱ्यांवर वर्चस्व गाजवू लागते तेव्हा युक्रेनने केली होती. आपल्या दरवाज्यापर्यंत अमेरिका आणि युरोपीय देशांच्या सेना आणि त्याचाच भाग म्हणून त्यांच्या इतर गुप्तचर संस्था, संघटना यांना रशियाच्या सीमेपर्यंत प्रवेश देण्याचा युक्रेनच्या राज्यकर्त्यांचा साहसवाद रशियाला केवळ अमान्यच नव्हता तर रशियाने वारंवार युक्रेनला तसे इशारेही दिले होते. परंतु महत्वाकांक्षेची नशा वेगळीच असते. तसेच झाले. रशियाने युक्रेनच्या साहसवादाला प्रत्युत्तर देण्याचा निर्णय केला.

युक्रेन हा एक समृध्द देश आहे. सोव्हिएत युनियनमधील तो एक अतिशय महत्वाचा सामरिक दृष्टीने अत्यंत मोक्याचा असा प्रांत होता. युक्रेनला सोव्हिएत युनियनचे धान्य कोठार म्हटले जात असे कारण येथे गहू पिकतो आणि रशियाची भूक




संघर्ष अटळ होतात. युक्रेनचे तसेच काहीसे झाले आहे. युरोप आणि अमेरिकेच्या मदतीने रशियाला आव्हान देण्याचा प्रयत्न करण्याच्या नादात या देशाने आज स्वतःवर ही वेळ विनाकारण ओढवून घेतली आहे. पश्चिम युरोपीय देश आणि अमेरिका यांच्या साह्याने आपण रशियाला शह देऊ शकू असा समज युक्रेनच्या राज्यकर्त्यांनी करुन घेतला होता. अमेरिका व युरोपीय देशांनी स्थापन केलेल्या 'नाटो'(नॉर्थ अटलांटिक ट्रीटी ऑर्गनायझेशन) या लष्करी आघाडीला युक्रेनमध्ये तळ स्थापन करुन देण्याची सुविधा पुरविण्याची तयारीही तो भागवत असे. सोव्हिएत युनियनच्या विघटनानंतर हा प्रांत स्वतंत्र देश झाला. भौगोलिक क्षेत्रफळाच्या दृष्टीनेही हा एक मोठा प्रदेश आहे. खनिज व अन्य नैसर्गिक साधनसंपत्तीने हा देश समृध्द आहे. त्यामुळे सोव्हिएत युनियनच्या विघटनानंतर रशियन महासंघाचे द्वार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या देशावर युरोपीय देश व अमेरिकेची नजर जाणे स्वाभाविकच होते. युक्रेनच्या माध्यमातून रशियात अस्थिरता निर्माण करायची हे मनसुबे अमेरिकेसारख्या महासत्तेने मनाशी बाळगले नसते तरच नवल ! नाटोच्या विस्तारात युक्रेनला सामील करुन घेण्याचा

डाव हा त्याचाच भाग. जगात सर्वत्र अस्थिरता ठेवणे आणि जास्तीतजास्त देशांना आपल्यावर अवलंबुन ठेवून एकप्रकारे त्यांना मांडलिक करणे ही अमेरिकेची जुनी नीती आहे. सुधारित स्वरुपात आजही ती अमलात आणली जात असते. युक्रेन हे त्याचे ताजे उदाहरण आहे. एकविसाव्या शतकात अमेरिकेने जगभरात लोकशाही देशांच्या स्थापनेसाठी प्रयत्न करण्याचा एक नवा बुरखा पांघरला आहे किंवा नवा अवतार धारण केलेला आहे. यापूर्वी अमेरिकेने जागतिक पोलिसाची भूमिका करुन अनेक लहानमोठ्या देशात अस्थिरता निर्माण करुन तेथे आपली बाहुली सरकारे स्थापन करण्याचे भरपूर उद्योग केलेले आहेत. अर्थात अशी दादागिरी सदासर्वकाळ चालू शकत नाही आणि अमेरिकेच्या विस्तारवादालाही

गेले होते. अमेरिकेतील लोकांना त्यांचे आर्थिक हितसंबंध चांगलेच कळतात. ट्रंप यांच्या धोरणांमुळे अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेला फटका बसू शकतो हे त्यांच्या लक्षात आले आणि मतदारांनी ट्रंप यांना घरी बसवले. डेमोक्रॅटिक पक्षाला मतदारांनी आपला कौल दिला. जो बायडेन अध्यक्ष झाले. बायडेन यांना ट्रंप यांनी केलेले घोळ निस्तरायचे होते. त्यामुळे त्यांनी चीनबरोबर संघर्षाचे धोरण सौम्य केले. परंतु त्याचबरोबर ट्रंप आणि रशियाचे जे कथित साटेलोटे होते ते नष्ट करण्याच्या दृष्टीने त्यांनी रशियाला केंद्रस्थानी ठेवून आपल्या परराष्ट्र धोरणाची आखणी करण्यास सुरुवात केली. बायडेन हे वयोवृध्द आहेत. अफगाणिस्तानातून अमेरिकन सैन्याला माघारी बोलावून त्यांनी सर्वसामान्य जनतेची प्रमुख



पायबंद बसण्यास सुरुवात झाली. पश्चिम आशियात अमेरिकेने सद्दाम हुसेन, मुअम्मर गद्दाफी यांच्या राजवटी उलथवून टाकल्या. अमेरिकेच्या 'लोकशाहीची निर्यात' या विस्तारवादी कार्यक्रमाचा तो एक भाग होता. इजिप्तमध्येही त्यांनी तसा खेळ करण्याचा प्रयत्न केला परंतु तो यशस्वी होऊ शकला नाही.

डोनाल्ड ट्रंप हे एक तऱ्हेवाईक अमेरिकन अध्यक्ष होते. त्यांना अध्यक्षीय निवडणूक जिंकण्यास रशियाने मदत केल्याचा आरोप त्यांच्यावर होता. परंतु त्यांनी लहरीपणाचा कळस करीत चीनला आपल्या परराष्ट्र धोरणाचे 'लक्ष्य' केले. चीनला नेस्तनाबूत कसे करता येईल या कल्पनेने ते पछाडून

मागणी पूर्ण केली. परंतु आंतरराष्ट्रीय जगतात ते अप्रिय ठरले. त्यातच त्यांनी अफगाणिस्तानची हाताळणी करताना पाकिस्तानला पुन्हा एकदा झुकते माप देण्याची भूमिका घेतली. भारतातील वर्तमान राजवटीच्या मानवाधिकार, सहिष्णुततेच्या धोरणांवर त्यांनी टीका केली आणि त्याचा परिणाम वर्तमान राज्यकर्त्यांना त्यांची अमेरिकेच्या नको इतक्या कच्छपि लागण्याची भूमिका काहीशी बदलावी लागली. बिल क्लिंटन, जॉर्ज बुश, बराक ओबामा आणि डोनाल्ड ट्रंप यांच्या काळात भारत व अमेरिकेच्या संबंधांनी नवी उंची गाठली होती. परंतु बायडेन यांना त्यांचा घसरता जनाधार, घसरती लोकप्रियता

सावरण्यासाठी काही उपाययोजना करणे भाग होते. चीनच्या विरोधात त्यांनी रातोरात ब्रिटन व ऑस्ट्रेलिया यांच्या मदतीने 'ऑकस' नावाने एक नवी लष्करी आघाडी उभारण्याची घोषणा केली. त्याचा पुढील भाग म्हणून रशियाला डिवचणे व त्यासाठी युक्रेनला हाताशी धरण्याचे प्रकार अमेरिकेने सुरु केले. त्याची परिणिती रशिया व युक्रेनच्या वर्तमान संघर्षात झाली.

अमेरिकेच्या कह्यात जाण्याऐवजी काहीशी स्वतंत्र भूमिका अनुसरण्यास वर्तमान भारतीय राज्यकर्त्यांनी सुरुवात केली. हा भारतातील वर्तमान राज्यकर्त्यांच्या परराष्ट्र धोरणातील स्वागतार्ह भाग मानावा लागेल. त्यामुळेच संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा परिषदेत रशियाविरोधी ठरावावर तटस्थ राहण्याची भूमिका भारताने घेतली. त्याचे स्वागतच करावे लागेल. रशिया आणि भारताचे नुसते संबंध नाहीत तर ते घट्ट मैत्रीचे आहेत. आजही संरक्षण साधनसामग्रीपैकी ४९ टक्के खरेदी रशियाकडूनच केली जाते. भारताच्या संकटकाळात रशियाने भारताला साथ दिली आहे. मध्यंतरीच्या काळात दुरावा निर्माण झालेला असला तरी कालांतराने त्यामध्ये दुरुस्ती करण्यात आली. विशेषतः जो बायडेन प्रशासन सत्तेत आल्यानंतर भारत व रशियादरम्यानच्या संबंधांना पुन्हा पूर्वीप्रमाणे उजाळा देण्यात आला हे येथे नमूद करावे लागेल. यामुळेच संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा परिषदेत अमेरिका व युरोपीय राष्ट्रांनी पुरस्कृत रशियाविरोधी ठरावावर भारताने तटस्थ राहण्याची भूमिका घेतली.

भारत व रशियाप्रमाणेच भारत आणि युक्रेन यांचे संबंधही चांगल्या श्रेणीत गणले जातात. एकेकाळी युक्रेन हा सोव्हिएत युनियनचा भाग असताना रशियाकडून येणारा गहू हा युक्रेनमधीलच असे. सोव्हिएत युनियनच्या विघटनानंतर युक्रेन स्वतंत्र देश झाला. भारतही अन्नधान्याबाबत स्वयंपूर्ण झाला. परंतु खाद्यतेलाबाबत भारताला आजही आयातीवर अवलंबुन रहावे लागते. मलेशियातून भारत ज्याप्रमाणे पाम तेल आयात करतो त्याचप्रमाणे युक्रेनमधून भारत सूर्यफुलाचे तेल आयात करीत असतो. दक्षिण अमेरिकेतील देशांमधून सोयाबीनचे तेलही आयात केले जात असते. भारतातील सत्तर टक्के खाद्यतेल हे आयात केलेले असते. त्यापैकी पंधरा ते वीस टक्के खाद्यतेल हे सूर्यफुलाचे असते व ते युक्रेनमधून आयात केले जाते. याखेरीज चांगल्या प्रतीचा कोळसाही आयात केला जातो. नैसर्गिक वायू आणि खनिज तेलाचे मोठे साठे युक्रेनमध्ये आहेत. परंतु अद्याप त्यांचा वापर झालेला नाही आणि त्यांचे खननही झालेले नाही. याचे कारण युक्रेनकडे त्यासाठी लागणारे पायाभूत तंत्रज्ञान आणि सर्वात महत्वाचे म्हणजे आर्थिक क्षमता यांची कमतरता आहे.

सोव्हिएत युनियन अस्तित्वात असताना तत्कालीन राज्यकर्त्यांनी सायबेरियातील नैसर्गिक वायू व तेल उत्खननास प्राधान्य दिले आणि युक्रेनमधील साठ्यांना हातही लावला नाही. सायबेरियातील कच्चे खनिज तेल आणि






नैसर्गिक वायू पाईपलाईनद्वारे पश्चिम युरोपीय राष्ट्रांना पुरविला जातो. त्या पाईपलाईन युक्रेनमार्गेच जातात. जर्मनीसारखा देशातील नैसर्गिक वायू व इंधन तेलाची पन्नास टक्के गरज रशियातर्फे पुरविली जाते. म्हणजेच जर्मनीचे रशियावरील परावलंबित्व लक्षात घेण्यासारखे आहे. अन्य पश्चिम युरोपीय राष्ट्रेही रशियातर्फे होणाऱ्या तेल व नैसर्गिक वायू पुरवठ्यावर मोठ्या प्रमाणात अवलंबुन आहे. याखेरीज युक्रेनमध्ये लिथियम आणि टिटॅनियम धातूचे मोठे साठे आहेत. लिथियम हा सध्या मोठ्या प्रमाणात मागणी असलेला धातू आहे.









टिटॅनियमची खाण



नॅचरल गॅस



लिथियमची खाण

मोबाईल बॅटऱ्या किंवा लिथियम बॅटऱ्यांवर चालणारी विजेच्या वाहनांचे उत्पादन सध्या जगभर प्रचलित होत चालले आहे. त्यामुळे या धातूला मोठी मागणी आहे. विमाननिर्मितीसाठी टिटॅनियम धातू लागतो. त्याचे साठेही मुबलक प्रमाणात युक्रेनमध्ये उपलब्ध आहेत. अमेरिका आणि पश्चिम युरोपीय राष्ट्रांची नजर या साठ्यांवर पडणे नैसर्गिक होते. युक्रेनमधील राज्यकर्त्यांनी पश्चिमी राष्ट्रांच्या मदतीने खनिज व खनन क्षेत्र, तेल व नैसर्गिक वायू या क्षेत्रात परकी गुंतवणुकीला आमंत्रित करणे, त्याद्वारे अमेरिकेसह सर्व पश्चिमी युरोपीय राष्ट्रांचा वावर रशियाच्या दरवाज्यात सुरु होणे आणि त्याचबरोबर रशियाच्या आर्थिक हितसंबंधांचीही यामुळे मोठी पीछेहाट होण्याची परिस्थिती निर्माण होऊ पहात होती. येथपर्यंत सर्व ठीक होते. परंतु युक्रेनने नाटोचे सदस्यत्व स्वीकारण्याची तयारी दाखविणे आणि युक्रेनमध्ये नाटोचा तळ उभारणीस परवानगी देण्यास अनुकूलता दाखविण्याचा प्रकार यामुळे रशियाचा संयम सुटणे स्वाभाविक होते आणि घडलेही तसेच. पश्चिम युरोप आणि अमेरिकेच्या चिथावणीने रशियाच्या विरोधात उभे राहणे आणि एकप्रकारे रशियाच्या वर्चस्वाला आव्हान देणे हे बलाढ्य रशिया सहन करणे कसे शक्य होते. त्यांच्या दरवाज्यातच अमेरिकेला जागा देणे हा रशियाला डिवचण्याचा कळस ठरला. बायडेन यांना रशियाच्या विरोधात जगभरात वातावरणनिर्मिती करण्याची संधी मिळाली. जगातील पत्रकारिता

व प्रसिध्दी माध्यमांवर अमेरिका व युरोपीय हितसंबंधांचा विलक्षण प्रभाव व पगडा आहे. त्यामुळे रशियाच्या विरोधात या माध्यमांनी जगभर प्रचारकी माहिती पसरविण्यास सुरुवात केली. या सर्वाची परिणिती या ताज्या संघर्षात झाली हे विसरुन चालणार नाही. रशियाने युक्रेनवर आक्रमण करायला नको होते हे जेवढे खरे आहे तेवढाच रशियाविरोधी अपप्रचार आणि रशियाचीही यामागे असलेली भूमिका समजून घेणे आवश्यक आहे. दुर्दैवाने भारतातल्या माध्यमांनी हा विवेक न



ठेवता आणि दोन्ही बाजू लोकांसमोर न मांडता अमेरिका व युरोपीय राष्ट्रांची तळी उचलून धरण्याचे धोरण स्वीकारले आणि एकतर्फी बातम्या देणे चालू ठेवले.

युक्रेनवर चढाई करण्यापूर्वी रशियाचे अध्यक्ष व्लादीमिर पुतिन यांनी केलेल्या भाषणाचा संदर्भही येथे द्यावा लागेल.

युक्रेन हा कधीच स्वतंत्र देश किंवा प्रांत नव्हता. कारण तेथील भाषा व संस्कृती ही मूलतः रशियन असल्याचे पुतिन म्हणाले. अगदी झारच्या काळातही युक्रेन हा स्वतंत्र भाग






नव्हता असा दावा करताना त्यांनी १९१७ मध्ये झालेल्या रशियन राज्यक्रांतीनंतरच्या साम्यवादी राजवटीने सोव्हिएत युनियनची स्थापना करताना युक्रेन या प्रांताची निर्मिती केली होती. तसेच सोव्हिएत राज्यघटनेत या प्रांतांना स्वायत्ततेचा अधिकार देण्यात आलेला होता त्यामुळे सोव्हिएत युनियनच्या विघटनानंतर युक्रेनने स्वघोषित स्वातंत्र्याची भूमिका घेतली. साम्यवादी राज्यकर्त्यांनी केलेल्या एका ऐतिहासिक चुकीची दुरुस्ती रशिया करीत आहे असा तर्क त्यांनी भाषणात दिला. याठिकाणी हेही लक्षात ठेवले पाहिजे युक्रेनचा रशियाला लागून असलेला जो भूभाग आहे तेथील काही प्रदेशात रशियामध्ये सामील होण्याच्या चळवळी सुरु आहेत आणि तेथील लोकांनी युक्रेन सरकारशी संबंधही तोडल्याचे जाहीर केल्यानंतर रशियाने तत्काळ संबंधित प्रदेशांना मान्यता देऊन त्यांना रशियात सामील करुन




घेतले. क्रिमियाचाही रशियात समावेश यापूर्वीच करण्यात आला आहे.

जून-१९९१ मध्ये सोव्हिएत युनियनचे विघटन झाले. आता त्या घटनेला ३१ वर्षे झाली. हा थोडाथोडका काळ नव्हे. म्हणजेच रशियाला युक्रेनवर ताबाच मिळवायचा असता तर विघटनानंतरही तसे करता आले असते. परंतु तसे घडले नाही याचाच अर्थ तेव्हा स्थिती सर्वसामान्य होती. परंतु जसे युक्रेनच्या महत्वाकांक्षेला पंख फुटू लागले आणि केवळ पंखच फुटले नाहीत तर रशियालाही डिवचण्याचे प्रकार सुरु झाल्यानंतर रशियाने काही काळ ते सहन केले आणि गोष्टी आवाक्याबाहेर जाताना दिसू लागल्यानंतर त्यांनी आक्रमण केले. थोडक्यात रशिया-युक्रेन संघर्ष हा एका रात्रीतला नाही आणि त्याचप्रमाणे रशियाने केवळ वर्चस्ववाद आणि विस्तारवादाच्या भूमिकेतूनच आक्रमण केले असा सरसकट आरोप करणे फारसे उचित ठरणार नाही. रशिया आणि युक्रेनमधील संघर्षात इतर देशांनी पडू नये आणि युक्रेनबरोबर शिष्टमंडळ पातळीवर बोलणी करण्याची तयारी दर्शवुन पुतिन यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे. त्यामुळे या संघर्षाची व्याप्ती वाढविण्यापेक्षा किंवा तो अधिक चिघळण्यास प्रोत्साहन देण्याऐवजी अमेरिका व पश्चिम युरोपीय राष्ट्रांनीही वाटाघाटी, बोलणी, चर्चा यांच्याद्वारे समेट घडवून आणण्यास प्राधान्य दिल्यास व त्यासाठी योग्य अशा परिपक्वतेचा परिचय दिल्यास संघर्ष चिघळून संभाव्य अनर्थ टाळता येणे शक्य होईल. परंतु अमेरिकेतर्फे युद्धखोर भूमिका घेतली जात असल्याचे चित्र आहे. आपली घसरती प्रतिमा सावरण्याच्या नादात जो बायडेन तिसऱ्या महायुध्दाची भाषा करु लागले आहेत. यापूर्वीच्या महायुध्दांमध्ये अमेरिकेपेक्षा युरोप वाईट पध्दतीने होरपळलेला आहे. कारण युरोपच्या जमीनीवरच ते घडले होते. तेथील जनतेने व काही पिढ्यांनी युध्दाची दाहकता, संहारकता आणि दुष्परिणाम भोगलेले आहेत. म्हणूनच युरोपीय देश रशियाच्या विरुध्द असले तरी हा संघर्ष लवकरात लवकर कसा मिटेल यासाठी ते प्रयत्नशील दिसतात.





विशेषतः या संदर्भात फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्राँ यांनी पुतिन आणि युक्रेनचे अध्यक्ष झेलिन्स्कि यांना भेटून संघर्ष टाळण्यासाठी घेतलेला पुढाकार हा महत्वाचा मानावा लागेल. केवळ रशियावर निर्बंध लादणे, त्यांची नाकेबंदी करण्याने प्रश्न



सुटण्याऐवजी चिघळत अधिक राहील आणि अमेरिका व त्यांचे मित्रदेश नेमकी हीच भूमिका घेताना आढळत आहेत. त्यामुळे फ्रान्ससारखा देश तसेच युरोपातील इतर शांतताप्रिय देश, रशियाचा सहभाग असलेले





विविध विभागीय राष्ट्रसमूह (एससीओ - शांघाय कोऑपरेशन, ब्रिक्स इ.) यांनीही यासंदर्भात पुढाकार घेण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. त्यादृष्टीने एक



विभागीय सत्ता तसेच वरील राष्ट्रसमूहांमधील सदस्य देश या नात्याने भारतावरही जबाबदारी येते.

सुदैवाने अमेरिकेच्या छायेतून बाहेर पडण्याच्या दृष्टीनेही भारताला त्याचा मोठा उपयोग होऊ शकतो आणि त्यातून चीनबरोबरचे तणावलेले संबंधही काहीसे सौम्य आणि सुरळीत होण्यास मदत होऊ शकेल. भारत-अमेरिकेच्या अवाजवी जवळीकीमुळेच चीन बिथरलेला आहे आणि रशिया-युक्रेन संघर्षाच्या पार्श्वभूमीवर भारत व चीनची भूमिका समान राहिलेली असल्याने तसेच भारताने अमेरिकेची री ओढण्याचे नाकारल्याने त्याचा लाभ चीनबरोबरचे संबंध सुधारण्यासाठी घेतला जाऊ शकतो. त्यामुळे या संकटाचेही लाभात रुपांतर करण्याची संधी भारतापुढे चालून आलेली आहे.

रशिया व युक्रेन दरम्यानचा संघर्ष अधिक चिघळावा व तो अधिक व्यापक होत जावा हे कोणत्याच शांतताप्रिय देशाला मान्य होणारे नाही. उलट लवकरात लवकर दोन्ही देशात समेट घडवून आणण्यासाठी आणि त्यांना वाटाघाटीच्या टेबलावर आणण्यासाठी प्रयत्न करण्यास सर्वोच्च प्राधान्याची गरज आहे. भारताने तीच भूमिका घेतलेली आहे. या शांतताप्रिय राष्ट्रसमूहाचा दबाव अमेरिका आणि त्यांच्या युध्दखोर मित्रदेशांवर वाढविण्याची वेळ आलेली आहे. त्या दबावातूनच अमेरिकेला युध्दखोर भूमिकेचा त्याग करावा लागेल. संघर्षाची व्याप्ती अधिक न वाढविण्यासाठी रशियाचाही तेवढाच पाठपुरावा करण्याची गरज आहे. यातून वाटाघाटींसाठी अनुकूल वातावरणनिर्मिती करुनच समेटाच्या दिशेने वाटचाल शक्य होईल. हा जागतिक राजकारण आणि आंतरराष्ट्रीय घडामोडींच्या प्रक्रियेचाच भाग आहे. ती पूर्ण होईपर्यंत प्रतीक्षा करणे सर्वांनाच भाग आहे!

■■■

एखाद्या राज्यात जनतेने भाजपला कौल न देता प्रतिस्पर्धी किंवा विरोधी पक्षाला दिला आणि त्यांचे सरकार स्थापन झाले की जनतेच्या त्या कौलाचा आदर करण्याऐवजी खुनशीपणाने आणि सूडबुध्दीने त्या विरोधी पक्षाच्या सरकारला राज्यात नीटपणे काम करु द्यायचे नाही, त्यांच्या राज्यकारभारात सतत ढवळाढवळ, अडथळे आणून त्यांना बेजार व त्रस्त करणे आणि संधी मिळेल तेव्हा फोडाफोड फाटाफूट करुन त्यांना पदच्युत करण्याचे सतत कारस्थान करीत रहायचे, त्या सरकारला सतत अस्थिर करणे या प्रवृत्तीला नतद्रष्टपणा किंवा खत्रूडपणा म्हणतात. केंद्रस्थानी असलेल्या वर्तमान राज्यकर्त्यांना हे वर्णन तंतोतंत लागू पडते. भारतात अनेक राज्यांमध्ये बिगर भाजपची सरकारे आहेत. ओडीशासारख्या राज्याने केंद्र सरकारबाबत नमते धोरण घेतल्याने त्यांना अभय मिळालेले आहे. आंध्र प्रदेशातील वायएसआर काँग्रेसचे सरकार (मुख्यमंत्री जगनमोहन रेड्डी) यांनीही केंद्र सरकारला न दुखावण्याची भूमिका घेतलेली आहे. तरीही भाजपने तेथे शिरकाव करण्याचे प्रयत्न सुरु केलेलेच आहेत आणि ते पाहता जगनमोहन आणि भाजपमधील सध्याची गोडीगोडी कडवट झाल्याखेरीज राहणार नाही. पंजाब, दिल्ली, राजस्थान, छत्तीसगढ, महाराष्ट्र, तेलंगणा, तमीळनाडू, केरळ, पश्चिम बंगाल, झारखंड ही दहा राज्ये स्पष्टपणे भाजपच्या विरोधात आहेत. या राज्यांमध्ये असलेल्या सरकारांनी केंद्र सरकार आणि भाजपच्याच एकंदर राज्यविरोधी भूमिकेला प्रतिकार करण्याची भूमिका घेतलेली आहे. अर्थात प्रतिस्पर्धी एकच व समान असला तरी विरोधक विखुरलेले आहेत आणि त्याचाच फायदा भाजपला मिळत आहे. जर विरोधक एकत्रित आले तर भाजपला मुकाबला अवघड झाल्याखेरीज राहणार नाही.




# केंद्र-राज्य संबंधांची फेरव्याख्या करण्याची अनिवार्यता


**राज्यपाल हा राष्ट्रपतींचा म्हणजेच केंद्र सरकारचा प्रतिनिधी म्हणून काम करीत असतो. त्याचा अर्थ त्याने राज्यांच्या अधिकारात आणि राज्यकारभारात ढवळाढवळ करणे हा होत नाही. परंतु नव्या परिस्थितीत आणि मुख्यत: २०१४ नंतर राज्यपालांना सक्रिय होण्यास सांगून विरोधी पक्षांची सरकारे अस्थिर करण्याची मालिका सुरु करण्यात आली. महाराष्ट्रात त्याचा अनुभव सर्वांना येतच आहे.**



**कबीर दास**

हा विषय पुन्हा प्रकर्षाने चर्चेत येण्याचीही काही कारणे आहेत. महाराष्ट्राचे राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांनी ज्या प्रकारे महाराष्ट्रातील महाविकास आघाडी सरकारचा छळवाद मांडला आहे त्यावरुन तर ते स्पष्ट झालेच आहे. राज्यपाल नियुक्त आमदारांच्या नेमणुकाच रोखून धरणे, सरकारने केलेल्या कायद्यांना वेळेत मंजुरी न देता मुद्दाम ते अडवून ठेवणे असे प्रकार राज्यपाल महोदयांकडून मनोभावे (खरे तर नमोभावे) केले जात आहेत. विद्यापीठ अधिनियमात बदल करणारा कायदा राज्याने केला आणि राज्यपालांच्या सहीसाठी तो पाठविल्यानंतर त्यावर सही न करता मुद्दाम तो प्रलंबित ठेवण्याचे आडमुठे आणि अडवणुकीचे धोरण राज्यपाल महोदयांनी स्वीकारलेले दिसून येते. याला राजकीय बाजूही आहे. या कायद्याला भाजप-संघ परिवारातील विद्यार्थी संघटना अभाविप आणि खुद्द भाजपचा विरोध आहे. हे बदललेले किंवा सुधारित अधिनियम लागू केल्यास त्याविरुध्द आंदोलनाची धमकी या संघटनांनी दिलेली आहे. राज्यपालांची राजकीय पाळेमुळे सर्वांनाच माहिती आहेत त्यामुळे ते या कायद्यावर सही करण्यास टाळाटाळ का करीत आहेत हे कुणाच्याही लक्षात यावे. थोडक्यात राज्यपालांच्या घटनात्मक पदाचा (गैर)वापर सर्रासपणे चालू आहे. पश्चिम बंगाल मध्ये तर राज्य सरकारला शक्य होईल त्या ठिकाणी त्रास देण्याचे धोरणच तेथील राज्यपाल महोदयांनी अवलंबिलेले आहे. त्यांना केंद्राची पूर्णपणे फूस आहे. त्यामुळेच राज्यपाल या घटनात्मक संस्थेबाबतच आता प्रश्नचिन्ह उपस्थित होऊ लागले आहे.







याच पार्श्वभूमीवर केरळचे मुख्यमंत्री पिन्नराई विजयन यांनी केंद्र सरकारला पत्र लिहून राज्यपाल नियुक्तीच्या संदर्भात तसेच एकंदरीतच राज्यपालांच्या भूमिकेच्या संदर्भातील कायद्यांमध्ये उचित बदल सुधारणा करण्याची मागणी केली आहे. त्यामध्ये राज्यांना देखील काही अधिकार प्राप्त असले पाहिजेत असेही त्यांनी सुचविले आगहे. केरळचे राज्यपाल अरिफ महंमद खान हे एक अत्यंत अहंमन्य आणि स्वतःला अतिशय शहाणे समजणारे नेते आहेत. त्यांनी तर केरळ राज्य मंत्रिमंडळाने संमत केलेले त्यांचे अभिभाषण वाचण्यासच नकार दिला. वस्तुतः राज्यपालाने राज्य मंत्रिमंडळाच्या सल्ल्याने कामकाज करण्याची कायदेशीर तरतूद आहे. विधिमंडळात मंजूर झालेल्या विधेयकावर सही करण्यास राज्यपाल एकदा सही करण्यास नकार देऊ शकतात परंतु दुसऱ्यांदा नकार देण्याचा त्यांना अधिकार नाही आणि मग त्या विधेयकावर सही करण्याचे बंधन त्यांच्यावर लागू होते. परंतु यातून पळवाट म्हणून विधेयकावर सही न करता ते प्रलंबित ठेवायचा एक लबाडीचा मार्ग अवलंबिला जातो आणि आता तर तो सर्रास वापरण्यात येतो. राज्यपालांच्या मार्फत राज्यांचा जो छळवाद मांडण्यात येतो त्याला आळा घालण्यासाठी राज्यपालविषयक कायदे व त्यातील तरतुदींमध्ये सुधारणा करण्याच्या गरजेवर भर देऊनच न्यायमूर्ति पुंछी आयोगाने केलेल्या शिफारशींप्रमाणे राज्यपाल नेमणुकांमध्ये राज्यांनाही काही अधिकार मिळायला हवेत असे या पत्रात नमूद करण्यात आले आहे. त्यांच्या या मागणीला विरोधी पक्षांची सरकारे असलेल्या राज्यांकडून पाठिंबा मिळत आहे.

काँग्रेस पक्षाच्या राजवटीत राज्यपालांच्या पदांचा अंशतः




दुरुपयोग करण्यात आला होता. परंतु सध्या ज्या कोडगेपणाने आणि कोणताही विधिनिषेध न बाळगता राज्यपालपदाचा गैरवापर करण्यात येत आहे तसा प्रकार अनुभवास आला नव्हता. राज्यपालांना राज्य सरकारशी असहकार करायला उघड चिथावणी केंद्राकडून दिली जात आहे. काही महिन्यांपूर्वी राज्यपालांच्या परिषदेत बोलताना माननीय पंतप्रधान साहेबांनी राज्यपालांना केंद्राच्या कल्याणकारी योजनांच्या संबंधित राज्यांमधील अंमलबजावणीवर देखरेख ठेवण्याची सूचना केली होती. राज्यांमधील राज्यकारभारावर लक्ष ठेवावे, त्या राज्यातील एकंदर परिस्थितीवर लक्ष ठेवणे, राज्याच्या विविध भागांचे नियमित दौरे करुन पाहणी करणे अशा सूचनांचाही त्यात प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे समावेश होता. या सूचना विशेषतः आणि प्रामुख्याने विरोधी पक्षांची सरकारे असलेल्या राज्यांमधील राज्यपालांसाठी होत्या. थोडक्यात विरोधी पक्षांना त्यांची सरकारे असलेल्या राज्यात धडपणे राज्यकारभार करु न देण्याचा हेतुच या सूचनांमागे असल्याचे स्पष्टपणे प्रतीत होत होते. परंतु या सूचना करताना आपण राज्यांचे अधिकार व त्यांच्या स्वायत्ततेवर आक्रमण करीत आहोत अशी पुसटशी जाणीव देखील माननीय पंतप्रधान साहेबांना झाली नाही हे विशेष !



न्यायमूर्ती सरकारिया

ही उदाहरणे अशासाठी की राज्यपाल हा राष्ट्रपतींचा म्हणजेच केंद्र सरकारचा प्रतिनिधी म्हणून काम करीत असतो. त्याचा अर्थ त्याने राज्यांच्या अधिकारात आणि राज्यकारभारात ढवळाढवळ करणे हा होत नाही. परंतु नव्या परिस्थितीत आणि मुख्यतः २०१४ नंतर राज्यपालांना सक्रिय होण्यास सांगून विरोधी पक्षांची सरकारे अस्थिर करण्याची मालिका सुरु करण्यात आली. महाराष्ट्रात त्याचा अनुभाव सर्वांना येतच आहे.


राज्यपालपद हे नेहमीच वादग्रस्त राहिले आहे. त्यामुळे राज्यपालांच्या नेमणुकीचे सर्वाधिकार केंद्र सरकारला असले तरी केंद्र - राज्य संबंध सुरळीत व व्यवस्थित राहण्याच्या दृष्टीने केंद्र व राज्य सरकारांनी परस्पर संमतीने राज्यपालाची नेमणूक करावी असा एक रिवाज किंवा प्रथा सुरुवातीला अमलात आणण्यात आली होती. जेव्हा राज्यपाल पदाचा दुरुपयोग सुरु झाला तेव्हा त्या पार्श्वभूमीवर केंद्र व राज्य संबंधांचा आढावा घेऊन ते चांगले राखण्याच्या दृष्टीने कोणत्या उपाययोजना करता येतील त्याबाबत शिफारशी करण्यासाठी न्यायमूर्ति सरकारिया यांचा आयोग नेमण्यात आला होता.

सरकारिया आयोगाने अनेक चांगल्या शिफारशी केल्या त्यामध्ये राज्यपाल नियुक्तिबाबत केंद्र व राज्यांमधील




सल्लामसलती व त्यातून निर्माण होणाऱ्या सर्वसंमतीला औपचारिक म्हणजेच एखाद्या कायद्याचे स्वरुप देण्याची शिफारस करण्यात आली होती. आयोगाच्या शिफारशी किंवा आयोगाचा अहवाल केंद्र सरकारला सादर करण्यात आला होता. परंतु अधिकृतपणे त्याचा स्वीकार करण्यात आला नव्हता आणि त्यामुळे आयोगाच्या शिफारशींनाही अधिमान्यता मिळू शकली नाही. परंतु अनौपचारिकपणे काही सरकारांनी सरकारिया आयोगाच्या शिफारशींची काही प्रमाणात अंमलबजावणी करण्यास सुरुवात केली होती. त्यामुळे ज्या सरकारांना थोडीफार घटनात्मक लज्जा व शरम होती त्यांनी सरकारिया आयोगाच्या शिफारशींचा मार्गदर्शक तत्वे म्हणून उपयोग केला. ज्या सरकारांना हा प्रकार मान्य नव्हता त्यांनी या शिफारशी धुडकावून लावल्या. हाच प्रकार चालत राहिला.

मनमोहनसिंग सरकारच्या काळात म्हणजे २००७ मध्ये न्यायमूर्ती मदनमोहन पुंछी यांच्या अध्यक्षतेखाली प्रशासकीय सुधारणा, केंद्र व राज्य संबंध या विषयांवर नव्या परिस्थितीच्या संदर्भात अध्ययन करुन शिफारशी करण्यासाठी आयोग नेमण्यात आला. या आयोगाने २०१० मध्ये सरकारला आपला अहवाल सादर केला. विविध विषयांवर त्यांना २७३ शिफारशी केल्या होत्या. परंतु राज्यपालांच्या संदर्भात त्यांनी केलेल्या काही शिफारशी अतिशय मूलगामी आणि महत्वपूर्ण होत्या. यामध्ये राज्यपाल नेमताना तो सक्रिय राजकारणातील असेल तर किमान दोन वर्षे तो त्यापासून दूर राहिलेला असेल अशा व्यक्तीचाच या पदासाठी विचार केला जावा अशी शिफारस यामध्ये आहे. म्हणजेच कालपर्यंत राजकारणात सक्रिय असलेल्या व्यक्तीस रातोरात राजकारण सोडायला लावून राज्यपाल म्हणून नेमायचे हा प्रकार आयोगाने अयोग्य, अनुचित व अमान्य ठरविला आहे. परंतु याच्या विपरीतच राज्यपालांच्या नेमणुका होत असल्याचा अनुभव येत आहे.




राज्यपाल नेमणुकीसाठी आयोगाने एका समितीची शिफारस केली आहे. पंतप्रधान, केंद्रीय गृहमंत्री, लोकसभा अध्यक्ष आणि संबंधित राज्याचे मुख्यमंत्री यांचा त्यात समावेश असावा असे अहवालाने सुचविले आहे. राज्यपाल नियुक्तीमध्ये संबंधित राज्य आणि राज्याचे मुख्यमंत्री यांचे मत विचारात घेण्याची शिफारसही त्यामध्ये आहे.



न्या. मदनमोहन पुंछी

तसेच विधिमंडळातील ठरावाद्वारे राज्यपालास हटविण्याची प्रक्रिया करण्याची शिफारस करण्याबरोबरच राज्यपालांविरुध्द महाअभियोग चालविण्याचे अधिकार राज्य विधिमंडळास देण्याबाबतही आयोगाने शिफारस केली आहे. राज्यातील विद्यापीठांचे कुलपति म्हणून राज्यपालांची नेमणूक करण्याचा






प्रकारही तत्काळ बंद किंवा रद्द करण्याची शिफारस अहवालाने केली आहे. राज्यघटनेत राज्यपालांची 'मर्जी'(प्लेझर) असेल तोपर्यंतच संबंधित राज्य सरकारचे अस्तित्व राहू शकते अशी जी तरतूद आहे ती रद्द करण्याची शिफारसही अहवालाने केली आहे. आजवरच्या इतिहासात एकदाच या तरतुदीचा दुरुपयोग झाला होता व गोव्यात तो झाला होता. परंतु अत्यंत अस्पष्ट अशा स्वरुपाचे हे तत्व आहे. कारण राज्यघटनेत कुठेही 'मर्जी' किंवा 'प्लेझर' या संकल्पनेची स्पष्ट व्याख्या नाही. ती बाब राज्यपाल किंवा केंद्राच्या बाबत बोलायचे झाल्यास राष्ट्रपतींच्या सद्सद्विवेकावर सोडण्यात आली आहे. परंतु पक्षपाती वृत्ती आणि विधिनिषेधशून्यता निर्माण झाल्यावर हे तत्व धोक्यात येऊ शकते व त्याचा दुरुपयोग होऊ शकतो. त्यामुळेच न्यायमूर्ति पुंछी यांनी हे अस्पष्ट असे तत्व रद्द करण्याची महत्वपूर्ण शिफारस केलेली आहे.



केरळच्या मुख्यमंत्र्यांनी केंद्र सरकारला लिहिलेल्या पत्रात राज्यघटनेतील राज्यपालांशी निगडित कलम १५६ मध्ये बदल करण्याची मागणी करण्यात आली आहे. यामध्ये राज्यपालांना पदावरुन हटविणे किंवा त्यांना केंद्र सरकारने माघारी बोलाविण्या(रिकॉल) संबंधी राज्य विधिमंडळास अधिकार मिळण्याबाबतचा उल्लेख आहे. या पत्रात केरळचे राज्यपाल अरिफ महंमद खान यांनी राज्य मंत्रिमंडळाने तयार केलेल्या त्यांच्या भाषणावर सही करण्यास म्हणजेच त्यास मंजुरी देण्यास नकार दिला होता. परंतु ही अडवाअडवी करता येणार नाही हे लक्षात आल्यानंतर अगदी अखेरच्या क्षणी त्यांनी त्यास मंजुरी दिली आणि विधिमंडळापुढे त्याचे वाचन केले. या प्रसंगाचा संदर्भही या पत्रात देण्यात आला आहे. अरिफ महंमद खान यांना कायद्याचे ज्ञान नाही असे म्हणताच येणार नाही कारण त्यांनी अनेक वर्षे सर्वोच्च न्यायालयात वकील म्हणून काम केलेले आहे. ते केंद्रीय मंत्री, खासदारही राहिलेले आहेत. म्हणजेच त्यांना कायद्याचे परिपूर्ण ज्ञान असतानाही ते जर अशी अडवाअडवी करीत असतील तर तो प्रकार ते मुद्दाम, हेतुपूर्वक आणि राज्य सरकारला उपद्रव देण्यासाठीच करीत आहेत असा अर्थ कुणी लावला तर तो चुकीचा मानता येणार नाही. त्यामुळेच केरळतर्फे पाठविण्यात आलेल्या या पत्रात जर राज्यपालच राज्यघटनेनुसार आचरण करीत नसेल तर त्यास पदावरुन हटविण्याचा किंवा त्याला केंद्राने माघारी बोलवावे अशी शिफारस करण्याचा अधिकार राज्य




विधिमंडळाला मिळावा अशी मागणी करण्यात आली आहे. केरळच्या या पत्रात महाराष्ट्राचे महामहिम राज्यपाल तसेच तमीळनाडूचे तेवढेच महनीय राज्यपाल आणि सर्वांवर आपल्या महानतेची कडी करणारे पश्चिम बंगालचे राज्यपाल यांची उदाहरणे सादर केली आहेत. तमीळनाडू विधिमंडळाने 'नीट' या राष्ट्रीय पातळीवरील प्रवेश परीक्षेसंदर्भात एकमताने संमत केलेल्या कायद्याला मंजुरी देण्याऐवजी तो पुन्हा सरकारकडे पाठविण्याचा अत्यंत घटनाबाह्य असा प्रकार तमीळनाडूच्या राज्यपालांनी केला आहे. त्यावरुन तेथे राज्यपाल विरुध्द लोकनियुक्त सरकार असा संघर्ष सुरु होणे अटळ झाले आहे. तमीळनाडूच्या राज्यपालांनी तर विद्यापीठांच्या कुलगुरु नियुक्त्यांमध्येही हस्तक्षेप आणि परस्पर निर्णय करण्याचा अगोचरपणाही चालविला आहे. पश्चिम बंगालचे राज्यपाल तर नियमितपणे आणि रोजच्या रोज मुख्यमंत्र्यांच्या विरोधात ट्वीटची मोहिम चालवीत असतात आणि राज्य प्रशासनातील अधिकाऱ्यांनाही परस्पर हुकूम सोडताना आढळतात याकडेही या पत्रात लक्ष वेधण्यात आले आहे.

१९८३मध्ये श्रीनगरमध्ये विरोधी पक्षांची एक मोठी बैठक झाली होती व तीमध्येही केंद्र-राज्य संबंधावर झालेल्या चर्चेत राज्यपाल नियुक्तीबाबत राज्यांचे मत किंवा शिफारस निर्णायक मानण्यात यावी अशी मागणी करण्यात आली होती. सरकारिया आयोगाने राज्यातर्फे तीन नामवंतांची नावे केंद्र सरकारला सुचविण्यात यावीत आणि त्यातील एक नाव राष्ट्रपतींनी मंजूर करावी अशी शिफारस केली होती. त्या शिफारशीवर किंवा त्यानंतरच्या पुंछी आयोगाने सुचविल्याप्रमाणे पंतप्रधान, गृहमंत्री, लोकसभा अध्यक्ष व मुख्यमंत्री यांच्या समितीतर्फे राज्यपाल नियुक्ति व्हावी यापैकी एखादा पर्याय स्वीकारण्यात यावा व तशी अंमलबजावणी करण्यात यावी असेही केरळने या पत्राद्वारे केंद्र सरकारला सुचविले आहे. या पत्राला बिगर-भाजप मुख्यमंत्र्यांनी पाठिंबा दिला आहे. तमीळनाडूचे मुख्यमंत्री एम के स्टॅलिन यांनी तर या प्रश्नावर बिगर-भाजप मुख्यमंत्र्यांची बैठक घेण्याची कल्पनाही मांडली आहे.

हे सर्व ठीक आहे. प्रत्यक्षात बिगर-भाजप मुख्यमंत्री पुढील कृति काय आणि कशी करतात ते पहावे लागेल. कारण त्यांनी त्यांची जी व्यथा किंवा समस्या मांडलेली आहे ते एक प्रकारे भाजपने नेमलेल्या राज्यपालांना मिळालेले प्रमाणपत्रच ठरणार आहे. कारण भाजपचे जे सर्वेसर्वा आहेत त्यांना या पत्राने विलक्षण आनंद झाला असेल असेच मानावे लागेल. आपण नेमलेले राज्यपाल आपल्या हुकमानुसार बिगर-भाजप मुख्यमंत्री व सरकारे यांना सळो की पळो करुन सोडत आहेत आणि त्यांचा छळ करुन त्यांना अस्थिर करीत आहेत याची कबुलीच या पत्राद्वारे मिळत आहे आणि तो या राज्यपालांच्या आचरणाचा पुरावाच आहे. त्याचा असुरी आनंद केंद्रातील राज्यकर्त्यांना झाल्याखेरीज राहणार नाही. म्हणून पत्रासारख्या सनदशीर मार्गाबरोबरच विधिमंडळांच्या द्वारे या राज्यपालांच्या विरोधात ठराव संमत करणे, त्यांच्या घटनाबाह्य आचरणाच्या गोष्टी जाहीर वेशीवर टांगणे या गोष्टी राज्य सरकारांना कराव्याच लागणार आहेत. त्याखेरीज ही मंडळी वठणीवर राहणार नाहीत. अन्यथा त्यांचा बेलगाम व मोकाट असा घटनाबाह्य व्यवहार आणि आचरण चालूच राहील.

■■■


Nanded City, Pune
Sinhagad Road, Pune
प्रत्येक घराला एक मन असतं.
प्रत्येक शहराला एक व्यक्तिमत्त्व असतं.
CBSE व ICSE शाळा
जिमखाना
Call: 020-67275800 / 1 / 2
www.nandedcitypune.com
info@nandedcitypune.com
MAGARPATTA CITY

## आगळे-वेगळे संस्थानिक

# महाराजा सयाजीराव गायकवाड

**सन १८६३-१९३९**



सयाजीरावांच्या जन्मास १३८ वर्षांपेक्षा जास्त काळ झाला आहे. मार्च महिना हा त्यांचे कृतज्ञ स्मरण करण्याचा महिना. त्यांना ही शब्दसुमनांजली-

- प्रा. डॉ. गणेश राऊत



बडोदा पॅलेस

महाराजा सयाजीराव गायकवाड यांचे मोठेपण सांगताना त्यांचे चरित्रकार दादूमिया उर्फ दा. वि. नेने लिहितात, “प्रजाहित दक्षता, पुरोगामी विचारसरणी, विशाल सामाजिक दृष्टिकोन यामुळे बडोदा नरेश श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांचे व्यक्तिमत्त्व आणि कर्तृत्व त्यांच्या समकालीन संस्थानिकांमध्ये आगळेवेगळे दिसते.” स्वदेश आणि स्वधर्म यांचा मूलमंत्र मनावर बिंबलेल्या या लोकाभिमुख राजाने लोकसेवेसाठी अवघड असा ज्ञानमार्ग स्वीकारला. त्यासाठी आपल्या संस्थानात सक्तीचे आणि विनामूल्य प्राथमिक शिक्षण सर्वप्रथम सुरू केले. त्यांनी आपल्या राज्यात अस्पृश्यता निवारणाचा कायदा करून अस्पृश्यांच्या शिक्षणाची राहण्या-जेवणासह सोय केली. स्त्री-शिक्षणास प्राधान्य देऊन स्त्रियांना प्रशिक्षण देण्यासाठी वेगळे महाविद्यालयही उघडले. अनेकविध शैक्षणिक तसेच सामाजिक सुधारणांच्या जोडीनेच साहित्यविषयक आणि प्रशासन संलग्न सुधारणा घडवून आणण्यातही सयाजीरावांनी पुढाकार घेतला. ग्रंथ प्रसारास व ग्रंथ-कोशनिर्मितीस पाठबळ पुरवून उत्तमोत्तम इंग्रजी ग्रंथाचे अनुवाद मराठी भाषेत व्हावेत, यासाठी प्रोत्साहन दिले. मिश्रविवाह, विधवाविवाह, स्त्रियांचा वारसा, पडदा-पद्धतीवर बंदी, बालविवाह प्रतिबंध यांसारख्या प्रागतिक सामाजिक सुधारणा राबविणाऱ्या सयाजीरावांचा ‘आदर्श राजा’ असा यथोचित गौरव पंडित मदनमोहन मालवीय यांनी केला आहे.





**चरित्र** : सयाजीराव महाराजांचा जन्म ११ मार्च, १८६३ रोजी महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यातील कवळाणे गावी झाला. त्यांचे मूळ नाव गोपाळ होय. गोपाळ काशीराव गायकवाड असे त्यांचे पूर्वाश्रमीचे नाव होय. त्यांच्या मातोश्री उमाबाई होत. गोपाळरावांना अन्य २ बंधू व ४ भगिनी होत्या. बडोद्याच्या गायकवाड घराण्याला वारस नव्हता म्हणून वारसांचा शोध आणि दत्तक घेणे या प्रक्रियेत गोपाळराव बडोद्याच्या राजघराण्यात दत्तक गेले आणि त्यांचे नशीबच बदलून गेले. भारताच्या इतिहासातील प्रसिद्ध, प्रजाहितदक्ष संस्थानिक म्हणून ते ओळखले गेले. इ.स. १८७५ मध्ये दत्तक गेल्यावर १८७६ पासून एफ.ए.एच. इलियट या आयरिश

शिक्षकाने त्यांच्याकडून पुढील तयारी करवून घेतली. इंग्रजांनी या शिक्षकाच्या माध्यमातून त्यांना राजकीय व्यवहारांचे शिक्षण दिले. राज्यकारभारासाठी त्यांना तयार करण्यात आले. हे प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर आणि वयाची १८ वर्षे पूर्ण झाल्यावर त्यांचा राज्याभिषेक करण्यात आला. हा राज्याभिषेक खास अशा नजरबाग राजवाड्यात करण्यात आला. राज्याभिषेक झाल्यावर त्यांना राजेपदाचे सगळे अधिकार मिळाले आणि तेव्हापासून त्यांना राजाज्ञा काढण्याचा अधिकार मिळाला.

**सुधारणा पर्व** : राज्यकारभार हाती येताच महाराजांनी आयुष्याच्या अखेरपर्यंत संस्थानात सुधारणांचा युरोपच्या भेटीवर गेले. बुखारा या बोटीतून त्यांचा हा दौरा झाला. याच दौऱ्यात त्यांनी त्रिखंडावर राज्य करणारी महाराणी व्हिक्टोरिया हिची भेट घेतली.

महाराजांनी न्यायमंदिर (न्यायालय), खंडेराव मार्केट (पूर्वजांची स्मृती जपणारे व्यापार केंद्र), कलाभवन, ग्रामपंचायत स्थापना, बडोदा शहरात नळाने पाणीपुरवठा या सुधारणा केल्या. इंग्रजांच्या विरोधात सशस्त्र क्रांतिकार्यात आघाडीवर असणारे अरविंद घोष यांना महाराजांनी कामावर घेतले. इंग्रजांच्या राग-लोभाची पर्वा न करता असे पाऊल उचलणे हे अत्यंत धाडसाचे होते.



बडोदा विद्यापीठ

धडाका लावला. आपले आयुष्यच त्यांनी प्रजेसाठी वाहून घेतले. प्रजेच्या सोईसाठी स्टेट लायब्ररी (राज्य ग्रंथालय), बडोदा कॉलेजची स्थापना केली. उद्योगधंद्यांकडे आपले लक्ष आहे हे दाखवून देण्यासाठी त्यांनी अजबडी मिलची स्थापना केली. जनतेच्या सोईसाठी डफरीन हॉस्पिटल सुरू केले. पुढे या हॉस्पिटलचे श्री. सयाजी जनरल हॉस्पिटल असे नामकरण करण्यात आले. सन १८८६ मध्ये आयुष्यात प्रथमच महाराज

**विविध क्षेत्रे** : सन १९०२ मध्ये अहमदाबाद शहरात काँग्रेसचे अधिवेशन भरले असता सयाजीरावांचे तेथे शेती उद्योगावर भाषण झाले. लोकशाहीचा पाया मजबूत करणे आणि सत्तेचे विकेंद्रीकरण करण्यासाठी तालुका पंचायतींची स्थापना करण्यात आली. संस्थानात बालविवाह बंदी, भारतात सर्वप्रथम मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण, आशियातील सर्वांत मोठ्या सेंट्रल लायब्ररीची स्थापना, अखिल भारतीय

मराठा शिक्षण परिषदेचे उद्घाटन, लंडन विद्यापीठातील तत्त्वज्ञान परिषदेचे पहिले अध्यक्ष, चिमणाबाई स्त्री उद्योगालय स्थापना, गायकवाड ओरिएंटल मालेचे प्रकाशन, हिंदुस्थानात प्रथमच बॉय स्काऊट स्थापना आणि जगातील तिसरी दिव्यांग मुलांची शाळा सुरू करणे, सन १९३१ मध्ये लंडनमध्ये गोलमेज परिषद प्रसंगी गांधीजींची थेट घेणे, १९३३ च्या जागतिक सर्वधर्म परिषदेचे अध्यक्ष पद (अमेरिका), ब्रिटिश लायब्ररी असोसिएशनचे उपाध्यक्ष पद भूषविणे, इंग्लंडचे सम्राट पंचम जॉर्ज यांची भेट घेणे, बरोडा-बर्लिन करार करणे, बागलाण (साल्हेर) येथे आदिवासी परिषद आयोजित करणे, जगातील

शैक्षणिक धोरणावर त्यांचे चरित्रकार दादूमिया उर्फ दामोदर विष्णू नेने यांनी 'श्रीमंत सयाजीराव गायकवाड' या चरित्रात प्रकाश टाकला आहे. सन १८८५ मध्ये बरोडा कॉलेज आणि हायस्कूलच्या बक्षीस समारंभावेळी महाराजांनी शिक्षणविषयक धोरण जाहीर केले. त्यात पुढील गोष्टींवर भर दिल्याचे नेने लिहितात.

१. प्रतिवर्षी ३० नव्या शाळा सुरू करणे.

२. दरवर्षी शाळा इमारतींवर ६० हजार खर्च करणे.

३. अभ्यासक्रमातील पुस्तकांमध्ये उल्लेख आलेल्या वस्तूंचे एक संग्रहालय उभारणे.





बडोदा हॉस्पिटल



बडोदा ग्रंथालय

सर्वांत प्रख्यात अशा रेडिओ केंद्रावरून (बीबीसी) मुलाखत देणे, हरणी विमानतळाची स्थापना करणे अशा एकमेवाद्वितीय गोष्टी त्यांनी आयुष्यात केल्या. बडोद्यात चित्रकला, स्थापत्य, संगीत, बागा निर्मिती, कारंजे निर्मिती, नाट्य, साहित्य याला महाराजांनी कायमच उठाव दिला. ६ फेब्रुवारी, १९३९ रोजी मुंबईत त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

**सयाजीरावांचे शैक्षणिक धोरण** : सयाजीरावांच्या

४. स्त्री-शिक्षणाकडे विशेष लक्ष व मुलींच्या शाळेत स्त्री शिक्षिका नेमणे.

५. समाजातील शेवटच्या स्तरापर्यंत शिक्षण नेणे.

६. विद्यार्थ्यांच्या नैतिक व शारीरिक शिक्षणाकडे विशेष लक्ष पुरविणे.

७. औद्योगिक शिक्षण देणाऱ्या शाळा सुरू करणे.

८. विद्यार्थ्यांसाठी नवी वाचनमाला (पूरक


वाचनासाठी पुस्तके) करवून घेणे.

९. उत्तम इंग्रजी संदर्भ ग्रंथांचे देशी भाषेत अनुवाद करणे व त्या कामी विद्वान व्यक्तींची नेमणूक करणे.

१०. वाचनालये निर्माण करणे.

सयाजीरावांनी सन १८९२ मध्ये मोफत आणि सक्तीचे प्राथमिक शिक्षण सर्वांत मागासलेल्या अमरेली प्रांतात सुरू केले. सन १९०६ मध्ये सर्व संस्थानात हे तत्त्व लागू केले. तत्कालीन इंग्रज सरकारला सुद्धा हे जमले नव्हते. महाराजांची मातृभाषा मराठी असूनही त्यांनी संस्थानची राजभाषा गुजराथी ठरविली. मराठी, गुजराथी भाषेतून त्यांनी आपल्या कारकिर्दीत अनेक ग्रंथ प्रसिद्ध केले. यात प्रामुख्याने धर्म, तत्त्वज्ञान, समाजशास्त्र, नीतीशास्त्र, विज्ञान, तंत्रज्ञान, कुशल कला,





व्यायाम आणि क्रीडा, संगीत, पाकक्रिया, चित्रकला, प्रवास, इतिहास, भूगोल, चरित्र, निबंध, नाटक, कादंबरी, काव्य, नियतकालिके यांचा समावेश आहे. याशिवाय त्यांनी मराठी ग्रंथ लेखकांना आर्थिक मदत करणे, दुर्मीळ ग्रंथ पुन्हा प्रसिद्ध करणे, राष्ट्रकथामाला (विविध देशांचा इतिहास), महाराष्ट्र ग्रंथमाला, पाकशास्त्र, क्रीडामाला, भाषांतर याही क्षेत्रात महाराजांनी प्रभावी कार्य केले.

**सामाजिक धोरण** : सयाजीरावांनी आपल्या कारकिर्दीत संस्थानात खूप सुधारणा घडवून आणल्या. यात कन्याशाळा सुरू करणे, फिमेल ट्रेनिंग स्कूल स्थापणे, संगीत शाळा सुरू करणे, मुलींसाठी मोफत प्राथमिक शिक्षण, संग्रहालये स्थापन करणे, आदिवासींसाठी आश्रमशाळा स्थापणे, हिंदी भाषेस प्राधान्य, दिव्यांगांसाठी विशेष शाळा, मध्यवर्ती ग्रंथालय, स्त्रियांसाठी घरपोच ग्रंथसेवा, हिंद विजय जिमखाना उभारणे, गाव तेथे ग्रंथालय इत्यादी शैक्षणिक क्षेत्राशी आणि क्रीडा क्षेत्रांशी संबंधित सुधारणा केल्या.

**कायदा** : काही वेळा सुस्पष्ट कायद्यांची गरज असते. राज्य आणि न्याय यंत्रणा नीट आणि कार्यक्षम चालविण्यासाठी भक्कम कायदेशीर यंत्रणेचे पाठबळ आवश्यक असते. महाराजांनी जुलमाने होणाऱ्या धर्मांतरावर बंदी आणली. विधवा स्त्रियांना कायदेशीर संरक्षण, बालविवाह प्रतिबंधक कायदा, विवाह नोंदणी कायदा, पुरोहित परवाना कायदा, दत्तक नोंदणी कायदा, वारसा नोंदणी कायदा, अविभक्त कुटुंब नोंदणी कायदा, मिळकत नोंदणी कायदा, घटस्फोट घेण्याचा वा देण्याचा अधिकार, बाल दीक्षा नियम नोंदणी कायदा असे कायदे केले आणि प्रजेला सुरक्षित केले.

**राजकीय** : राजकारणाच्या धकाधकीत क्रांतिकारकांना आश्रय देणे (उदा., योगी अरविंद) भारतीय स्वातंत्र्य चळवळीस प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मदत करणे, आंतरराष्ट्रीय पातळीवर संपर्क जाळे उभारणे, राष्ट्रनेत्यांना व्यक्तिगत मदत करणे (उदा., लोकमान्य टिळकांना गायकवाड वाडा खरेदी करण्यास कायदेशीर चौकटीत मदत करणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मदत करणे, श्रीधर व्यंकटेश केतकर यांस मदत करणे, रयत शिक्षण संस्थेस मदत करणे इत्यादी) राष्ट्रीय

ऐक्याचे काम करणाऱ्या संघटनांना मदत करणे इत्यादी कामे सयाजीरावांनी केली.

**आर्थिक** : संस्थानात आर्थिक क्षेत्रात सुधारणा घडवून आणण्यासाठी त्यांनी विविध योजना आखल्या. संस्थानात रेशमाचे उत्पादन वाढविण्यासाठी महाराजांनी रावजीभाई पटेल यांना काश्मीरला पाठविले. शेती सुधारणा करण्यासाठी फिरते तपासनीस नेमले. शेतकऱ्यांचे जोड उत्पन्न वाढविण्यावर संस्थानात भर देण्यात आला. यात जनावरांचे उत्पादन वाढविणे, कोंबडी पालनावर भर देणे, दुग्ध व्यवसाय (खामगाव – पशुसंवर्धन केंद्र) वाढविणे, पशू दवाखाने (२१ पर्यंत संख्या वाढवत नेली.) उघडण्यात आले. टाटांसारख्या उद्योजकांस आर्थिक चणचण भासू नसे लघुद्योगांना (सतरंजी – गालिचे विणणे, कागद, घड्याळ, धागे, चिनी मातीच्या कपबशा इत्यादी.) चालना देणे, सरकारी मालकीची स्पिनिंग अॅण्ड विव्हिंग इंडस्ट्री खासगी मालकीची करणे, संस्थानच्या अंदाजपत्रकातून १२ लाख रुपये वेगळे काढून उद्योग विकासासाठी राखीव ठेवणे इत्यादी सुधारणा महाराजांनी केल्या.

कुटीर उद्योगांसाठी 'डायमंड ज्युबिली कॉटेज इंडस्ट्रीज ट्रस्ट' निर्माण केला. या विभागाच्या माध्यमातून बडोदा संस्थानातून तयार झालेल्या वस्तू भारतभर विक्रीसाठी जाऊ लागल्या. यात कापड, कागद, शाई, मलेरियाविरोधी औषध, मध, तेल, धातू, काडेपेट्या, काच सामान, यांत्रिक माल यांचा समावेश होता.







म्हणून 'बँक ऑफ बरोडा' (१९०८) स्थापण्यात आली. उद्योग खात्याची स्थापना, औद्योगिक सल्लागार मंडळाची स्थापना,

सहकार : सन १९१३ मध्ये महाराजांनी 'सहकारी कायदा' पास करून सन १९१४ मध्ये संस्थानात 'सहकारी संस्थांची अखिल भारतीय परिषद' भरविली. आशियातील पहिली सहकारी बँक 'अन्योन्य साहाय्यकारी कंपनी' स्थापन केली. अशा रितीने सयाजीरावांनी सर्वच क्षेत्रात आपला ठसा उमटविला.

■■■

# संघराज्याची अवस्था...

**तमिळनाडूचे वित्तमंत्री पलानिवेल त्यागराजन यांच्या मुलाखतीवर आधारलेला हा लेख, केंद्र– राज्य संबंधांच्या स्थितीवर प्रकाश टाकणारा..**




भारतातील राज्ये व केंद्रशासित प्रदेश

दिल्लीतील 'केंद्र सरकार' म्हणवणाऱ्या संघराज्यीय सरकारचा कल आजघडीला संघराज्य – विरोधी आणि एकाधिकारशाहीचा आहे, परंतु 'राजकारणात तुम्ही कशासाठी ठाम उभे राहता हे, तुम्ही कुठे बसता यावर अवलंबून असते' असे म्हणतात, ते आपले विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबाबतीत फारच खरे ठरते आहे. हेच मोदी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून राज्यांच्या स्वायत्ततेसाठी, अधिकारांसाठी असे बोलत की, त्याबाबतीत जयललिताही फिक्या पडाव्यात. मात्र त्यांनी मुख्यमंत्रीपदावरून १३ वर्षांत घेतलेल्या साऱ्या भूमिकांच्या विरुद्ध वर्तन पंतप्रधानपद मिळाल्यावर सुरू झाले. हा संदर्भ लक्षात घ्यावा लागेल. राज्यांच्या अधिकारांची थेट पायमल्ली करताना आधी चारसहा लाख कोटी रुपयांच्या अगडबंब 'केंद्रीय सरकारप्रणीत'– थेट खात्यात पैसे योजना आणल्या गेल्या. घोषित केल्या गेल्या. मग, प्रणेत्यांकडून अमुक

योजनेच्या एकंदर निधीपैकी ७० टक्के मिळणार आणि उरलेले ३० टक्के राज्य सरकारकडून, असा तपशील बाहेर आला. त्याहीनंतरच्या वर्षांमध्ये, आता ७० टक्क्यांऐवजी ५० टक्के, ५० ऐवजी २० टक्केच, असे सुरू झाले. तरीही योजनेचे नाव मात्र 'प्रधानमंत्री' अमुकतमुक योजना, असेच आणि वर पंतप्रधानांचा फोटोबिटो आहेच. अशा प्रकारच्या निर्गल बाजारतंत्रातून, 'पैसा तुमचा, नाव माझे' असा खेळ सुरू झाला.

## राज्य यादीतील विषय

राज्यांतर्गत बंधारे वा धरणे, स्थानिक बंदरे, रस्ते, राज्यसीमा, शिक्षण, परीक्षा, आरोग्य, सहकारी संस्था.. हे सर्व संविधानाच्या सातव्या अनुसूचीनुसार राज्य यादीतील विषय आहेत. यादी मोठीच आहे, पण अशा विषयांचे अधिकार स्वत:कडे घेण्याची एक कार्यपद्धतीच गेल्या काही वर्षांत दिसते आहे – चर्चा नाही, समित्या नाहीत, आणि संसदेत विधेयक, बहुमताच्या जोरावर मिळवू मंजुरी. हे आव्हान केवळ राज्यांना नसून प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थेला आहे आणि मूलत:, सरकारने जबाबदार असले पाहिजे या तत्त्वालाच हरताळ फासला जातो आहे. जबाबदार सरकार म्हणजे लोकांच्या गरजांसाठी काम करणारे, लोकांची देखरेख असणारे सरकार. असे सरकार चालवण्यासाठी स्थानिक माहिती लागते, कर्मचारीवर्ग आवश्यक असतो. आता याउलट चित्र दिसल्याने अखेर, लोकांना अर्ध्यामुर्ध्या सेवा मिळतात. 'स्वच्छ भारत' किंवा कृषी कल्याण योजनेचे परीक्षण अहवाल सांगतात की इतका पैसा खर्च झाला, स्वच्छतागृहांची इतकी 'युनिट्स' बांधली वगैरे. पण लोकांची रड असते की, त्यात पाणी नाही. पाणीपुरवठा हा स्थानिक स्वराज्य संस्थेचा विषय. पाणी मिळते की नाही हे काय दिल्लीहून बघत राहणार का? म्हणून मग शौचालय आहे, त्यात पाणी नाही, अशी स्थिती दिसते आणि पैसा वायाच जातो.



**पलानिवेल त्यागराजन हे २०१६ पासून तमिळनाडू विधानसभेचे सदस्य आणि मे २०२१पासून वित्तमंत्री आहेत. यापूर्वी सिंगापुरात स्टँडर्ड चार्टर्ड बँकेचे व्यवस्थापकीय संचालक (वित्तबाजार) म्हणून त्यांनी काम केले असून अमेरिकेतील 'एमआयटी'तून व्यवस्थापकीय पदवी, तर बफेलो विद्यापीठातून डॉक्टरेट त्यांनी मिळवली आहे.**

## 'केंद्रा'चा कल्पक हिशेबीपणा..

राज्य यादीतील विषयांवर स्वतंत्रपणे निधी उभारण्याची, कर्जे घेण्याची व ती वेळेत वा वेळेपूर्वी फेडण्याची मुभा राज्यांना आहे. मात्र 'केंद्र' सरकारने याविषयी जी काही हिशेबी खेळी सुरू केली आहे, ती कल्पकच म्हटली पाहिजे. या खेळीशी संविधानातील अनुच्छेद '२९३ (३)'चा संबंध आहे. (अनुच्छेद २९३(३) नुसार : भारत सरकारने किंवा त्याच्या पूर्वाधिकारी सरकारने राज्यास जे कर्ज दिलेले असे किंवा ज्याच्याबाबत भारत सरकारने किंवा त्याच्या पूर्वाधिकारी सरकारने हमी दिली असेल, त्या कर्जाचा कोणताही भाग अजून येणे बाकी असेल तर, त्या राज्याला भारत सरकारच्या संमतीशिवाय कोणतेही कर्ज उभारता येणार नाही).

या अनुच्छेदाचा संदर्भ संघराज्य व्यवस्थेला कसा काय, हे तमिळनाडूच्या उदाहरणावरून पाहू. राज्यात आमच्या आधी अ. भा. अण्णा द्रमुक पक्षाचे सरकार होते आणि भाजपशी आघाडी करणारा हा पक्ष आहे, तरीसुद्धा 'केंद्र सरकारचे बिनव्याजी कर्ज' त्या सरकारने कधीही घेतले नाही, असे का झाले? याचे कारणच असे की, हे असले कर्ज म्हणजे निव्वळ फसवे आमिष, हे अगदी स्पष्ट झालेले होते. बरे असल्या कर्जाच्या रकमाही फार नव्हे, तीनचारशे कोटी रुपयांपर्यंतच्याच, पण अट अशी की या कर्जाची मुदत ५० वर्षे इतकीच राहील. एकापरीने हे स्वस्त कर्ज वाटेल.. कारण समजा मी तुम्हाला आज १०० रुपये दिले नि म्हणालो की दर वर्षांला फक्त दोन रुपये अशा रीतीने हे बिनव्याजी कर्ज फेडायचे आहे, तर प्रत्यक्षात तुम्हाला आजच्या तुलनेत फारतर पंधरावीस रुपयेच फेडावे लागणार आहेत, महागाई इतकी वाढते आहे की ५० वर्षांनी १०० रुपयांचे मूल्य आजच्या पंधरावीस इतकेच होणार. पण यात खरा बडगा आहे तो मुदतीच्या अटीचा. इतकीच वर्षे. जास्त नाही अन कमीसुद्धा नाही. इथे आपण, कर्ज देण्यामागच्या हेतूवर शंका घेऊ लागतो. कर्जफेड लवकर वा मुदतीपूर्वी का बरे नाही करायची? त्यातून काय साधणार? राज्यात आमचे सरकार आले, तेव्हा आम्हालाही ३०० कोटी रुपयांच्या तसल्या बिनव्याजी कर्जाचा पर्याय खुला होता. आम्ही विचार केला, राज्यातील आमच्या आधीच्या सरकारने धुडकावलेला हा प्रस्ताव. आमचा अर्थसंकल्प तीन लाख कोटी रुपयांचा आणि त्यात भांडवली खर्चाचा वाटा ३०,००० कोटी रुपयांचा..

म्हणजे भांडवली खर्चाच्या दहा टक्के कर्ज. म्हणून ते आम्हीही नाकारले. पण नंतर आम्हाला आतून अशीही माहिती मिळाली की, आत्ताचे हे कर्ज स्वीकारा वा नाकारा– राज्यावर '२९३ (३)'चा बडगा आधीच उगारण्यात आलेला आहे.

हा मुद्दा अगदी तांत्रिक आहे.. आम्ही जरी आंतरराष्ट्रीय संस्थांकडून कर्ज घ्यायला गेलो तरी '२९३ (३)' मधल्या 'येणे बाकी असेल तर.. भारत सरकारच्या संमतीशिवाय.. कर्ज उभारता येणार नाही' हे बंधन आमच्यावर पडणारच. कारण असे नवे कर्ज हे 'कर्जावर कर्ज' ठरणार. बरे हे घटनात्मक बंधन कोणत्या रकमेच्या वा किती मुदतीच्या कोणत्या









प्रकारच्या कर्जासाठी आत्ता उगारले जाते आहे, हे आंतरराष्ट्रीय यंत्रणा पाहतात असेही नाही. ती भारत सरकारचीच अट. जागतिक बँक तमिळनाडू राज्याला ५०० कोटी रुपयांचे कर्ज द्यायला तयार असते, त्याचा करार तमिळनाडू राज्याशी होतो, पण निधी येण्याची वाट अशी काही आहे की, प्रत्यक्ष पैसा येतो तो भारत सरकारकडे. मग तिथून राज्याकडे. म्हणजे तांत्रिकदृष्ट्या, जागतिक बँकेने भारत सरकारला कर्ज दिले आणि भारत सरकारने तमिळनाडू सरकारला कर्ज दिले. प्रत्यक्षात, तमिळनाडू हा भारत सरकारचा (ऋणको) नसूनही आणि आधीचे कर्ज मुदतीपूर्वी फेडण्याची तयारी असूनही घटनात्मक बंधनाचा बागुलबोवा.

पुन्हा यातला बारकावा पाहा. तमिळनाडू काय, केरळ काय किंवा कर्नाटकासारखी अन्य मोठी राज्ये. त्यांना जागतिक बँकेच्या कर्जातून उभे राहणारे प्रकल्प मिळू शकतात कारण मुळात त्या राज्यांची परतफेडीची क्षमता असते, हे पाहिले जाते. बँका त्यांनाच कर्ज देणार, ज्यांची परतफेडीची ऐपत आहे – हा साधा नियम. तरीही आडकाठी आहेच.

आणखी एक आडकाठी म्हणजे जपानची 'जेआयसीए', जर्मनीची 'केएफडब्लू' असो वा आशियाई विकास बँक, आशियाई पायाभूत गुंतवणूक बँक.. अशा साऱ्या आंतरराष्ट्रीय धनकोंना 'सांगण्यात आलेले' आहे की, त्यांनी एकेका राज्याला एकेकाच प्रकल्पासाठी कर्ज द्यायचे. हा नियम अलिखितच आहे पण तो या (केंद्र) सरकारने रेटलेला आहे. अशाने जागतिक बँकेकडून भारतीय प्रकल्पांना मिळणाऱ्या कर्जाला ओहोटीच लागेल. कर्जफेड न करणे चुकीचेच – पण इथे फेडण्याची क्षमता असलेल्यांनाच डावलले जाते आहे.

याला काही अर्थ नाही. एक राज्य एक प्रकल्प हे बंधनही समन्यायी म्हणून ठीक, पण अशा राज्यांना वर्षभरात एकेकदा कर्ज देऊन झाल्यावरही पुन्हा एखाद्या ऐपतदार राज्याला पुन्हा कर्ज देण्याची तयारी आंतरराष्ट्रीय धनकोंनी दाखवली, तर तुमची हरकत कशाला? एकसूत्रीकरणाच्या नावाखाली तुम्ही विकास का म्हणून रोखताहात? या असल्या अटींमध्ये येत्या काळात वाढच होऊ शकते, अशी चिंता आमच्या अंतर्गत चर्चामध्ये व्यक्त केली गेली आहे.



संघ (केंद्र) सरकारच्या कर्जावर 'एफआरबीएम' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वित्तीय उत्तरदायित्व कायद्याचे बंधन आहे, तसा 'एफआरए' कायदा तमिळनाडूतही २००३ पासूनच आहे, पण आपत्काळात त्यात बदलही होऊ शकतात, हे लक्षात घेतले पाहिजे. मात्र तसे करू दिले जात नाही, शिवाय संघ व राज्याने वाटून घेण्याच्या करांमध्ये वाढ न करता, २० टक्के कर हे 'अधिभार' म्हणून संघ सरकारच वसूल करते. पैकी राज्यांचा वाटा चौदाव्या वित्त आयोगानुसार ३२ वरून ४२ टक्के होणार अशी घोषणा झाली, ती विश्लेषणाअंती पोकळ ठरणारी, कारण राज्यांना तेवढ्या प्रमाणात वाटा प्रत्यक्षात मिळत नसल्याचे दिसते. दिल्लीत ३० डिसेंबर रोजी झालेल्या बैठकीत मी बोलूनही दाखवले होते की, गेल्या सात वर्षांत करांमधला केंद्राचा वाटा तर्काधिष्ठित अनुमानाप्रमाणे ६० टक्क्यांनी वाढला असून अनुदाने आणि विविध उपक्रमांसाठीचा खर्च मात्र १५०








टक्क्यांनी वाढलेला आहे, याचा अर्थच असा की राज्यांना 'करांमधील वाटा' कमी दिला जातो आणि 'केंद्राची योजना' 'केंद्राचे अनुदान', 'केंद्राचा उपक्रम' म्हणत राज्यांमध्ये केंद्राचा निधी अधिक खर्च केला जातो.

आपली व्यवस्था संघराज्यीय आहे. तिचे हे 'केंद्री'करण रोखण्यासाठी, संघराज्याची आजची अवस्था जाणून त्यावर प्रश्न विचारणे हे पहिले पाऊल आहे, ते उचललेच पाहिजे.


*** ही मुलाखत 'दि इंडियन एक्स्प्रेस'चे वरिष्ठ सहायक संपादक सनी वर्मा यांनी घेतली होती, तिचा हा संपादित अनुवाद आहे.**

**(साभार : दै. लोकसत्ता)**

■■■

# डॉ. आंबेडकर : अहिंसक हिंदवी स्वराज्य संकल्पना

**डॉ.प्रा.प्रकाश पवार**




महात्मा फुले



न्या. रानडे

लोकहितवादी





राजारामशास्त्री भागवत


डॉ. आंबेडकर





सयाजीराव गायकवाड

छत्रपती शाहू महाराज



केळूसकर गुरुजी




**अहिंसेच्या तत्त्वाचा आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या अहिंसा तत्त्वाचा एकमेकांशी संबंध दिसतो. छत्रपती शिवाजी महाराजांनी साम, दाम, दंड, भेद या चारही तत्त्वांचा उपयोग केला. परंतु, या चार तत्त्वांचे वर्गीकरण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या अहिंसेच्या तत्त्वाप्रमाणेच होते. याची दोन कारणे आहेत. एक, साम या तत्त्वाचा वापर करताना छत्रपती शिवाजी महाराजांनी युद्धामध्ये सलोखा केला होता. संधी केली. तसेच सभोवतालच्या सत्तांचे संबंध समजून घेतले. त्यांनी अशोकाच्या कलिंग युद्धाप्रमाणे कोणतेही मोठे युद्ध केले नाही. पुरंदर किल्ल्यावरील युद्धाच्या वेळी त्यांनी मनुष्यहानी वाचवली. हे उदाहरण हिंसेपेक्षा अहिंसेकडे झुकलेले दिसते.**

आधुनिक काळात हिंदवी स्वराज्य संकल्पनेचे विविध अन्वयार्थ लावले गेले. यांची काही महत्त्वाची उदाहरणे एकोणिसाव्या शतकातील पुढील चार आहेत. एक, लोकहितवादींनी हिंदवी स्वराज्याचा अर्थ स्पष्ट केला होता (राजकीय क्रांती). दोन, महात्मा फुले यांनी हिंदवी स्वराज्याचा अर्थ स्पष्ट केला (हरीत स्वराज्य व शूद्रातिशूद्रांचे स्वराज्य). तीन, न्या. रानडे यानी हिंदवी स्वराज्याचा अर्थ स्पष्ट केला. चार, राजारामशास्त्री भागवत यांनी हिंदवी स्वराज्याचा अर्थ स्पष्ट केला. तसेच विसाव्या शतकामध्ये हिंदवी स्वराज्याचा अर्थ लावण्याची परंपरा सुरु राहिली. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धामध्ये अशीच तीन-चार महत्त्वाची सयाजीराव गायकवाड, केळूसकर गुरुजी इत्यादीचे विचार व कार्य डॉ. आंबेडकरांना महत्वाचे वाटत होते. त्यामुळे हिंदवी स्वराज्याचा अर्थ लावणारी ही परंपरा व्यापक अर्थाने आधुनिक उदारमतवादी स्वरूपाची होती. या आधुनिक उदारमतवादी चौकटीशी सुसंगत आणि चिकित्सक विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी व्यक्त केले.

## सुधारणावादी हिंदवी स्वराज्य संकल्पनेची वैशिष्ट्ये

महात्मा फुले, लोकहितवादी, न्यायमूर्ती रानडे, राजारामशास्त्री भागवत, शाहू महाराज, महाराजा सयाजीराव गायकवाड, केळूसकर गुरुजी व डॉ. आंबेडकर यांनी स्थूलमानाने



उदाहरणे दिसतात एक, शाहू महाराजांनी हिंदवी स्वराज्याचा अर्थ सुधारणावादी स्पष्ट केला दोन, महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी हिंदवी स्वराज्याचा सुधारणावादी अर्थ स्पष्ट करणारी परंपरा नव्याने विकसित केली. तीन, डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी वेळोवेळी शिवरायांच्या स्वराज्याबद्दल आस्था व्यक्त केली. विशेष म्हणजे महात्मा फुले, लोकहितवादी, न्या. रानडे, राजारामशास्त्री भागवत, शाहू महाराज, महाराजा पुढील वैशिष्टे स्पष्ट केली एक, हिंदवी स्वराज्य ही एक राजकीय क्रांती होती. दोन, हिंदवी स्वराज्य ही प्रक्रिया सुधारणावादी होती. कारण, महात्मा फुले यांनी स्वराज्य संकल्पनेचे दोन अर्थ स्पष्ट केले होते. एक अर्थ, स्त्रीशूद्रातिशूद्रांचे स्वराज्य. दुसरा अर्थ म्हणजे हरित स्वराज्याची संकल्पना असा लावला होता. कारण, कुणबी ही धारणा हरितसंस्कृती केंद्रीत आहे. तीन, हिंदवी स्वराज्य ही संकल्पना तळागाळातील समूहाच्या

आत्मस्वाभिमानाचा आविष्कार होता. चार, आधुनिक राज्य राष्ट्र-राष्ट्रवाद या संकल्पनांचा मुख्य स्रोत हिंदवी स्वराज्य ही संकल्पना होती. पाच, हिंदवी स्वराज्याचा आधार संमिश्र स्वरूपाचा समूह होता. हिंदवी स्वराज्य संकल्पना समावेशन या तत्त्वाचा पुरस्कार करत होती. शेतकरी, मुस्लिम, आजच्या अर्थाने अनुसूचित जाती, भटके विमुक्त, ब्राह्मणेत्तर अशा विविध समूहांचा सहभाग हिंदवी स्वराज्यात होता. या वैशिष्ट्यामधील कळीचा आशय महात्मा फुले, लोकहितवादी, न्या. रानडे, राजारामशास्त्री भागवत, शाहू महाराज, महाराजा सयाजीराव गायकवाड, केळूसकर गुरुजी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मान्य होता यासंदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार लक्षवेधक ठरणारे आहेत. आजच्या काळात ही परंपरा समाजाला सुधारणावादाची दृष्टी देते. एकविसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकात ही परंपरा महत्त्वाची आहे. त्या परंपरेचा नव्याने शोध घेण्याची गरज आहे. कारण, त्या परंपरेत तळागाळातील लोकांच्या मनातील खरी आयडिया ऑफ इंडिया किंवा हिंदुस्थानीयतची संकल्पना दिसते. ती कोणती होती? याचे विवेचन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कसे केले होते, हे आजच्या संदर्भात समजून घेणे महत्त्वाचे ठरते.

## डॉ. आंबेडकरप्रणीत स्वराज्याचा अन्वयार्थ

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भाषण आणि लेखनात शिवरायांच्या स्वराज्याबद्दलच्या आकर्षणाचे प्रतिबिंब उमटलेले दिसते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन आणि कार्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज एक प्रेरणा स्रोत राहिलेले दिसतात. तसेच स्वराज्य संकल्पनेची त्यांनी स्वतंत्रपणे चिकित्साही केली. डॉ. आंबेडकरांच्या लेखनात आणि भाषणांमध्ये तिसऱ्या आणि चौथ्या दशकात शिवरायाचे संदर्भ गंभीरपणे आलेले दिसतात. शिवराय याचे डावपेच किंवा रणनीती पेक्षाही ध्येयधोरण म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे भाष्य जास्त महत्त्वाचे आहे. डॉ. आंबेडकरांच्या आधी शिवाजी महाराजांच्या स्वराज्याचा अर्थ महात्मा फुले आणि न्यायमूर्ती रानडे यांनी लावला होता. परंतु, शिवाजी महाराजांच्याबद्दलचे न्यायमूर्ती रानडे यांचे विचार त्यांनी






चिकित्सकपणे स्वीकारले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या काळात छत्रपती शिवाजी महाराज हे राष्ट्रवादाचे प्रतीक झाले होते, महात्मा फुले व न्यायमूर्ती रानडे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याचा अन्वयार्थ लावलेला होता, महात्मा फुले यांनी कुळवाडी कुलभूषण असे शिवरायांचे वर्णन केले होते. हा अर्थ हरित स्वराज्यवाचक दृष्टी देणारा आहे. त्यांनी शिवरायावर लादलेले ब्राह्मण्यवाद विषयक विचार अमान्य केले. त्याविरोधी चळवळ चालविली होती. विशेषत: महात्मा फुले हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे एक गुरु होते. शिवाजी महाराजांचे स्वराज्य शूद्रातिशूद्रांचे होते, हा अन्वयार्थ महात्मा फुले यांनी लावला होता. महात्मा फुले यांच्या या विचारांचे डॉ. आबेडकरांच्या कार्य आणि विचारांमध्ये प्रतिबिंब उमटलेले दिसते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी बहिष्कृतांच्या स्वराज्याची मागणी केली होती. तसेच न्यायमूर्ती रानडे यांच्या सामाजिक सुधारणा विचारांविषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आस्था होती. न्यायमूर्ती रानडे यांनी 'राईज ऑफ द मराठा पॉवर हा ग्रंथ लिहिला होता. या ग्रंथात त्यांनी भक्ती चळवळीने सुधारणा केल्या. त्यामुळे स्वराज्य स्थापन झाले, असा अन्वयार्थ लावला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर न्यायमूर्ती रानडे यांच्या या अन्वयार्थाला दुजोरा देतात. हा अन्वयार्थ त्यांनी अमान्य केला नाही.

## तिसऱ्या दशकातील घडामोडी


तिसऱ्या दशकामध्ये कम्युनिस्ट पुढारी वर्गामध्ये शिवाजी महाराजांच्या प्रतिकाबद्दल मतभिन्नता होती (पानतावणे गंगाधर, १९९६ ९८०). तेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सार्वजनिकपणे छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याशी जवळीक दाखविली होती. त्यांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचे बलस्थान सुस्पष्टपणे दिसत होते. तसेच त्यांनी स्वराज्याच्या ऱ्हासाची कारणमीमांसा केली. त्यांनी मांडलेली तिसऱ्या दशकातील दोन महत्त्वाची उदाहरणे पुढीलप्रमाणे आहेत. एक, १९२७ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या त्रिशतसांवत्सरिक श्रीशिवाजी उत्सव साजरा झाला. त्या प्रसंगानिमित्त बदलापूरला श्रीशिवाजी उत्सव सभा झाली. त्या सभेचे अध्यक्षपद डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना गावकऱ्यांच्या सहमतीने देण्यात आले होते. त्यास अनुमोदन काळे, सुळे, पाटील व मोकाशी यांनी दिले. डॉ. आंबेडकर यांनी शिवाजी महाराजाचे चरित्र, कार्य आणि धोरण असे विवेचन केले. डॉ. आंबेडकर यांनी शिवरायांच्या अंगच्या निरनिराळ्या गुणांवर अत्यंत परिणामकारक असे एक तासभर भाषण केले. शेवटी एक महत्वाचा प्रश्न उपस्थित केला. शिवाजी महाराजांनी आपल्या लोकोत्तर गुणाने राज्य मिळवले ते त्याचे राज्य चिरकाल का टिकले नाही? त्या राज्याचा अभिमान सर्वांना सारखा नव्हता. हे याचे महत्त्वाचे कारण त्यांनी स्पष्ट केले. रात्री डॉ. आंबेडकरांच्या पुढारपणाखाली अदमासे १५ हजार लोकांसह नगर प्रदक्षिणा करून आल्यावर हा उत्सव समाप्त झाला. या उत्सवात देवराव नाईक, शिवतरकर, गणपत जाधव हे डॉ. आंबेडकरांचे सहकारी सहभागी झाले होते (बहिष्कृत भारत, २० मे, १९२७), तेव्हा त्यांनी दोन मुद्दे मांडले होते. अ). शिवाजी महाराजांनी आपल्या गुणांनी स्वराज्याची स्थापना

केली. या वैचारिक व राजकीय घडामोडीशी डॉ. आंबेडकर व्यापक अर्थाने सहमत होते. ब) त्या काळातील समाजातील विषमता आणि त्या राज्याचा सर्वांना सारखा अभिमान नव्हता. या कारणामुळे मराठा राज्यसंस्थेचा ऱ्हास झाला अशी त्याची भूमिका होती (धनंजय कीर, २००६ :९५), राजकीय स्वराज्याला त्या वेळच्या समाजातील समतेचा पाया नव्हता. तसेच पेशवाई राज्यसंस्थेने समाजातील विषमतेत भर घातली. त्यामुळे स्वराज्याचा पाया भक्कम झाला नाही. या भाषणाची त्यांची राजकीय स्वातंत्र्य आणि सामाजिक स्वातंत्र्य (स्वातंत्र्य, समता, बंधुता) अशी चौकट होती, असे दिसते. दोन, महाड सत्याग्रह प्रसंगी हर हर महादेव, महाड सत्याग्रह की जय




अशी घोषणा देण्यात आली होती. तसेच आनंदराव चित्रे यांनी रायगडाकडे बोट दाखवून सत्याग्रहीकडून शिवरायांचा व जिजाऊंचा जयजयकार करण्यास सांगितले होते. सत्याग्रहाला यश मिळण्याची प्रेरणा शिवराय व जिजाऊ आहेत अशी त्यांची धारणा होती (आंबेडकर, खंड १८, भाग १: १०७). परिषद संपल्यानंतर डॉ. आंबेडकर आणि त्यांचे सहकारी महाड येथील बुद्धकालीन लेणी पाहावयास गेले. लेणी पाहून झाल्यावर डॉ. आंबेडकर आणि त्याचे सहकारी छत्रपती शिवाजी महाराज यांची राजधानी रायगड पाहण्यासाठी गेले. छत्रपती शिवाजी महाराज स्वराज्याचे आणि राष्ट्राभिमान यांचे प्रतीक आधुनिक काळात होते. छत्रपती शिवाजी महाराज हे डॉ. आंबेडकरांच्या स्वराज्य आणि राष्ट्र संकल्पनेचे एक स्फूर्तिस्थान होते (कीर धनंजय, २००६ :१२१). तेव्हा शिवाजी महाराज की जय! अशा घोषणा देत मंडळी रायगड किल्ला चढत होती. महाराजांच्या समाधीवर तांब्याचा पुतळा बसविण्याची इच्छा व्यक्त करण्यात आली. दुसऱ्या दिवशी रायगड उतरतानाही त्यांनी शिवाजी महाराज की जय असा जयघोष केला होता (खैरमोडे चांगदेव, खंड ३, १९६४: २२७– २२९). कुलाबा समाचार शिवाजी महाराजांची प्रतिमा ब्राह्मण्यवादी अशी मांडत होते. तेव्हा डॉ. आंबेडकरांनी शिवाजी महाराजांची प्रतिमा स्वराज्य संस्थापक आणि महात्मा फुलेंप्रमाणे तळागाळातील लोकांचे स्वराज्य अशी कल्पिली होती. यामुळे कुलाबा समाचार व डॉ. आंबेडकर यांच्या शिवरायविषयक प्रतिमांमध्ये व्दैत होते. डॉ. आंबेडकरांचा शिवरायांकडे पाहण्याचा दृष्टिकोन व्यक्तीच्या कर्तृत्वाला संधी देणारा होता, तर कुलाबा समाचारचा दृष्टिकोन हिंदुत्ववादी व ब्राह्मण्यवादी होता (खैरमोडे चांगदेव, खंड ३, १९६४: २३२–२३३). डॉ. आंबेडकर शिवाजी महाराजांच्या सिंहासनावर बसले, अशी आवई उठवून डॉ. आंबेडकर यांच्या विरुद्ध लोकांच्या मनात गैरसमजाचे विष कालवण्याचा त्यांच्या शत्रूंनी प्रयत्न केला (कीर धनंजय, २००६:१२२). या प्रकारचे वृत्तांकन उच्च जातीय वृत्तपत्रांनी केले होते.

यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी "वेटिंग फॉर व्हिसा' हे पुस्तक लिहिले. त्या आत्मकथेमध्ये त्यांनी रायगडवर घडलेल्या व रायगडच्या संदर्भात वृत्तांकन केलेल्या गोष्टीवरती अवाक्षरही लिहिलेले नाही. तसेच देवगिरी किल्ला पाहण्यास त्यांची सहल गेली होती. तेव्हा पाण्याच्या संदर्भात घडलेल्या भेदभावाचे त्यांनी विवेचन केले आहे. त्या वादविवादानंतर डॉ. आंबेडकर देवगिरी किल्ला पाहण्यासाठी गेले. तसेच ते अजिंठा वेरूळच्या लेण्या पाहण्यासाठी गेले. यामधून देखील अप्रत्यक्षपणे शिवाजी महाराजांच्या स्वराज्य संकल्पनेबद्दलची त्यांना ओढ होती. स्वराज्य संकल्पनेबद्दल त्यांच्या मनामध्ये आकर्षण होते. त्यांनी स्वराज्याचा अर्थ स्वशासन असा घेतला होता. महात्मा फुले यांनी शिवाजी महाराजांचे स्वराज्य शूद्रातिशूद्रांचे, हरित स्वराज्य असे कल्पिले होते. तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर भविष्यात बहिष्कृतांचे स्वराज्य आणण्याचा विचार मांडत होते. हा एका अर्थाने महात्मा फुले यांच्या विचारांचा एक नैसर्गिक विकास होता. महात्मा फुले यांनी कल्पिलेल्या शुद्रातिशुद्रांच्या स्वराज्याची ही प्रगत अवस्था होती. या विचारांची पाळेमुळे खोलवर छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याशी जोडली जात होती. परंतु, हा प्रवाह लोकमान्य टिळकांपेक्षा व क्रांतिकारक विचारांपेक्षा वेगळा होता. व्यक्तिपूजेपेक्षा त्यांनी विचारांची आणि मूल्यांची जोपासना करण्यावरती भर दिला होता. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य संकल्पनेतील सर्वसमावेशक भागीदारी त्यांनी मध्यवर्ती कल्पिली होती. तसेच रायगड येथे राजकीय क्रांती घडली होती. त्याच भूमीवरती महाड येथे राजकीय क्रांतीबरोबर सामाजिक क्रांती अशी दुहेरी भूमिका डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घेतली होती. महाडची क्रांती स्वातंत्र्य, समता, बंधुता मूल्यांची होती. तिचे वर्णन डॉ. आंबेडकरांनी फ्रेंच राज्यक्रांतीप्रमाणे केले आहे. फ्रेंच राज्यक्रांतीशी त्यांनी महाडच्या क्रांतीची तुलना केली आहे. डॉ. आंबेडकर यांनी शिवाजी महाराजांनी घडवलेल्या राजकीय क्रांतीनंतर सामाजिक क्रांती घडविली. त्यामुळे शिवाजी महाराजांनी सुरू केलेल्या राजकीय क्रांतीचा हा नैसर्गिक पुढचा टप्पा होता. महाड हे स्थळ निवडण्यापाठीमागे अनेक कारणे होती. परंतु, त्या अनेक कारणांपैकी एक कारण महाड हे रायगडच्या परिसरातील स्थळ होते. यामुळेच रायगडच्याजवळ महाड हे स्थळ निवडण्यात आले.


बुद्ध लेणी

## चौथ्या दशकातील घडामोडी

चौथ्या दशकामध्ये डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी गंभीरपणे छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याचा अन्वयार्थ लावलेला दिसतो. या दशकातील डॉ बाबासाहेब

आंबेडकरांच्या लिखाणातील दोन उदाहरणे अत्यंत महत्वाची आहेत. एक, 'हु व्हेअर दि शुद्राज' या ग्रंथामध्ये विवेचन करताना डॉ. आंबेडकर यानी शिवाजी महाराजांच्या स्वराज्याचा अन्वयार्थ राजकीय समाजशास्त्राच्या संदर्भात लावलेला आहे. उच्च जाती, चांद्रसेनीय कायस्थ प्रभू आणि मराठा या तीन समूहामधील राजकीय सत्तास्पर्धेचे त्यांनी विवेचन केलेले आहे. सत्ता कशी ब्राह्मणेतरांकडे वळली याचा सिद्धान्त त्यांनी मांडला. दोन, भारतीय राज्यघटनेच्या गुणांविषयी बोलताना त्यांना भारताच्या स्वातंत्र्याविषयी चिंता चाटत होती. राष्ट्राच्या भवितव्यासाठी बंधुत्व आणि प्रतिष्ठा या दोन गोष्टी त्यांना महत्वाच्या वाटत होत्या. भारतीय जनतेच्या स्वतःच्याच विश्वासघातामुळे, देशद्रोहीपणामुळे त्यांना स्वातंत्र्य गमवावे लागले. त्यासंदर्भातील डॉ. आंबेडकरांनी विविध उदाहरणे दिली. त्यापैकी एक उदाहरण सोळाव्या शतकातील त्यांनी दिले होते. जेव्हा शिवाजी महाराज हिंदूच्या स्वातंत्र्यासाठी युद्ध करत होते. तेव्हा इतर मराठे सरदार व रजपूत मोगल बादशहाच्या बाजूने लढत होते (कीर धनंजय, २००६:४५८). थोडक्यात, शिवाजी महाराजांच्या स्वराज्याच्या प्रयत्नांमध्ये त्यांना विश्वास आणि राष्ट्र राष्ट्रवाद दिसत होता. परंतु, शिवाजी महाराजांच्या विरुद्ध लढणाऱ्या लोकांमध्ये त्यांना विश्वासघात व देशद्रोह दिसत होता. कोल्हापूर संस्थान दलित प्रजा परिषदेत ३० डिसेंबर १९३९ रोजी डॉ. आंबेडकरांनी शिवरायांच्या स्वराज्यापुढे ब्राह्मण्याचे आव्हान होते हे स्पष्ट केले. तेव्हा ब्राह्मण्य नष्ट करता आले नाही. परंतु, ब्राह्मण्यांची नांगी शाहू छत्रपतींनी ठेचली, अशी त्यांनी भूमिका मांडली होती (आंबेडकर, खंड १८, भाग-२, २०१६ :३०७). शिवरायांच्या स्वराज्य संकल्पनेचा त्यांनी सकारात्मक अर्थ लावला होता. त्या परंपरेबद्दल त्यांना नैसगिक ओढ होती. परंतु, डॉ. आंबेडकर स्वराज्याची चिकित्सा करतात. तसेच स्वराज्याच्यापुढे ब्राह्मण्याचे आव्हान होते. हा मुद्दा स्पष्ट करतात. तसेच बहिष्कृतांच्या स्वराज्याची त्यांनी मागणी केली होती. शिवाजी महाराज, महात्मा फुले यांच्या स्वराज्य धारणेचा डॉ. आंबेडकरांनी आधुनिकतेच्या संदर्भात विकास केला. महात्मा फुलेंपेक्षा त्यांनी वेगळे शिवाजी महाराजांचे प्रतीक मांडले. विशेषत: रायगड येथे आधी राजकीय क्रांती झाली, तेथे नंतर त्यांनी सामाजिक व धार्मिक क्रांती घडवली. यामुळे रायगड समग्र क्रांतीची भूमी ठरली. तेव्हा त्यांनी बुद्ध लेण्या आणि रायगडसाठी वेळ दिला. या दोन्ही ऐतिहासिक घडामोडींची दखल त्यांनी एकाच वेळी घेतली. ही परंपरा एक पायवाट होती. या परंपरेची त्यांनी चिकित्सा केली. तसेच या परंपरेची नाळ त्यांनी आधुनिकतेशी जोडून घेतली.

## अहिंसक स्वराज्य संकल्पना

छत्रपती शिवाजी महाराजांची स्वराज्याची संकल्पना



अहिंसक स्वरूपाची होती. हा विचार छत्रपती शिवाजी महाराज, संत तुकाराम महाराज व डॉ. आंबेडकर यांच्या अहिंसा विचारांची तुलना केली तर सहज स्पष्ट होतो. हा विचार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या युक्तिवादाच्या आधारे स्पष्ट होतो. विशेषतः छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारातील अहिंसा संकल्पना सिद्धान्त म्हणून साम्य असणारी दिसते. कारण, डॉ. आंबेडकर यांनी अनेक वेळा आपण अहिंसा तत्त्वाला शिरोधार्ह मानणारा माणूस आहे असे म्हटले होते. त्यांनी हिंसा आणि अहिंसेतील फरक स्पष्ट केला होता. तसेच त्यांनी अहिंसेची संकल्पना वेगवेगळी उदाहरणे देऊन स्पष्ट केली होती. अहिंसेची संकल्पना स्पष्ट करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तुकाराम महाराजांच्या अभंगातील एक उदाहरण दिले होते.

**दया तिचे नाव भूतांचे पाळण**
**आणिक निर्दाळण कंटकाचे ॥**

या अभंगाचे विवेचन डॉ. आंबेडकरांनी करताना अहिंसेची दोन तत्त्वे स्पष्ट केली होती. एक प्राणिमात्रांसंबंधी प्रेम व दया. दोन, दुष्ट लोकांचा विनाश. हे दुसरे अहिंसेचे तत्त्व डॉ. आंबेडकरांनी मांडले. (डॉ. आंबेडकर, खंड १८, भाग २, ४२९-४३०). या अहिंसेच्या तत्त्वाचा आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या अहिंसा तत्त्वाचा एकमेकांशी संबंध दिसतो. छत्रपती शिवाजी महाराजांनी साम, दाम, दंड, भेद या चारही तत्त्वांचा उपयोग केला. परंतु, या चार तत्त्वांचे वर्गीकरण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या अहिंसेच्या तत्त्वाप्रमाणेच होते. याची दोन कारणे आहेत. एक, साम या तत्त्वाचा वापर करताना छत्रपती शिवाजी महाराजांनी युद्धामध्ये सलोखा केला होता. संधी केली. तसेच सभोवतालच्या सत्ताचे संबंध समजून घेतले. त्यांनी अशोकाच्या कलिंग युद्धाप्रमाणे कोणतेही मोठे युद्ध केले नाही. पुरंदर किल्ल्यावरील युद्धाच्या वेळी त्यांनी मनुष्यहानी वाचवली. हे उदाहरण हिंसेपेक्षा अहिंसेकडे झुकलेले दिसते. शिवाजी महाराजांनी वृक्षवेल्लीबद्दल आदेश देताना प्राणिमात्रांबरोबर वृक्षवलीचेही संरक्षण करण्याची जबाबदारी घेतलेली दिसते. त्यामुळे त्यांनी मनुष्याला जसा जीव असतो तसा वनस्पतींनादेखील जीव असतो. ही धारणा आज्ञापत्राच्या नवव्या प्रकरणामध्ये व्यक्त झाली आहे (जोशी प्रल्हाद नरहर, १९६०: ४३-४४). दोन, शिवरायांनी कंटकांसाठी दंडशक्तीचा मार्ग वापरला होता. यावरून छत्रपती शिवराय आणि डॉ. आंबेडकर यांचे अहिंसेचे तत्त्व समान होते असे दिसते. तसेच शिवराय आणि संत तुकाराम महाराज यांचे अहिंसेचे तत्व समान होते असे दिसते.



## संदर्भसूची


१) आंबेडकर, २०१६. डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १८, भाग-१, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरचरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन.

२) आंबेडकर, १९८७, डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषण, खंड ३, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन.

३) आंबेडकर, २०१६ डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १८, भाग - २, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र साधने प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन.

४) खैरमोडे चांगदेव, १९६४, डॉ. भीमराव रामजी आंबेडकर चरित्र, खंड-३, प्रताप प्रकाश, मुंबई.


५) कीर धनजंय, १९९० व २००६, डॉ. बाबासाहेब आंबेडकर (चरित्र), चौथी व सातवी सुधारीत आवृत्ती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.

६) पानतावणे गंगाधर, १९९६, पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, प्रतिमा प्रकाशन, पुणे.

७) कांबळे अरुण, १९९३, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संत साहित्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई.

८) जोशी प्रल्हाद नरहर, १९६०, आज्ञापत्र, व्हीनस प्रकाशन, पुणे.



■■■



# परिवर्तनाचे शिल्पकार

## फुले-शाहू-आंबेडकर व्याख्यानमाला





डॉ.जयसिंगराव पवार



# मल्लविद्येचा आश्रयदाता
# राजर्षी शाहू महाराज



**परिवर्तनाचे शिल्पकार : फुले–शाहू–आंबेडकर या व्याख्यानमालेअंतर्गत राजर्षि शाहू यांनी मल्लविद्येविषयीचे आश्रयादाते म्हणून त्यांनी केलेल्या धोरणांचा व केलेल्या कार्याचा राजर्षि शाहू चरित्राचे अभ्यासकार आणि ज्येष्ठ इतिहासकार डॉ. जयसिंगराव पवार यांनी घेतलेला संक्षिप्त आढावा.**



मित्रहो, हिंदुस्थानचा ज्ञात इतिहास हा सर्वसाधारणपणे पाच हजार वर्षापूर्वीचा आहे. पण ज्याला लिखित इतिहास म्हणतो आपण, तो दोन ते अडीच हजार वर्षांचा आहे. या लिखित इतिहासामध्ये शेकडो नव्हे; तर हजारो राजे होऊन गेले आहेत. पण, हाताच्या बोटावर मोजण्याइतपतच ज्याला आपण थोर राजे म्हणू शकतो, महान राज्यकर्ते म्हणू शकतो, असे काही मोजकेच राजे होऊन गेलेले आहेत. राज्यकर्ते होऊन गेलेले आहेत. त्याच्यामध्ये राजर्षी शाहू आहेत, असं माझं अभ्यासाअंती मत बनलेलं आहे. महान राज्यकर्ता कोण? थोर राज्यकर्ता कोण? त्याचे निकष काय? तर इतिहासात असं दिसतं, की ज्यांनी मोठे पराक्रम केले, मोठं साम्राज्य निर्माण केलं, अशोकासारखं, धर्माचा प्रसार केला, त्याशिवाय ज्यांनी लोकाभिमुख राज्यकारभार केला, प्रजा हेच आपलं दैवत मानलं. लोककल्याण हाच ध्यास घेतला ते थोर होऊन गेले. पण, राजर्षी शाहू महाराजांच्या संदर्भात विचार करत असताना, पराक्रम गाजवायला फारसा वाव नव्हता. नव्हताच जवळजवळ. कारण, सगळ्या बाजूंनी इंग्रजांनी आपली सत्ता त्यांच्याभोवती आवळलेली होती. पण, मानवी जीवनाच्या अनेक क्षेत्रांमध्ये मोठमोठे पराक्रम केले. सामाजिक क्षेत्रामध्ये, धार्मिक क्षेत्रामध्ये बौद्धिक क्षेत्रामध्ये. शाहू महाराजांनी अनेक प्रयोग केले आणि ते लोकांच्यासाठी केले. आणि म्हणून लोकांच्या कल्याणाचा अहोरात्र विचार करणारा करणारा हा राजा, त्याला जनक राजाला जी पदवी मिळालेली होती राजर्षी, ती पदवी त्यांना मिळाली.

आणखी एक निकष आहे, आणि तो असा, की ज्या राज्यकर्त्यानं विद्या आणि कला यांना आश्रय दिला, आणि ज्या राज्यकर्त्याच्या कारकिर्दीमध्ये विद्या आणि कला यांचं सुवर्णयुग निर्माण झालं तो राज्यकर्ता महान राज्यकर्ता म्हणावा लागेल. नुसता पराक्रम, नुसती तलवार उपयोगाची नाही. साहित्याच्या क्षेत्रामध्ये, संगीताच्या क्षेत्रामध्ये, अन्य ललित कलांच्या क्षेत्रामध्ये ज्यानं सुवर्णयुग निर्माण केलं अशी किती लोकं आहेत? फार मोजके लोक आहेत. त्यामध्ये आपले राजर्षी शाहू छत्रपती आहेत. आणखी एक आवर्जुन नाव घेतलं पाहिजे, ते म्हणजे बडोद्याचे राजे सयाजीराव गायकवाड. त्यांचंही स्मरण याठिकाणी करायला पाहिजे. हे दोन थोर महात्मे, त्यांना नुसते राज्यकर्ता नाही, महात्मे म्हणावे लागेल, असे हे राज्यकर्ते होते. बौद्धिक विद्या, ललित कला या सर्वांचा परामर्श मला घेता येणार नाही. पण शाहू महाराजांची जी एक आवडती विद्या होती, त्याला मल्लविद्या म्हणतात, त्या



मल्लविद्येपासून आपण सुरूवात करूया.

अनेक राज्यकर्त्यांना मल्लविद्येचा छंद होता. पण, शाहू महाराज असे एक राज्यकर्ते होते, की त्यांना नुसताच छंद नव्हता, नुसतीच आवड नव्हती, तर ते स्वत:च एक मल्लयोद्धा होते. स्वत: मल्ल असलेला राजा त्यावेळी शाहू महाराजांच्या काळात तर कोणीच नव्हता. मल्लविद्येचे संस्कार त्यांच्या वडिलांनी म्हणजे आबासाहेब महाराजांनी केलेले होते. त्यावेळी तालमी होत्या, कागलला होत्या, कोल्हापुरामध्ये






तुरळक तालमी होत्या. ज्यावेळी आबासाहेबांनी त्यांना राजकोटला पाठवलं आणि नंतर त्यांना धारवाडला पाठवण्यात आलं, त्यावेळी अनेक विषयांचे तज्ज्ञ त्यांच्याबरोबर पाठवलेले होते. गुरूजी पाठवलेले होते आणि दोन मल्ल पाठवलेले होते. धारवाडला तर ज्याठिकाणी शाहू महाराजांचं निवासस्थान होतं, त्याठिकाणी मी जाऊन आलोय, ती मोठीच्या मोठी तालीम आहे. त्या तालमीलासुद्धा आम्ही भेट दिलेली आहे. तर त्याठिकाणी मल्लविद्येचं शिक्षण शाहू महाराजांना दिलं गेलं होतं. शाहू महाराजांचं राज्यारोहण हे १८९४ साली हा सोहळा घडून आला. त्यावेळेला शाहू महाराजांच्या कारकिर्दीतलं पहिलं मैदान, कुस्त्यांच्या खेळ होत असे त्याला मैदान हा शब्द होता, तर शाहू महाराजांच्या कारकिर्दीतलं पहिलं कुस्त्यांचं मैदान हे १८९४ साली झालं.

दुसऱ्याच वर्षी म्हणजे ९५ साली राजवाड्याच्या शेजारीच, शाहू महाराजांचं वास्तव्य हे बऱ्याचवेळा जुन्या राजवाड्यात असायचं, मोतीबाग तालमीची स्थापना झाली. १८९७ साली शाहू महाराजांना पुत्ररत्न झालं. ५० वर्षामध्ये रक्ताचा वारस या गादीला मिळालेला नव्हता. तो प्रथम युवराज राजाराम महाराजांच्या रूपानं १८९७ साली मिळाला. अनेक महोत्सव झाले. वारस मिळाला. त्याप्रित्यर्थ शाहू महाराजांनी एक मोठं मैदान भरवलं आणि हिंदुस्थानातले, विशेषत: पंजाबमधले अनेक मल्ल, वस्ताद त्यांनी कोल्हापूरला

बोलावले. १८९७चे हे मैदान हे इतिहासातलं नोंद घेण्यासारखं आहे. अशा अर्थानं, की या मैदानामध्ये कोल्हापुरातल्या जवळजवळ सर्व पैलवानांना चितपट व्हावं लागलं. म्हणजे विजय मिळालाच नाही. महाराज खिन्न झाले. पंजाबकडच्या, त्यावेळचा पंजाब म्हणजे पश्चिम पंजाब, तो पाकिस्तानमध्ये गेला. हरियाना, आत्ताचा आपला पंजाब एवढा मोठा प्रदेश होता आणि कुस्तीमध्ये पंजाब पहिल्या क्रमांकावर होता. तेव्हा पंजाबच्या मल्लांनी कोल्हापुरच्या मल्लांना चीत केलं.


राजाराम महाराज

चारीमुंड्या चीत केलं.


महाराज असल्या गोष्टी न विसरणारे होते. महाराजांनी प्रतिज्ञा केली, की माझ्या मल्लांना त्यांची जी विद्या आहे, ती मी शिकवणार आणि एक दिवस असा येईल, की माझे मराठी मल्ल पंजाबी मल्लांना आस्मान दाखविल्यशिवाय राहणार नाही. महाराज केवळ प्रतिज्ञा करून थांबले नाहीत. महाराज म्हणाले, की तुमच्यापैकी काही मंडळीं थांबा इथं. मल्लांना म्हणाले. काही वस्तादांना थांबवलं आणि आपल्या मल्लांना सांगितलं, आणि आपल्या वस्तांदानाही सांगितलं, आपलेही वस्ताद होते ना, त्यांच्याकडं मल्लविद्येची काही खासियत आहे ती शिकून घ्या. आणि त्याप्रमाणं दोन-तीन वर्षामध्ये कोल्हापुरचे मराठी मल्ल, ही एक पिढी निर्माण झाली आणि या पिढीनं तीन ते चार वर्षांमध्ये नंतर भरलेल्या मैदानामध्ये पंजाबी मल्लांना चितपट करण्यास सुरूवात केली. महाराजांनी इतकं लक्ष घातलं, की प्रत्येक वॉर्डमध्ये त्यांनी तालमीची स्थापना केली. वस्तादांची नेमणूक केली. त्यांना तनखे सुरू केले. वस्तादांनी खायचं काय? तालमीतल्या मल्लांना खुराकाची सोय केली. नुसतं व्यायाम करा म्हटले नाहीत ते. त्यांना खुराक दिला. बदामाची पोतीच्या पोती कोल्हापुरामध्ये येऊ लागली. खारकेची पोतीच्या पोती येऊ लागली.



त्यावेळी महाराज मल्लावर तीस हजार रूपये खर्च करत होते. आज तीस हजार काय वाटणार नाही. कारण स्वस्ताई सांगतो तुम्हाला, एका रूपयाला दहा ते बारा शेर दूध येत होतं. तेव्हा असे तीस हजार रूपये राज्याच्या तिजोरीमधून नव्हे; खासगी डिपार्टमेंटमधून. म्हणजे दोन खर्च असत. राज्यकारभाराचा खर्च वेगळा आणि दुसरा राजा तसेच त्याच्या परिवाराचा खर्च. हा पैसा राजा कसाही खर्च करू शकतो. शाहू महाराज त्या पैशातून तीस हजार रूपये खर्च करत होते. तेवढंच नव्हे; तर दर आठवड्याला दोन मैदानं भरवू लागले. जुना राजवाडा, आत्ता जी तिथे जागा आहे, त्याठिकाणी मैदान, सगळ्या बाजूंनी लोक असे बसायचे, चौफाळा, जिथं आत्ता शाहू महाजांचा पुतळा आहे, ज्याला दसरा चौक आपण

म्हणतो, तिथं मैदान भरायचं. आणि तिसरं मैदान भरायचं ते न्यू पॅलेसच्या पाठीमागं. त्याला लाल आखाडा म्हणत असत. तिथे एक मोठी तालीम होती आणि तालमीच्या बाहेर, न्यू पॅलेसच्या पाठीमागं हे मैदान भरत असे. म्हणजे आठवड्याला दोन-दोन, तीन-तीन मैदानं. यात्रेच्या वेळेला तर मैदानं असतच, असे ते भरवत होते.

१९०२ साली शाहू महाराज इंग्लंडला गेले. आणि मग केवळ इंग्लंड न पाहता, यूरोपातले काही महत्त्वाचे देश पाहावेत म्हणून फ्रान्सला गेले, इटलीला गेले, अन्य काही देशांमध्ये गेले. इटलीमध्ये रोम शहरात असणारा आखाडा त्यांनी पाहिला आणि त्यांना असं वाटलं, की माझ्या संस्थानामध्ये सुद्धा



इटलीतील आखाडा



मल्लांच्यासाठी महाराष्ट्रामध्ये असा आखाडा आपण तयार करायला पाहिजे. केवढंसं चिमुकलं राज्य आहे महाराजांचं आणि रोमन आखाड्यासारखा आखाडा बांधण्याचं स्वप्न ते पाहतात. मोठ्या माणसांची स्वप्नं मोठी असतात. राधानगरी धरणाच्यासंदर्भात मी आपल्याला सांगितलंय, हिंदुस्थानामधलं सगळ्यात मोठं धरण असलं पाहिजे. हिंदुस्तानामधला सगळ्या मोठा आखाडा बांधला पाहिजे. हिंदुस्थानातलं सगळ्या मोठं नाट्यगृह आपल्या संस्थानात झालं पाहिजे. अशावेळेला नकळत असं वाटून जातं, की त्या काळात हिंदुस्थानमध्ये एकच राजा असता, दिल्लीपती म्हणून शाहू महाराज तिथे बसले असते, तर या भारताचं सोनं करून टाकलं असतं त्यांनी. जे सुवर्णयुग शाहू महाराजांच्या कारकिर्दीमध्ये निर्माण झालं, ते सुवर्णयुग शाहू महाराजांनी भारतामध्ये भारताचे अधिपती असताना निर्माण केलं असतं असं एक इतिहासाचा अभ्यासक म्हणून क्षणभर मला वाटून जातं.

शाहू महाराजांचं राज्य किती होतं, त्यावरून ते महान ठरत नाहीत हे लक्षात ठेवा. शाहू महाराजांच्या कल्पना किती भव्य होत्या. नुसत्या भव्य नाहीत. त्यांनी त्या अंमलात आणल्या. त्यामुळे ते महान राज्यकर्ते ठरतात, असं माझं स्वत:चं मत आहे. जे मैदान निर्माण केलं त्याला खासबाग मैदान म्हणतात. पुढं शाहू महाराजांचं नाव त्या मैदानाला दिलं



गेलं. १९०७पासून मैदानाची सुरूवात झाली. १९१२ साली ते मैदान तयार झालं. भारतातला सगळ्यात मोठा आखाडा असं त्या काळात त्याचं वर्णन केलं गेलं. अशा या आखाड्याची सुरूवात इमात बक्ष आणि गुलाम मोहमद्दीन या त्याकाळी गाजलेल्या दोन मल्लांच्या कुस्तीनं झालं. आणि मग एक प्रकारचं मोहळच तयार झालं पैलवानांचं. मघाशी मी तुम्हाला सांगितलं, की पंजाबी मल्लविद्या ही सगळ्यात मोठी होती. प्रगत होती. त्या मल्लविद्येचं अनुकरण शाहू महाराजांच्या पैलवानांनी केलं. शाहू महाराजांच्या सांगण्यावरून. आणि एक प्रकारचं मोहळ कोल्हापूर संस्थानामध्ये निर्माण झालं. एक नवीन पिढी दमदार अशा मल्लांची पिढी निर्माण झाली. काही नावं वाचून दाखवतो. कृष्णा मर्दानी, शिवाप्पा बेरड, व्यंकप्पा बुरूड. सर्व जाती-धर्मातले मल्ल आहेत. गोपाळ परीट, ज्ञानू माने, नारायण कसबेकर, गोविंद कसबेकर, बापू बिरे, देवाप्पा धनगर या पैलवानांनी पुढं कोणाकोणाला आस्मान दाखवलंय पाहा, हमदू काका, भोला पंजाबी, आक्रम, नवरंगसिंग, धर्मसिंग वत्सा अशा उत्तरेकडील, पंजाबमधील मल्लांना आस्मान दाखवलं. एक पिढी, एक फौजच जवळजवळ निर्माण केली शाहू महाराजांनी मल्लांची.

आता इथं सुद्धा शाहू महाराजांचा प्रगत, प्रागतिक, सामाजिक दृष्टीकोन बाजूला नाही झालेला. जातीभेदाला कसा थारा देता कामा नये, जातीभेद हा गाडला पाहिजे यासाठी शाहू महाराजांनी जीवाचं रान केलं. संपूर्ण हयात खर्च केली. इथं सुद्धा शाहू महाराजांनी जातीभेदाला थारा दिला नाही. धर्मभेदाला थारा दिला नाही. सर्व जातीचे, सर्व धर्माचे मल्ल त्यांनी निर्माण केले. शाहू महाराज प्रगत होते, म्हणून त्यांचे सगळे मल्ल काय प्रगत नव्हते वैचारिकदृष्ट्या किंवा उत्तर हिंदुस्थानातले जे मल्ल होते, ते अस्पृश्यता पाळणारे होते. आम्ही पण पाळत होतो, तेच पाळत होते अशातला भाग नाही. आम्ही पाळू नये म्हणून शाहू महाराजांनी प्रयत्न केले. पण पंजाबमध्ये त्यांना प्रयत्न करता येत नव्हता. तर पंजाबमधले जे लोक यायचे, ते अस्पृश्य समाजातल्या मल्लाशी लढायला तयार नसत. शाहू महाराजांनी युक्ती केली. त्यांनी महार समाजातल्या मल्लांना जाट हे नाव दिलं. चर्मकार समाजातल्या मल्लांना सरदार नाव दिलं. भंगी समाजातल्या मल्लांना पंडित नाव दिलं. जेव्हा मैदान भरवले जात असे, आणि कुस्त्या पुकारल्या जात असत, त्यावेळी तो पुकारणारा म्हणत असे, की अमुक अमुक जाट पैलवान, पंडित पैलवान, सरदार पैलवान आणि इथंसुद्धा शाहू महाराजांनी पाळलंय, की जातीभेदाला थारा मिळणार नाही.

शाहू महाराजांचं विलक्षण प्रेम मल्लविद्येवर होतं आणि मल्लांवरसुद्धा होतं. देवाप्पा धनगर हा धनगर समाजातला मुलगा. शाहू महाराजांचा रथ एकदा ग्रामीण भागातून जात होता. तेव्हा हे पोरगं त्या रथाच्या पाठीमागून पळत होतं. महाराज बघत होते, की पोरगं पाठीमागून पळतंय. महाराजांनी त्या कोचमनला सांगितलं, की घोडा पळव. त्यानं घोडी पळवायला सुरूवात केली. ते पोरगं त्या घोड्याच्या वेगानं पळायला लागलं. शेवटी राजवाड्यामध्ये रथ थांबल्याबरोबर ते पोरगं थांबलं. महाराजांना मोठं कौतुक वाटलं. म्हणाले, कोण रे तु. म्हणाला, देवाप्पा. कुणाचा, तर धनगराचा. म्हणाले, की तु गावाकडे जायचं नाहीस. तु माझ्याकडं राहा. तुला पैलवान करतो. त्याचा दम बघितला. देवाप्पा मोठा पैलवान झाला. रूस्तुम-ए-हिंद ही पदवी त्याने मिळवावी अशी महाराजांची अपेक्षा होती. महत्त्वाकांक्षा होती. दुर्दैवानं कॉलऱ्याच्या साथीमध्ये तो अडकला. शेवटच्या घटका मोजू लागला. महाराज त्याला बघायला आले. शेजारी उभ्या असलेल्या डॉक्टरला म्हणाले, डॉक्टर याच्या भाराएवढं सोनं मी तुम्हाला देतो. पण माझ्या देवाप्पाला वाचवा. दुर्दैवानं देवाप्पा वाचू शकला नाही. देवाप्पा, शाहू महाराज आणि शाहू महाराजांचे उद्गार मात्र अमर राहिलेले आहेत. अशी ही मल्लविद्या आहे.

या मल्लविद्येमध्ये आणखी एक किस्सा सांगण्यासारखा आहे. शाहू महाराजांच्या काळामध्ये सगळ्या हिंदुस्थानातले मल्ल येऊ लागले. जथ्थेच्या जथ्थे येऊ लागले आणि जणू काही ही मल्लविद्येची पंढरी असं वर्णन त्या काळात केलेलं आहे आणि इतिहासकारांनी सुद्धा केलेलं आहे. पंढरीचा महिमा जसा होता, आहे, त्याप्रमाणं कोल्हापुरचा महिमा मल्लविद्येमध्ये आहे. शाहू महाराजांची प्रतिमा ज्या अनेक कारणांनी राष्ट्रीय स्तरावर गेली त्यात मल्लविद्या आहे. संगीतविद्या आहे. चित्रकला आहे. कृषी आहे. अनेक गोष्टी आहेत. पण मल्लविद्येच्या संदर्भामध्ये १९११ला दिल्ली दरबार भरवला गेला, पंचम जॉर्ज बादशाह हा हिंदुस्थानचा बादशाह झालेला आहे आणि त्याची राणी मेरी ही हिंदुस्थानची सम्राज्ञी झालेली आहे, हे लॉर्ड हार्डिंग्जनं, हा व्हाईसरॉय होता, त्यानं जाहीर केलं, हिंदुस्थानला नवी राजधानी मिळावी म्हणून, दिल्ली ही राजधानी म्हणून जाहीर झाली. त्या काळामध्ये जो दिल्ली दरबार भरवला, त्यावेळेला कुस्त्यांचं एक जंगी मैदान भरवण्यात आलं. सर्व देशामधले मोठ मोठे मल्ल आले. महाराजही बसलेले होते. अनेक संस्थानिक बसलेले होते. अनेक गव्हर्नर्स बसलेले आहेत. अशा या मोठ्या मेळाव्यामध्ये महाराज आलेले आहेत आणि ते एका आसनावर बसलेले आहेत हे मल्लांनी पाहिल्याबरोबर सगळे मल्ल उठून उभे राहिले आणि रांग लाऊन शाहू महाराजांना मुजरा करण्यासाठी म्हणून ते जाऊ लागले.

दृश्य बघा. आपल्या डोळ्यासमोर आणा. इकडं व्हाईसरॉय बसलेले आहेत. सगळे गव्हर्नर्स बसलेले आहेत. राजे-रजवाडे बसलेले आहेत. पण, मल्लांनी सलामी दिली, मल्लांनी मुजरा ठोकला तो शाहू महाराजांना. चंदन नावाचा एक पैलवान. मोठा पैलवान. त्यानं आसनासह शाहू महाराजांना उचललं आणि कुस्त्यांचा जो एरेना असतो, त्याच्या प्रवेशद्वारापाशी शाहू महाराजांना सोडलं. केवढा मोठा सन्मान शाहू महाराजांना या मल्लांनी दिला. लोकराजा आपण म्हणतो ना, त्याचा अर्थ हा आहे. मल्लांनी व्हाईसरॉयला मुजरा केलेला नाही. या साध्या प्रसंगाकडं मी वेगळ्या पद्धतीनं बघतो. आणि मग जेव्हा पहिल्या नंबरची कुस्ती रहीम बक्ष विरूद्ध गामा, गामा त्यावेळचा मोठा पैलवान, ते गैरहजर राहिले. सगळीकडं गडबड उडाली. आता काय करायचं. संयोजकांच्या तोंडचं पाणी पळालं. महाराज म्हणाले, की काही गडबड करू नका. अस्वस्थ राहू नका. मी पहिल्या नंबरची कुस्ती लावतो. महाराजांनी इमाम बक्ष आणि हसन बक्ष हे तेवढ्याच प्रतिभेचे जे पैलवान होते, ताकदीचे पैलवान होते, त्यांना उठवलं आणि एक नंबरची कुस्ती खेळण्यास सांगितलं. आणि मग इमाम बक्ष आणि हसन बक्ष यांची कुस्ती झाली. त्यात इमाम बक्ष विजयी झाले. महाराजांनी जातानाच जरीपटके घेऊन गेले होते. त्यांनी इमाम बक्षच्या डोईवर तो ठेवला. आणि जो हरला होता हसन बक्ष, त्याचाही सत्कार केला. दोघांचा सत्कार केला. किती साधी गोष्ट आहे. राष्ट्रीय पातळीवर महाराज गेले, मल्लविद्येचा चाहता, भोक्ता, स्वत: मल्ल असणारा आणि मल्लांवर प्रेम करणारा अशी एक आगळीवेगळी प्रतिमा राष्ट्रीय स्तरावर शाहू महाराजांची निर्माण झाली.


पंचम जॉर्ज
व राणी मेरी

शाहू महाराज इथेच थांबले नाहीत. मल्ल हे काही कायम तरूण राहात नाहीत. वृद्धापकाळाकडे झुकतात आणि कुस्ती सुटते. मग त्यांचे हाल सुरू होतात. शाहू महाराजांनी हे सगळं थांबवलेलं आहे. आज जे महाराष्ट्र सरकार करतंय, आज जे महाराष्ट्र सरकार पेन्शन देतंय, मानधन देतंय, खरं म्हणजे त्यात वाढ व्हायला पाहिजे, आत्ताच मी बोललो हिंदकेसरी दिनानाथ सिंहांशी, काय काय वेळेला काही महिन्यांचं मानधन राहतंय, शाहू महाराजांनी शंभर वर्षापूर्वी आम्हाला सांगितलेलं आहे, की

मल्लांची व्यवस्था झाली पाहिजे. उर्वरित आयुष्य हे सुखात गेलं पाहिजे. म्हणून शाहू महाराजांनी या सगळ्या मल्लांना जमिनी दिल्या. घरं दिली. पेन्शन सुरू केली. त्याकरता आजारामध्ये उपयोगी ठरावं म्हणून, वृद्धापकाळामध्ये उपयोगी पडावं म्हणून फंडस् त्यांनी निर्माण केले. त्यांनी केवळ मल्लांचा खुराक बघितला असं नव्हे, तर त्याची कारकिर्द संपल्यानंतरसुद्धा त्याचं आयुष्य सुखामध्ये जावं हे शाहू महाराजांनी पाहिलं. याला म्हणतात, लोककल्याणकारी राजा. याला म्हणत्यात लोककल्याणी सुप्रशासन.

शेवटी जाता जाता एक सांगितलं पाहिजे, की शाहू महाराजांची कुस्तीची परंपरा ही कोल्हापुरकरांनी जपली. जवळजवळ दोन ते तीन पिढ्या जपलेली आहे. हिंद केसरी हे पद सुरू झाल्यानंतर, प्रथा सुरू झाल्यांनतर कोल्हापूरला हिंदकेसरी कोल्हापूर प्रसिद्ध होतं, तसं आजही आहे. विदर्भ, मराठवाडा, खान्देश, पश्चिम महाराष्ट्र, कोकण, अजूनही जथ्थेच्या जथ्थे तरूण पोरांचे येत असतात. मग ते मोतीबाग तालीम असेल, शाहूपुरी तालीम असेल, गंगावेस तालीम असेल, शेकडो तरूण पोरं आज याठिकाणी मल्लविद्येचं शिक्षण घेतात.

आणखी एक आनंदाची गोष्ट सांगायला हवी आणि ती म्हणजे, रेश्मा माने नावाची एक कोल्हापूरची मुलगी ही महाराष्ट्राची पहिली स्त्री मल्ल ठरलेली आहे. अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पदकं तिनं मिळवलेली आहेत. म्हणजे कोल्हापूरचंच नव्हे, तर महाराष्ट्राचं आणि महाराष्ट्राचंच नव्हे, तर भारताचं नाव आंतरराष्ट्रीय पातळीवर नेणारी ही मुलगी आहे. म्हणजे शाहू महाराजांच्या देवाप्पा धनगरपासून रेश्मा मानेपर्यंत ही जी परंपरा आहे, की ज्या परंपरेनं भारताची संस्कृती ही श्रीमंत



किती आले ? काल-परवा दिवंगत झालेले श्रीपतराव खंचनाळे हे पहिले हिंदकेसरी, १९५९ला. १९६०ला गणपतराव आंदळकर, ६४ला मारूती माने, ६७ला हजरत पटेल, ७१ला दिनानाथसिंह आणि २००१ला विनोद चौगुले. सहा हिंदकेसरी कोल्हापूरच्या रेकॉर्डवर आहेत आणि डझनापेक्षा अधिक महाराष्ट्र केसरी, महाराष्ट्राच्या मर्यादेमध्ये हा जो मान दिला जातो, गदा दिली जाते, तो डझनाहून अधिक कुस्तीगीरांना मिळालेला आहे तो मान. हिंदकेसरी, महाराष्ट्र केसरी, भारत केसरी, म्हणजे मल्लविद्येच्या क्षेत्रामध्ये जी जी पदकं असतील, गदा असतील, बिरूदावल्या असतील, त्या सर्व कोल्हापुरच्या मल्लांनी जिंकलेल्या आहेत. संपादन केलेल्या आहेत आणि म्हणून मल्लविद्येची पंढरी जसं शाहू महाराजांच्या काळामध्ये केलेली आहे. समृद्ध केलेली आहे. ज्यावेळेला महाराष्ट्राचा मल्ल, कोल्हापूरचा मल्ल हा आंतरराष्ट्रीय पातळीवर लढतो, त्यावेळेला कोल्हापूरचा म्हणून लढत नाही, तो भारताच म्हणून लढतो. जेव्हा त्याचा पहिला क्रमांक येतो, त्यावेळेला त्याच्या हातामध्ये जो तिरंगा असतो, तो केवळ महाराष्ट्राचा नसतो, हा भारताचा तिरंगा असतो. म्हणून शाहू महाराजांना मी राष्ट्रपुरूष का म्हणतो. परत परत मी आपणाला सांगतोय, की हे जे राष्ट्रपुरूष असतात, ते राष्ट्र घडवत असतात विविध क्षेत्रातून. महान राज्यकर्ते का म्हणायचं त्यांना, तर यासाठी म्हणायचं. आजसुद्धा त्यांचा वारसा कोल्हापुरातील लोक, महाराष्ट्रातले लोक आणि पर्यायानं हिंदुस्तानातले लोक पुढे चालवत आहेत.

■■■




## सर्व नजरा लागल्या उत्तर प्रदेशाकडे

पाच राज्यांमध्ये विधानसभा निवडणुका होत असल्या तरी सर्वांचे डोळे लागले आहेत ते उत्तर प्रदेशाकडे!

अर्थात त्याला कारणेही तशीच आहेत. सर्वाधिक लोकसंख्या आणि मतदार, देशातले सर्वात मोठे राज्य, लोकसभेच्या सर्वाधिक जागा(८०)! एखाद्या युरोपातील लहान देशाएवढी किंवा दोन-चार देश मिळून होणारी लोकसंख्या एकट्या उत्तर प्रदेश राज्याची आहे. राष्ट्रीय राजकारणात तर या राज्याचे महत्व अनन्यसाधारण आहे. 'तळं राखील तो पाणी चाखील' अशी मराठीत म्हण आहे ना , त्याच चालीवर 'उत्तर प्रदेश जो राखेल त्याची सत्ता दिल्लीत' असे म्हटले जाते. त्यामुळेच ब्रह्मांडनायकांनी देखील गुजरातऐवजी उत्तर प्रदेशातील वाराणसी येथून लोकसभेची निवडणूक लढविण्यास पसंती दिली.

या कारणांमुळेच तेथील निवडणुकीच्या निकालांकडे सर्वांचे लक्ष असणे स्वाभाविकच आहे.

या राज्याचा निकाल १० मार्चला अधिकृतपणे जाहीर होईल. पण त्यापूर्वी सुरु असलेली अचकळबाजी देखील मनोरंजक आहे.

भाजपला या निवडणुकीत पूर्वीसारखे यश मिळणार नाही असा सर्वसाधारण अंदाज सार्वत्रिकपणे व्यक्त केला जात आहे. पण भाजपच्या जागा किती कमी होणार हे कुणी निश्चितपणे सांगू शकत नाही.

भाजपचे संख्याबळ घटले तरी सरकार भाजपच स्थापन करणार हा आणखी एक सर्वसाधारण अंदाज!


काहींच्या मते भाजपला बहुमतासाठी थोड्याफार जागा कमी पडतील व त्या परिस्थितीत ते बहुजन समाज पक्षाबरोबर समझोता करु शकतील किंवा चक्क इतर पक्षांच्या आमदारांची फोडाफोड करतील आणि आमदारांचा घोडेबाजार होईल.

अशी चर्चा आहे की बहुमतापेक्षा कमी जागा मिळाल्यास बहुजन समाज पक्षाला बरोबर घेण्याच्या दृष्टीने भाजपने म्हणे जेथे त्यांच्या जागा हरण्याची स्थिती आहे तेथील मते बहुजन समाज पक्षाकडे वळविण्यास आपल्या कार्यकर्त्यांना सूचना दिल्या आहेत.

काही जाणकारांच्या मते भाजप व रा.स्व.संघाच्या अंतर्गत अंदाजानुसार आणि त्यांनी केलेल्या विविध पाहणी

अहवालांच्या आधारे भाजपला १८० पर्यंत जागा मिळतील. काठावरच्या बहुमतापेक्षा त्यांना बावीस जागा कमी मिळतील. परंतु ती अगदीच






नाजुक स्थिती असेल.

त्या परिस्थितीत बहुजन समाज पक्ष किंवा इतर लहानसहान पक्षांना फोडाफोडी करुन बहुमत प्राप्त करण्याची रणनीती आखण्यात आली आहे असे सांगण्यात येते.

भाजप वर्तुळातील आणखीही एक मनोरंजक चर्चा आहे. या चर्चेनुसार योगी आदित्यनाथ यांनी गेल्या पाच वर्षात कट्टर व आक्रमक हिंदुत्ववादी नेता म्हणून जी प्रसिध्दी प्राप्त केलेली आहे त्यामुळे भाजपच्या नेतृत्वात अस्वस्थता आहे. या देशात हिंदुत्वाचे एकमेव प्रतीक म्हणजे विश्वप्रिय ब्रह्मांडनायकच! त्यांच्याशी कुणी स्पर्धा केलेली कसे खपवून घेतले जाईल? त्यामुळे ब्रह्मांडनायकांनाही उत्तर प्रदेशात योगी महाराजांना पूर्ण बहुमत मिळावे अशी फारशी इच्छा नसल्याचे सांगितले जाते. दुसरीकडे योगी आदित्यनाथ यांचा निर्विवाद विजय म्हणजे ब्रह्मांडनायकांचे ते आपोआपच वारसदार-उत्तराधिकारी होऊ शकतात. मग सध्या ज्यांना 'नंबर २' किंवा वारसदार मानले जाते त्या केंद्रीय गृहमंत्र्यांचे काय होणार? त्यामुळे त्यांनाही योगी महाराजांना मोठे यश मिळावे अशी इच्छा नाही.

या दोन्ही नेत्यांना म्हणजे क्रमांक १ व क्रमांक २ यांना योगींना मोठे होऊ द्यायचे नसल्याने त्यांचे प्रयत्न असेच राहतील की उत्तर प्रदेशात भाजपला बहुमत मिळू नये परंतु या दोन नेत्यांमुळे तेथे सरकार स्थापन व्हावे आणि त्या परिस्थितीत तडजोड म्हणून योगी महाराजांना तेथून दूर करायचे!


थोडक्यात सध्या योगी महाराज हे क्रमांक १ व क्रमांक २ यांच्याच 'हिटलिस्ट'वर आहेत असे सांगण्यात येते. चला पाहू यात वाट! कोण बाजी मारते ते? पण चर्चांचा बाजार गरम आहे हे निश्चित!

## भावी राष्ट्रपति कोण? अटकळबाजी तेजीत!

वर्तमान राष्ट्रपति रामनाथ कोविंद यांची मुदत येत्या काही महिन्यात संपत आहे. देशाचे नवे राष्ट्रपति कोण असतील हा प्रश्न आता सर्वत्र फेर धरु लागला आहे.

निरनिराळ्या नावांची चर्चाही सुरु झालेली आहे. परंतु उत्तर प्रदेशासह पाच







राज्यांमधील विधानसभा निवडणुकांचा निकाल १० मार्चला लागल्यानंतरच खऱ्या अर्थाने राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीला सामोरे जाण्यासाठी देश तयारीला लागेल.

असे असले तरी सत्तापक्षाचा उमेदवार कोण असेल? सध्याच्याच राष्ट्रपतींना मुदतवाढ किंवा सलग दुसऱ्यांदा राष्ट्रपतिपदाची संधी मिळेल काय? की सध्या उपराष्ट्रपति असणाऱ्या वेंकय्या नायडू यांना बढती देऊन राष्ट्रपति केले जाईल?

अशा अनेक प्रश्नांवर सध्या चर्चा सुरु आहे. यामध्येच निरनिराळ्या शक्यतांवरही चर्चा सुरु आहे. त्यातली प्रमुख म्हणजे उत्तर प्रदेशात भाजपला अपेक्षित संख्याबळ प्राप्त न झाल्यास काय? कारण राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीत सर्वाधिक किंमतवान किंवा वजनदार मते ही उत्तर प्रदेशातली असतात. तेथे भाजपला पीछेहाटीचा सामना करावा लागल्यास राष्ट्रपतिपदाच्या निवडणुकीचे गणित बिघडू शकेत काय ही ती प्रमुख शंका किंवा प्रश्न आहे.

अर्थात निकाल प्रत्यक्षात हाती येईपर्यंत त्यावर फुकट चर्चा करणे निरर्थक आहे. त्याऐवजी राष्ट्रपतिपदासाठी सत्तापक्षाचा म्हणजेच भाजपचा उमेदवार कोण असेल या प्रश्नाची चर्चा रंजक ठरेल.

ताज्या चर्चेच्या गुऱ्हाळात अचानकपणे बिहारचे मुख्यमंत्री व संयुक्त जनता दलाचे प्रमुख नीतीशकुमार यांचे नाव पुढे आले आहे.

हे नाव पुढे येण्यामागे भाजपच्या उत्तर प्रदेशातील संभाव्य पीछेहाटीचे कारण आहे हे उघड आहे.

उत्तर प्रदेशात पीछेहाट झाल्यास भाजपला आपला स्वतःचा उमेदवार पुढे रेटणे अवघड जाऊ शकते व त्या परिस्थितीत विरोधी पक्षांबरोबर तडजोडीची पाळी येऊ शकते. मग विरोधी पक्षांनाही मान्य होईल असा उमेदवार देणे भाजपला भाग पडू शकते. त्यावेळी विरोधी पक्ष ज्याची प्रतिमा सांप्रदायिक नाही व ज्याची धर्मनिरपेक्षतेला बांधिलकी आहे व उदारमतवादी विचारसरणी असलेल्या नेत्यास पसंती देऊ शकतील. या कसोट्यांवर उतरणारे नेते म्हणून नीतीशकुमार यांच्या नावाची चर्चा काहींनी सुरु केली.

विरोधी पक्षांनीही या प्रस्तावाचे किंवा कल्पनेचे स्वागतच केले.

परंतु नीतीशकुमार यांनी मात्र ही कल्पना एका झटक्यात फेटाळून लावली. आपण राजकारण निवृत्तीचा विचार अद्याप केलेला नाही तसेच बिहारबाहेरच्या राजकारणात त्यांना रस नसल्याचे सांगून त्यांनी याबाबतच्या चर्चेला विराम दिला.

नीतीशकुमार यांच्या नावाच्या चर्चेबरोबरच बिहारच्या मुख्यमंत्रीपदात रस असलेल्यांच्या आशेला पालवी फुटू लागली. पण नीतीशकुमार यांनी ही चर्चाच रद्दबातल ठरवून त्यांच्या आशांवर पाणी फिरवले.

एक कुतुहल म्हणून राष्ट्रपतिपदाचा भावी उमेदवार कोण असू शकतो याबद्दल अंदाज लावण्याचे झाल्यास अनेक नावे पुढे येतात.

वर म्हटल्याप्रमाणे त्या मालिकेत पहिले नाव वेंकय्या नायडू यांचे येते.

परंतु एकंदरीत जी चिन्हे किंवा





राजकीय वर्तुळातील चर्चा ऐकू येते त्यानुसार त्यांना बढती मिळण्याची शक्यता कमी आहे असे समजते.

मग उमेदवार कोण असू शकेल ?

विश्वप्रिय ब्रह्मांडनायकांची मनोवृत्ती आणि कार्यपध्दती किंवा कामाची शैली लक्षात घेता त्यांना धक्का देणारे निर्णय करण्यात मजा वाटते.

रामनाथ कोविंद यांना २०१७ मध्ये राष्ट्रपतिपदासाठी उमेदवारी जाहीर करताना त्यांनी याच धक्कातंत्राचा वापर केला होता.

कोविंद हे इतके अज्ञात होते की पत्रकारांना त्यांच्याबद्दलची माहिती गोळा करताना घाम फुटून दमछाक झाली होती. काही वृत्तवाहिन्यांनी तर कोविंद यांच्याबद्दल मर्यादित माहिती असल्याची चक्क कबुली दिली आणि त्यांच्या बद्दलची माहिती गोळा झाल्यानंतर ती सादर करु असे सांगितले होते. ब्रह्मांडनायकांची ही कार्यशैली पाहता आगामी राष्ट्रपति निवडणुकीसाठीही ते असाच एखादा अज्ञात, चेहरा नसलेला, स्वतःची प्रतिमा नसलेला आणि देशाच्या पंतप्रधानांच्या वलयांकित प्रभावात स्वतःचे व्यक्तिमत्व हरवलेला उमेदवारच शोधतील असे मानले जाते. जी व्यक्ती स्वतंत्र विचाराची नाही, जी व्यक्ती कायम कोषातच राहील अशाच व्यक्तीची वर्णी या पदावर लागू शकते अशी सर्वसाधारण, सार्वत्रिक समजूत आहे. त्यामुळे असा उमेदवार कोण असू शकेल याचाही शोध काही मंडळी घेऊ लागली आहेत.

सर्वसाधारणपणे एकदा उत्तर भारतातील व्यक्ती राष्ट्रपति झाल्यानंतर त्यानंतर दक्षिणेतील किंवा देशाच्या अन्य भागातील व्यक्तीचा या सर्वोच्च पदासाठी विचार करण्याची एक परंपरा चालत आली आहे. अर्थात या परंपरा धुडकावून लावण्याचा प्रकार वर्तमान राज्यकर्त्यांनी अमलात आणलेला असल्याने ते ही बाबही धाब्यावर बसवू शकतात. दक्षिणेतील उमेदवारांमध्ये पुद्दुचेरीच्या नायब राज्यपाल डॉ. तमिलीसाई सुंदरराजन यांच्या नावाची चर्चा आहे. त्या महिला आहेत आणि तमीळ आहेत. भाजपला तमीळनाडूत शिरकाव करायचा आहे. त्यासाठी त्यांनी अण्णा द्रमुकबरोबर हातमिळवणी केली पण तो पक्षच पिछाडीवर गेल्याने भाजपची स्वप्ने विरुन गेली.

काहीतरी प्रतीकात्मक करण्याच्या हौसेने भाजप नेतृत्वाला नेहमीच पछाडलेले असते. त्यामुळेच या महिला नेत्याचा राष्ट्रपतिपदासाठी विचार केला जाऊ शकतो अशीही चर्चा आहे.

अर्थात ब्रह्मांडनायकांच्या धक्कातंत्र शैलीनुसार ते कोणताही निर्णय करु शकतात. त्याचीच प्रतीक्षा करु यात!

## राहूल गांधी यांच्या(अध्यक्ष) 'पदा'भिषेकाची तयारी?

राहूल गांधी यांनी २०१९च्या लोकसभा निवडणुकीनंतर अध्यक्षपद सोडले. त्यानंतर त्यांनी 'पुच्छासन सारथ्य' करण्याचा प्रकार सुरु केला.

'पुच्छासन' म्हणजे मोटारीतील मागचे आसन. 'सारथ्य' म्हणजे गाडी हाकणे. थोडक्यात त्याचा अर्थ असा की थेट मोटार चालकाच्या आसनावर बसून गाडी हाकण्याऐवजी त्यांनी मागच्या आसनावर बसून, प्रत्यक्ष जबाबदारी न घेता अप्रत्यक्षपणे पक्षाचे सारथ्य केले.

आता पक्षाध्यक्षपद सोडण्याला तीन वर्षांचा कालावधी लोटला आहे.

आणखी दोन वर्षांनी पुनःश्च लोकसभा निवडणुका येतील.

दरम्यानच्या काळात यमुना नदीतून भरपूर पाणी वाहून गेले आहे.

आता राहूल गांधी यांना पुन्हा एकदा पक्षाध्यक्षपद स्वीकारण्याचा राष्ट्रव्यापी आग्रह चालूच आहे.

................आणि बहुधा त्यांनीही मनाची तयारी केली असावी. कारण अलीकडच्या काळात 'अचानक वैराग्या'ची लक्षणे त्यांनी दाखविलेली नाहीत. त्यामुळेच आता आगामी पक्षांतर्गत



संघटनात्मक निवडणुकीच्या प्रक्रियेत ते पक्षाध्यक्षपद स्वीकारतील अशी खात्री कार्यकर्त्यांना वाटू लागली आहे. खुद्द राहूलही आता या परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी मानसिकदृष्ट्या तयार असल्याचे दिसून येत आहे.

पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुका किंवा संसदेच्या अर्थसंकल्पी अधिवेशनातही त्यांनी केलेले भाषण यामुळे राहूल गांधी आता स्थिरस्थावर होऊ लागल्याचे दिसून येत आहे.

राहूल गांधी हे पक्षाध्यक्ष होण्याची चिन्हे स्पष्ट दिसू लागल्यानेच कदाचित ब्रह्मांडनायकांनी राजकारणातल्या घराणेशाहीच्या विरोधात विशेष टीकास्त्र सोडण्यास सुरुवात केली आहे. उत्तर प्रदेशासह पाच राज्यातील विधानसभा निवडणुकीतील त्यांच्या प्रचारसभांमध्ये हा प्रचाराचा प्रमुख मुद्दा करुन त्यांनी त्यावर आपल्या जिव्हेने वार केलेले आढळतात.





सांगायचा मुद्दा हा की आता राहूल गांधी यांनी पक्षाध्यक्षपद स्वीकारण्याची मानसिक तयारी करण्याबरोबरच त्या अनुषंगाने प्रत्यक्ष काम करण्यासही सुरुवात केलेली आढळून येते.

या निवडणुकांच्या निमित्ताने त्यांनी संबंधित राज्यांच्या कार्यकर्त्यांबरोबर भेटीगाठी व चर्चेच्या अनेक फेऱ्या केल्याचे सांगण्यात येते.

या वर्षाच्या अखेरीला गुजरात व हिमाचल प्रदेशातही विधानसभा निवडणुका होणार आहेत.

राहूल गांधींनी गुजरातचा दौरा करण्याबरोबरच तेथील नेते व कार्यकर्त्यांबरोबर चर्चेच्या फेऱ्या केल्या आहेत. पंजाबमधील कॅप्टन अमरिंदरसिंग यांचे बंड, नवज्योतसिंग सिध्दू यांच्या महत्वाकांक्षेचा उधळलेला वारू, राजस्थानातील सचिन पायलट व मुख्यमंत्री अशोक गेहलोत यांच्यातील संघर्ष, छत्तीसगढमधील सिंगदेव यांची बंडखोरी या पेचप्रसंगांची हाताळणी आतापर्यंत तरी त्यांनी योग्य केल्याचे दिसून येते. कारण अद्याप मध्य प्रदेशातील सरकार घालवण्याची पुनरावृत्ती इतर राज्यांमध्ये झालेली नाही. झारखंडमधील आघाडी सरकारमध्ये काँग्रेस सामील आहे.

तेथील प्रभारी आरपीएन सिंग हे आता 'भाजपवासी' झाले असल्याने तेथे त्यांनी अविनाश पांडे यांना जबाबदारी दिली आणि स्वतः तेथील स्थानिक नेते व कार्यकर्ते यांच्याबरोबर चर्चा करुन परिस्थिती आटोक्यात राखली.

कर्नाटकात काँग्रेसला पुन्हा एकदा बरे दिवस येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. परंतु कर्नाटकातही प्रदेश अध्यक्ष शिवकुमार आणि विधिमंडळ नेते व माजी मुख्यमंत्री सिद्रामय्या यांच्यात संघर्ष चालूच आहे.

या पार्श्वभूमीवरच राहूल गांधी यांनी कर्नाटकातील सर्व प्रमुख नेते शिवकुमार, सिद्रामय्या, मल्लिकार्जुन खर्गे, वीरप्पा मोईली यांना एकत्रितपणे बोलावून घेतले व त्यांच्याबरोबर चर्चा करुन एकोपा निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे.

थोडक्यात सांगायचे झाल्यास राहूल गांधी आता त्यांची जबाबदारी गांभीर्याने घेऊ लागले असल्याची चिन्हे समोर दिसून येऊ लागली आहेत. त्यांनी खरोखरच हे गांभीर्य आणि त्याहीपेक्षा सातत्य टिकविले तर त्यांचे भवितव्य निश्चितच आशादायक आहे असे म्हणता येईल.

अन्यथा मध्येच त्यांना परदेशात जाण्याची लहर आली व ते गायब झाले तर मग काय?

....पुन्हा ये रे माझ्या मागल्या!

# कर्नाटकात भाजपची 'पतली हालत'

कर्नाटक विधानसभेच्या निवडणुकीला अजुन वर्षाचा तरी अवकाश आहे.

कर्नाटक भाजपमधील सुंदोपसुंदी अशा रीतीने सुरु आहे की या पक्षाला स्वेच्छामरणाची इच्छा झाली असावी अशी समजूत व्हावी.

मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांचे आसन अद्याप स्थिरस्थावर होऊ







शकलेले नाही. त्यांना त्यांच्याच पक्षाचे विविध नेते जुमानेनासे झाल्याचे चित्र आहे. नुकतीच कर्नाटकात हिजाबचा वाद सुरु झाला. अद्याप तो शमलेला नाही.

परंतु मुळातच असा क्षुल्लक मुद्दा चिघळविण्याचे कारण काय होते अशी विचारणा होत आहे.

या वादाचा उत्तर प्रदेश विधानसभा निवडणुकीसाठी वापर करुन घ्यायचा होता असे कारण दिले जाते.

परंतु त्यासाठी राज्य आणि सरकार अस्थिर होईपर्यंत मजल जाऊ द्यायची काय हा खरा सवाल आहे.

या सर्व वादात माजी मुख्यमंत्री येड्डुरप्पा यांचे मौन विशेष बोलके ठरले आहे. येड्डुरप्पांना त्यांचे मुख्यमंत्रीपदावरुन झालेले 'गमन' अद्याप पचविता आलेले नाही.



परंतु भाजप हाय कमांडशी विनाकारण संघर्ष नको या भावनेने त्यांनी मौन धारण केले आहे.

मात्र त्यांच्या अनुयायांच्या म्हणण्यानुसार २०२३ मध्ये येणाऱ्या विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने ते निश्चित सक्रिय होतील.

म्हणजेच येड्डुरप्पा बहुधा पुढील कृतीसाठी पूर्वतयारी करु लागले आहेत असाच याचा अर्थ निघतो.

हिजाब वादावर त्यांनी चकार शब्दाने मतप्रदर्शन केले नाही.

अनेक पत्रकारांनी त्यांना बोलते करण्याचा प्रयत्न केला पण तो व्यर्थ ठरला. या मुद्यावर कर्नाटक सरकार अडचणीत आहे आणि सरकारला बचावाचा पवित्रा घ्यावा लागत आहे.

परंतु येड्डुरप्पा सरकारच्या मदतीला धावून गेले नाहीत.

त्यांच्या 'मौन निष्क्रियते'चा आनंद काँग्रेसने घेणे अगदी स्वाभाविक आणि अपेक्षितच मानावे लागेल.

काँग्रेसचे स्थानिक प्रवक्ते लक्ष्मण्णा यांनी 'येड्डुरप्पा मुख्यमंत्री असते तर गोष्टी या थराला गेल्याच नसत्या' अशी प्रशंसा करतानाच भाजपच्या वर्तमान सरकारवर तोंडसुख घेतले. केंद्रातील भाजप सरकारने नागरिकत्व दुरुस्ती कायदा संमत

केला. मुस्लिमांबाबत पूर्णपणे भेदभाव व पक्षपात करणारा हा कायदा आहे. त्याच्या विरोधात कर्नाटकातील मंगलोर येथे हिंसक निदर्शने झाली.

पोलिसांना गोळीबार करावा लागला होता. गोळीबारात दोन मुस्लिम व्यक्ती मृत्युमुखी पडल्या. त्याच संध्याकाळी काही मुस्लिम धर्मगुरु त्यांना भेटायला गेले होते. येद्युरप्पा यांनी त्या धर्मगुरुंची आणि मुस्लिम समाजाची झालेल्या दुर्घटनेबद्दल जाहीर माफी मागितली. त्यांच्या या पवित्र्यामुळे वातावरण पूर्ववत होण्यास मदत झाली.

येद्युरप्पा हे भाजपचे असले तरी व्यवहारी आहेत. राजकारणी आहेत.

ते चारवेळा कर्नाटकचे मुख्यमंत्री झाले परंतु चारही वेळेस मुख्यमंत्रीपदाची शपथ घेताना त्यांनी खांद्यावर हिरव्या रंगाची शाल घेऊनच शपथ घेतली. भाजपतर्फे प्रचलित करण्यात आलेल्या भगव्या रंगाची शाल किंवा उपरणे पांघरण्याचे त्यांनी कटाक्षाने टाळले.

हिरवा रंग हा शेती व शेतकऱ्यांशीही निगडित आहे. त्यामुळेच येद्युरप्पा यांच्यासारखा मुरब्बी राजकारणी अशा वादात उडी घेणेही शक्य नाही. अर्थात त्यांचे मौन हे हलकेपणाने घेता येणार नाही. विधानसभा निवडणुकीपर्यंत भाजप हायकमांडने त्याची दखल न घेतल्यास ते त्यांना चांगलेच महागात पडू शकेल!

## निवडणूक प्रचाराची ही अनोखी अदा!

उत्तर प्रदेशातला एक मतदारसंघ आहे रॉबर्टस्‌गंज!

येथून भाजपचे वर्तमान आमदार भूपेश चौबे यांनाच पुन्हा उमेदवारी मिळाली आहे.

ब्राह्मण मते निर्णायक असलेल्या या मतदारसंघात या चौबे महाशयांनी समाजवादी पक्षाचे उमेदवार अविनाश कुशवाहा यांना ४० हजार मतांनी गेल्या निवडणुकीत पराभूत केले होते.

या वेळेसही कुशवाहा त्यांच्या विरोधात उभे आहेत.

बहुजन समाज पक्षाने ब्राह्मण उमेदवारच जिल्याने भाजपची पंचाईत झाली आहे कारण ब्राह्मण मतांची विभागणी झाल्यास समाजवादी पक्षाला त्याचा फायदा होऊ शकतो.

त्यामुळे तसेही भूपेश चौबे काहीसे गडबडून गेले आहेत. त्यात त्यांचे गेल्या पाच वर्षांचे प्रगतिपुस्तक अगदीच सुमार आहे. म्हणजे त्यामध्ये लाल –तांबड्या रेघाच जास्त असल्याने ते आणखीनच घाबरुन गेले आहेत.

आता ते प्रचाराला फिरताना सर्वप्रथम मतदारांची हात जोडून माफी मागत आहेत आणि मग मते मागत आहेत. प्रचाराला सुरुवात करताना त्यांनी जी सभा घेतली त्या सभेत त्यांनी उपस्थित मतदारांनी त्यांना प्रथम माफी दिल्याचे सांगावा या हट्टापोटी त्यांनी स्वतःच्याच व्यासपीठावर चक्क धरणे– ठिय्या आंदोलन केले.

एका वस्तीत प्रचाराला गेल्यावर त्यांना समोरच एक वृध्द दिसला.



लगेचच त्यांनी तेलाची बाटली मागवून त्याच्या अंगाला चक्क मालिश करुन दिले आणि माफीची याचना करीत वस्तीच्या लोकांना मते देण्याचे आवाहन केले.

हे सर्व ते फोटोसह सोशल मीडियावर पाठवतही आहेत.

अशाच आणखी एका प्रसंगात ते एका महिला मतदारास साष्टांग नमस्कार करीत आहेत आणि हात जोडून मतांची याचना करीत आहेत.

प्रत्येक सभेची सुरुवातही ते क्षमायाचनेनेच करतात आणि हात जोडून उभे राहतात व जोपर्यंत क्षमादान होत नाही तोपर्यंत त्याच अवस्थेत उभे राहतात. खरोखरच धन्य ते उमेदवार आणि धन्य ते मतदार आणि धन्य त्या निवडणुका व धन्य ती भारतीय लोकशाही! मेरा भारत महान!!!!!!

## हास्यास्पद पातळीवर चाललेले क्षुद्र राजकारण

राज्य विधानसभेचे अधिवेशन रात्री २ वाजता सुरु होऊ शकते?

परस्परांवर क्षुल्लक व क्षुद्र कारणांनीही कुरघोडी करणारी मंडळी असतील तर काहीही होऊ शकते.

तर झाले असे!

पश्चिम बंगाल विधानसभेचे अर्थसंकल्पी म्हणजेच या वर्षातील पहिले अधिवेशन बोलाविण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने केला. पहिले अधिवेशन असल्याने नियमाप्रमाणे राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाने त्याचा प्रारंभ होणे अपेक्षित असते.

त्यानुसार राज्याच्या मुख्य सचिवांनी राज्यपाल महोदयांना अमुक तारखेला दोन वाजता आपल्या अभिभाषणाने अधिवेशनाचा प्रारंभ होईल असे कळविले.

या कळविण्यात झाली एक चूक! दुपारी दोन वाजता म्हणजे इंग्रजीत लिहिताना '२ पीएम' असे लिहिणे आवश्यक असताना नजरचुकीने '२ एएम' असे लिहिले गेले. '२ एएम'चा अर्थ 'रात्री दोन वाजता' असा होतो.

राज्यपालांच्या सचिवालयाने मुख्य सचिवांच्या नजरेला ही चूक आणून दिली. त्यांनी ती तत्काळ मान्य करुन दिलगिरीही व्यक्त केली आणि संबंधित दुरुस्ती करुन नव्याने पत्र राज्यपाल महोदयांकडे पाठवून दिले.

गोष्टी सरळपणे घेतल्या असत्या तर हे प्रकरण येथेच संपायला हवे होते.

पण राज्य होते पश्चिम बंगाल आणि तेथील राज्यपाल महोदय जगदीप धनखड आणि मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्यातील संबंध विलक्षण वादळी आणि तणावाचे आहेत.




राज्यपालांनी मुख्य सचिवांनी दुरुस्ती करुन पाठविलेले पत्र स्वीकारण्यास साफ नकार दिला.

राज्य मंत्रिमंडळाच्या अधिकृत निर्णयात दुरुस्ती करण्याचा अधिकार मुख्य सचिवांना नाही आणि त्यामुळेच हे दुरुस्त केलेल सुधारित पत्र राज्यपाल स्वीकारु शकणार नाहीत. याचा अर्थ स्पष्ट होता की राज्य मंत्रिमंडळाची बैठक पुन्हा बोलावून त्यामध्ये वरील चुकीची दुरुस्ती करणे आणि मग तशी दुरुस्ती केलेले सुधारित पत्र राज्यपालांना पाठविणे. अन्यथा रात्री दोन वाजता अधिवेशनाला प्रारंभ करणे! या वादात काय होईल ते होईल.

परंतु मुख्यमंत्री व राज्यपाल यांच्यातील वाद विकोपाला गेल्यानंतर काय घडू शकते याचा हा एक नमूना आहे.

पोरकटपणा, क्षुद्रपणा आणि हास्यास्पद अशी वादावादी व परस्परांवर कुरघोडी करीत राहणे हे घटनात्मक पदांवरील व्यक्तींना किती शोभादायक आहे?

पण खरोखर, लक्षात घेतो कोण????

■■■

**।अभंग वारसा।**
लेख-२

# महाराष्ट्राची महाधारा

**सचिन परब**

**संतकृपा झाली । इमारत फळा आली ॥**
**ज्ञानदेवे रचिला पाया । उभारिले देवालया ॥**
**नामा तयाचा किंकर । तेणे केला हा विस्तार ॥**
**जनी जनार्दन एकनाथ । स्तंभ दिला भागवत ॥**
**तुका झालासे कळस । भजन करा सावकाश ॥**
**बहेणि फडकती ध्वजा । निरुपण केले वोजा ॥**

हा अभंग आहे संत बहेणाबाई सिऊरकरांचा. 'अरे संसार संसार'वाल्या कवयित्री बहिणाबाई चौधरी वेगळ्या. बहिणाबाई चौधरींच्या अडीचशे वर्षं आधी त्या झाल्या. त्या संत तुकोबारायांच्या समकालीन शिष्या. आजच्या औरंगाबाद जिल्ह्यातल्या वैजापूर तालुक्यातल्या सिऊर गावच्या. तिथे त्यांच्या वंशजांकडे असणाऱ्या हस्तलिखितांतला अभंगाचा हा पाठ. त्याचे याच अर्थाचे पण वेगळे शब्द असलेले इतर पाठ जास्त लोकप्रिय आहेत.

वारकरी परंपरेचा सगळा इतिहास आणि पसारा या अभंगाने पाच ओळींत मांडला आहे. ज्ञानेश्वर माऊलींनी १२९० साली ज्ञानेश्वरी सांगितली. त्याच्याही आधी संत नामदेवराय अगदी लहान वयातच 'सुंभाचा करदोडा, रकट्याची लंगोटी' नेसून चंद्रभागेच्या वाळवंटावर कीर्तनाला उभे राहिले होते. हे




साधारण १२८० ते १२८५ च्या दरम्यान घडलं असावं. ही सुरुवात मानली आणि संत बहेणाबाईंनी आपला देह ठेवला ते १७०० साल या अभंगाचा शेवट मानला तर तब्बल चारशे वर्षांतले वारकरी संप्रदायाच्या इतिहासातले महत्त्वाचे टप्पे या अभंगात आले आहेत.



मोठ्या दिमाखात उभं असलेलं वारकरी विचारांचं देऊळ दाखवत बहेणाबाई सांगतात, या देवळाचा भक्कम पाया ज्ञानदेवांनी घातला आहे. या पायात ज्ञानेश्वरीचा विचार आहे. समग्र जगण्याचं सुंदर तत्त्वज्ञान आहे. ते शेवटच्या माणसापर्यंत पोचवण्यासाठी लोकभाषेचं माध्यम वापरत केलेली क्रांती आहे.

संत नामदेवरायांइतके मोठे संघटक भारताच्या इतिहासात खूपच कमी झालेत. त्यांनी फक्त महाराष्ट्रातच नाही, तर देशभर जी बांधणी केली, त्याचा प्रभाव आजही आपल्याला पाहता येतो. त्यांनी वारकरी तत्त्वज्ञान आणखी सोपं केलं. अभंग, संगीत आणि संवादी कीर्तनाचा खरा 'सोशल मीडिया' उभारला. पिढ्यानपिढ्या विचार टिकवण्यासाठी फडांची सुरुवात केली. यातून वारकरी देवळाचं आवार ते वाढवू शकले, विस्तार करू शकले, कारण या वारकरी विचारांविषयीचा सेवाभाव हे त्यांचं अधिष्ठान होतं. सगळं उभारून त्याचं श्रेय त्यांनी नाकारलं.



वारकरी विचारांच्या इमारतीचे खांब संत एकनाथ बाबांपेक्षा दुसरं कुणी असूच शकत नाही. करूणेचा, समतेचा आणि बंधुतेचा वस्तुपाठच त्यांनी आपल्या जगण्यातून घालून दिला. एकीकडे शांतिब्रह्म म्हणावं अशी टोकाची सहनशीलता आणि दुसरीकडे वर्णाश्रमधर्मातील भेदभावाच्या विरोधात केलेला एकहाती विद्रोही. त्या काळी घरच्या श्राद्धाला अस्पृश्यांना जेवायला घालून आणि अस्पृश्याच्या घरी जेवून त्यांनी खरा धर्म सांगितला. हिंदू धर्मातल्या अंधश्रद्धांची नाथबाबांइतकी चिकित्सा देशात क्वचितच कुणी केली असेल.

त्यानंतर या सगळ्याचं शिखर असणारे संत तुकोबाराय. त्यांच्याविषयी बोलण्यासाठी शब्द अपुरे पडावेत, इतकी थोरवी! त्यांचा शब्द न शब्द आजही जगाला मार्गदर्शक असाच आहे. त्यांनी कधी कोणाला शिष्य मानलंच नाही. कारण 'गुरूने न करावा शिष्य' असा त्यांचा दंडकच होता. पण त्यांच्या सान्निध्यात असलेल्या बहेणाबाईंनी त्यांना गुरू मानलं. वैदिक दशग्रंथी ब्राह्मणाची बायको एका शूद्र कुणबी म्हणवून घेणाऱ्याला गुरू मानते, ही गोष्टच त्या काळाला हादरून टाकणारी होती. त्यासाठी या माऊलीने प्रचंड छळ सहन केला पण तुकोबारायांचा वारकरी विचार सोडला नाही. त्यातून त्यांच्या निरुपणाला अनुभवाचं तेज आलं. थोरपण हे जातीवर, कुळावर अवलंबून नसतं, हे सांगणाऱ्या बौद्ध तत्त्ववेत्ता अश्वघोषाच्या वज्रसूची ग्रंथाचं मराठी अभंगरूपात भाषांतर केलं.

तुकोबारायांचे चिरंजीव तेजोनिधी नारायण महाराजांनंतर ही वारकरी परंपरा सांप्रदायिक फडांमधून निष्ठेने जपली गेली. गणपती महाराज, गाडगेबाबा, तुकडोजीबाबा, जोगमहाराज, भगवानबाबा, बाळूमामा अशा फडांशी न जोडलेल्या शेकडो वारकरी सत्पुरुषांनी ही परंपरा अधिक बळकट केला. महाराष्ट्रभर संतविचार जागा ठेवला. या महाराष्ट्राच्या महाधारेतूनच समाजसुधारणेची, स्वातंत्र्य चळवळीची, सहकाराची, शिक्षणप्रसाराची, कसदार साहित्याची, वैचारिक मांडणीची आणि निरनिराळ्या आंदोलनांची निर्मिती होत राहिली. आजही होतेय. म्हणून माय बहेणाईंनी वर्णन केलेल्या वारकरी विचारांच्या देवळाला नमस्कार केल्याशिवाय पुढे जाताच येत नाही.

**(लेखक हे रिंगण या संतविचारांचा सामाजिक सांस्कृतिक मागोवा घेणाऱ्या वार्षिक अंकाचे संपादक आहेत. संपर्क: ९९८७०३६८०५)**

■■■

शेवटचे पान



# बळी तो कान पिळी

राक्षसी महत्वाकांक्षेने उन्मत्त झालेला कुणी एक हुकूमशहा आपली अफाट शस्त्रास्त्रे आणि दारूगोळा ओकतोय एका निरपराध छोट्या देशावर, घरे बेचिराख होतायत, शाळा, दवाखाने उद्ध्वस्त होतायत. रणगाडे, अण्वस्त्रे, मिसाईल जाळून टाकतायत आसमंत. हजारोंच्या संख्येने जीवाच्या आकांताने नागरिक सीमा ओलांडण्यासाठी पायपीट करतायत. पावलागणिक प्रेतांचे ढीग वाढतायत, तर हवेतून, जमिनीवरून आणि समुद्रातून फासे घट्ट होतायत.

त्या छोट्या देशातला प्रत्येक सामान्य माणूस मोठ्या हिकमतीने मातृभूमिचे रक्षण करतोय. सर्वस्वपणाला लावून हे संकट परतवायला निघालाय. जगाच्या कुठल्यातरी भागात घडणाऱ्या ह्या घटनेच आपल्याला काय? घरबसल्या आराम खुर्चीत पहुडल्यावर टीव्हीच्या स्क्रीनवर ही रंगीत दृष्य आपण बघतो. एखादा युध्दपट बघावा तसे त्याचे आपण प्रेक्षक होतो. खरच आपल्या संवेदना मरून पडल्यायत का? काळजी एकच ह्या युध्दज्वराने तेलाचे भाव भडकतील, महागाई वाढेल तेवढ्यासाठी तरी युध्द थांबवावे, डॉक्टरकी मिळविण्यासाठी आपल्या देशातून गेलेले हजारो युवक-युवती अडकून पडलेत. त्यांची काळजी आहेच पण त्यांच्याच सारखी त्या छोट्या देशातील जनता सुध्दा वाचली पाहिजे ही बोच लागायला हवी.

महासत्तांच्या ह्या खेळात भरडला जाणारा कोणत्याही देशाचा नागरिक असेल तर त्याच्यासाठी आपण उभ राहायला हव. त्या उन्मत्त नेत्याला आता रक्ताची चटक लागलीय. पृथ्वी आधीच संकटात असतांना हा सूडाचा प्रवास थांबवायला हवा.



